


आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १४ एप्रिल २०२४



# डॉ. बाबासाहेबांची समाजाभिमुख-समर्पित पत्रकारिता



प्रा. बाळासाहेब बोराडे
मो. 9423159993

आधुनिक केसरी

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महामानव, कायदेतज्ञ, दलितोद्धारक, शिक्षणतज्ञ, अर्थतज्ज्ञ, घटनातज्ज्ञ, कामगार नेते, राजकारणी, समाजसुधारक, तत्त्ववेत्ते, भाषातज्ज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ अशा अनेक मानद उपाध्यांनी संबोधले जाते. डॉ. आंबेडकर हे अनेक विषयांत निष्णात होते. उत्कृष्ट लेखक, पत्रकार व संपादक म्हणूनही त्यांचा नावलौकिक होता. परंतु भारतीय माध्यमतज्ज्ञांनी त्यांच्या समाजाभिमुख पत्रकारितेची पाहिजे तशी दखल घेतली नसल्याचे जाणवते. एखादी चळवळ किंवा आंदोलनात वृत्तपत्राची भूमिका किती महत्त्वाची असते हे बाबासाहेबांनी ओळखले होते. तत्कालीन प्रस्थापित वृत्तपत्रे बहिष्कृत समाजाच्या समस्या मांडण्यास असहमती दर्शवत असत. म्हणून त्यांनी बहिष्कृत समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी वृत्तपत्र क्षेत्रात पदार्पण केले होते. पुढील काळात 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'समता', 'जनता', 'प्रबुद्ध भारत', ही वृत्तपत्रे सुरू केली होती. त्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना अर्थसाहाय्यही केले होते. स्वातंत्र्यप्राप्ती, समाजपरिवर्तन याबरोबरच मानवमुक्ती हा त्यांच्या पत्रकारितेचा मुख्य उद्देश होता. डॉ. बाबासाहेबांनी सुरू केलेली वृत्तपत्रे दीर्घकाळ चालली नसली तरीही त्यातून व्यक्त झालेले विचार आजही मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरतात.**

स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत समाजाच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी पत्रकारिता क्षेत्र निवडले होते. 31 जानेवारी 1920 ला 'मूकनायक'चा उदय झाला. सामाजिक अन्यायाखाली भरडलेल्या शोषित, पीडित समूहाचा बुलंद आवाज म्हणजे मूकनायक होय. तत्कालीन प्रस्थापित वृत्तपत्रे बहिष्कृत समाजाच्या व्यथा आणि वेदना मांडण्यास नकार देत असत. म्हणून बाबासाहेबांनी 3 एप्रिल 1927 रोजी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले होते. 29 जून 1928 ला 'समता' नावाचे वृत्तपत्र सुरू झाले होते. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या धर्तीवर समाजनिर्मिती व्हावी हा त्यामागचा उद्देश होता. 24 नोव्हेंबर 1930 ला जनता हे वृत्तपत्र सुरू झाले होते. गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल हे या वृत्तपत्राचे ब्रीद होते. 4 फेब्रुवारी 1956 ला 'जनता' वृत्तपत्राचे नाव बदलून 'प्रबुद्ध भारत' असे नाव ठेवण्यात आले होते.

एखादी चळवळ किंवा आंदोलन यशस्वी होण्यासाठी वृत्तपत्रे महत्त्वाची भूमिका बजावतात. नेतृत्वाला व्यक्त होण्यासाठी आपले हक्काचे व्यासपीठ हवे असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे महत्त्व जाणून होते. चळवळीचे ध्येय-धोरण जनसामान्यांपर्यंत पोहोचवायचे असेल तर आपल्या विचारांच्या वृत्तपत्राची आवश्यकता आहे हे बाबासाहेबांनी ओळखले होते. तत्कालीन प्रस्थापित वृत्तपत्रे बहिष्कृत समाजाच्या व्यथा, वेदना मांडण्यास टाळाटाळ करत असत. म्हणून बाबासाहेबांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता, प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे सुरू केली. त्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांना 2500 रुपयांची




आर्थिक मदत केली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी भारतीय प्रसारमाध्यमांवर अनेक निर्बंध लादले होते. वृत्तपत्रे काढणे, लेख लिहिणे, प्रकाशित करणे यांवर बंधने घातली होती. जाचक अटी लादल्या होत्या. अशा प्रतिकूल परिस्थितीत वृत्तपत्रे चालवणे जिकीरीचे काम होते. त्यासाठी पैसा आणि मनुष्यबळाचीही आवश्यकता होती. या सर्व बाबींचा अभाव असतानाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामाची व्याप्ती सांभाळून पत्रकारितेसाठी वेळ दिला. वेळेअभावी ते रात्री उशिरापर्यंत अग्रलेख लिहिण्याचे काम करायचे. ते स्वतः वृत्तपत्रांचे संपादनही करत असत.

रंजल्या गांजल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकारितेत त्यांनी कधीही तडजोड केली नाही. पत्रकार आणि संपादक पदाला शोभेल असे दमदार लिखाण त्यांनी केले. वृत्तपत्र व्यवसायात व्यक्तिपूजा आणि ठराविक लोकांची मक्तेदारी वाढत असून ही लोकशाहीस लागलेली कीड आहे असे ते मानत. या प्रवृत्तीला त्यांचा विरोध असायचा. ते जनकल्याण व नैतिकतेचा पुरस्कार करत असत. अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्यात खितपत पडलेल्या समाजाच्या दुःखाला वाचा फोडण्याचे काम वृत्तपत्र करीत असतात याची त्यांना कल्पना होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेली वृत्तपत्रे दीर्घकाळ चालली नसली तरीही त्यातून व्यक्त झालेले विचार आजही मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरतात. बहिष्कृत समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी आपल्या लेखणीला धार दिली. मानवमुक्ती म्हणजेच मानवजातीचे कल्याण हे त्यांच्या पत्रकारितेचे अंतिम ध्येय होते.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


## फिटे अंधाराचे जाळे

पण इतरांना वाट दाखवणारी अनोखी दिवाळी करमरकर कुटुंबीय कायम साजरी करत आहेत. खरोखरच त्यांनी लिहिलेले ' फिटे अंधाराचे जाळे ' हे पुस्तकाचे नाव किती सार्थ आहे ! वल्लरीचा सेरेब्रल पाल्सीचा आजार करमरकर कुटुंबीयांनी लहानपणीच लक्षात आला. पण निराश न होता याच मुलीला आपल्या परीने शिकवायचे, वाढवायचे याचा ध्यास भालचंद्र करमरकर, सौ विद्याताई करमरकर आणि वल्लरीची आत्या या तिघांनी घेतला. हा निर्णय तर घेतला पण तो अमलात आणणे सोपी गोष्ट नव्हती. नियतीने त्यांची कठोर परीक्षा घेतली. त्यांना आपल्या आवडीनिवडी, हौसमौज आदी सगळ्या गोष्टी बाजूला ठेवाव्या लागल्या. काहींनी त्यांना नावही ठेवली. अनाहूत सल्ला दिला, उपदेश केला. पण आपल्या निश्चयापासून ही माणसे यत्किंचतही ढळली नाहीत. समर्थांच्या उक्तीप्रमाणे ही सगळीच मंडळी म्हणजे जणू ' निश्चयाचा महामेरू '. त्यांच्या जागी कोणीही असते तर अशा मुलीसाठी त्या पालकांनी व्रतवैकल्यं, बुवाबाजी इ चा मार्ग अनुसरला असता. ते स्वाभाविकही म्हटले गेले असते. पण करमरकरांनी यातली कोणतीही गोष्ट केली नाही. त्यांनी कास धरली ती वैद्यकीय उपचारांची, विवेकाची आणि प्रयत्नांची. असे करताना त्यांच्या सहनशक्तीची, संयमाची कसोटी लागली. पण त्यांनी आपली जिद्द, चिकाटी सोडली नाही. ते असं करत असताना वल्लरीची सुद्धा त्यांना मनापासून साथ होती. आपल्याला शिकायचंय, मोठं व्हायचंय या जिद्दीने वल्लरी सुद्धा त्यांच्या प्रयत्नांना साथ देत होती. अखेर करमरकर कुटुंबीयांपुढे दैव हरलं. प्रयत्नांना यश आलं. वाटा उजळल्या. या प्रयत्नांची सुरुवात वल्लरीला साधं नीट बसता येत नव्हतं. काही खाता पिता येत नव्हतं यासारख्या गोष्टींपासून झाली. हातापायांमध्ये, स्नायूंमध्ये शक्ती नव्हती. कोणतीही गोष्ट हातात धरता येत नव्हती. या सगळ्या साध्या साध्या गोष्टींपासून सुरुवात करून वल्लरीला शाळेत घेऊन जाणे, तिला शिकवणे, परीक्षा द्यायला लावणे आणि तिने एम ए संस्कृत प्रथमवर्गात उत्तीर्ण होण्यापर्यंत मजल मारणे या सगळ्या खऱ्या तर अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी.

## हितगुज



पुष्प ३९वे




गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### महाराजांनी ढोग्यांचा बुरखा फाडला

गावात किंवा शहरात काहींच्या मनात विचार उमटतो, तुटलेली, भंगलेली देवालये पुन्हा बांधावी किंवा या रिकाम्या जागेत एखादे सुबक, छोटे-से मंदिर बांधावे, सभोवताली नीट बाग राखावी, संस्कारांचे पवित्र वातावरण त्यातून अनायास तयार होईल, मग बैठका होतात. बहुमताने होकार येतो, माणसे कामाला लागतात, विभागणी होऊन जबाबदार्या पार पाडल्या जातात. सगळीकडे कार्य पूर्ण होईतोवर उत्साह असतो. यातल्या काही उणिवा व खर्चाची उधळपट्टी सोडून देऊन महत्त्वाची बाब आहे. 'जनतेने एकत्रित होऊन, संकल्पाने नवनिर्मितीचा ध्यास घेणे', हा ध्यास वेगवेगळ्या जनहितकारी विधायक कार्यासाठी, उभारणीसाठी नित्य व सर्वत्र असणे फार गरजेचे आहे. लोकशक्ती व विराट मनुष्यबळ अशा पद्धतीने सामाजिक एकोप्याने, सामाजिक बांधीलकी ने, सामाजिक व राष्ट्रीय कल्याणासाठी उपयोगात आणणे, ही भारतीय जगण्याची जुनी रहाटी आहे. भारतीय संस्कृती, मूल्ये, नैतिकता व समाज-जीवन 'सर्वमंगल-मांगल्ये'अशा विशाल विचार सरणीवर आधारलेली आहे. अंतर्बाह्य ईश्वरमय झालेल्या निष्काम संत, योग्यांनी ऋषींनी, सिद्धींनी लोकसंग्रहासाठी आयुष्य व्यतीत केले. 'संत जैसे दीपिका। उजळती विवेक प्रकाशा।' अशा तळमळीने आयुष्याच्या अमरत्वाची देखणी परंपरा, भारतीय इतिहासाचे परम ऐश्वर्य आहे. भगवान बुद्धाने बोधिसत्त्व ज्ञान प्राप्त केल्यानंतर प्रत्येक गावी जाऊन जनतेला सद्धर्माचा, सत्कर्माचा, दुःख निवृत्तीचा परम उपदेश केला. भगवान श्री स्वामी महाराजांनी तर भोळ्या-भाबड्या, चुकलेल्या-भांबावलेल्या जनतेला बोट धरून ज्ञानाच्या वाटेवर चालवले. प्रसंगी कठोर होऊन उन्मत्तांना वठणीवर आणले, तसेच ढोंगांचा बुरखा फाडला, राजा-रंक दोघांना सारखेच मार्गदर्शन केले व जनांस आत्मविश्वासाने राष्ट्रहितासाठी कामाला लावले, जाती-धर्म-भाषा-प्रांत आदी भेदभावांच्या भिंती पाडून मानवतेचे कडेकोट बांधले, जनतेचा विवेक जागृत करून पतितांना सुधारण्याची संधी दिली. स्वामी चरित्र सारामृतात स्वामींच्या वैश्विक कल्याणाच्या कार्यांचे दाखले विविध लीला-प्रसंगातून अनुभवता येतात.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४



## आनंदी पहाट

### ज्ञान व ध्यान ह्या परस्परपूरक अवस्था

आधुनिक केसरी

सद्यःस्थितीत जगामध्ये पैशाने काहीही विकत घेता येते आणि विकताही येते. असे जरी असले तरीही मनःशांती मात्र आपल्या अंतरंगात प्रसूत व्हावी लागते. आपल्या आंतच आपण स्वतः आनंदाची निर्मिती करायची असते. त्याची अनेकदा आपण अपेक्षा इतरांकडून करतो, पर्यायाने निराश होतो. आजचा दिवस माझा हेच सत्य आहे आणि म्हणूनच ते सिद्धही केले पाहिजे. कालचा दिवस संपल्यावरच आपल्या आयुष्यातील नवीन दिवसाची पहाट उगवते. नवीन दिवसाच्या उगवत्या सूर्याच्या तेजोमय किरणांनी आपले नवे आयुष्यच जणू काही सुरु होत असते. दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचारांनी झाली तर पुढील दिवस उजाडेपर्यंत आपण आनंदी, सुखी, समाधानी तर राहू शकतोच; पण शिवाय मनःशांती अधिक प्राप्त होत राहते. आपल्याला आपण स्वतः प्रसिद्ध होण्याची इर्षा असते आणि ती असलीच पाहिजे; पण प्रसिद्ध होण्यासाठी अगोदर स्वतःला सिद्ध करण्याची जरुरी असते, हे मात्र आपण विसरतो. केवळ विचारांत, स्वप्नांत, भ्रमांत आणि संभ्रमांत न अडकून पडता कार्यकक्षांच्या मर्यादा ओलांडाव्या लागतात, स्वतःला झोकून देऊन प्रत्यक्ष कार्यकृती करावी लागते, हे मनात आले पाहिजे, आपण ध्यानांत घेतले पाहिजे. ह्यासाठी आपल्या प्रत्येकाचेच विचार, वर्तन आणि व्यवहार हे स्वतः पुरते मर्यादित न ठेवता इतरांच्या उणिवा दूर करून, त्यांच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याच्या कामी यायला हवेत. अनेकदा भूतकाळातल्या आठवणी आपल्याला स्वस्थ बसू देत नाहीत; तर काहीवेळा भविष्याची चिंता, काळजी आपल्याला काही सुचू देत नाही. कितीही ठरवले आणि काहीही केले, तरीही आपण मात्र ह्याच दुष्ट्चाक्रांत अडकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### जीवशिवानंदा | भेट झाली ||


आनंदी मनाचे | आनंदी सोहळे ||
आनंद उसळे | शुद्ध मनी ||१||
आनंदी नदीला | आनंदाचा घाट ||
आनंदाची वाट | पंढरीची ||२||
आनंदाचे सूर | गाता अभंगात ||
आनंदी टाळात | ब्रह्मानंद ||३||
आनंदी गावचा | आनंदी प्रवासी ||
आनंदी संतांसी | एकरूप ||४||
विठुच्या नामाचा | आनंदी गजर ||
आनंदी माहेर | आनंदले ||५||
आनंदी नामाचा | आनंदी मी भक्त ||
आनंदाचे सुक्त | हरिपाठ ||६||
आनंदी देहात | वसे भक्तानंद ||
जीवशिवानंद | भेट झाली ||७||
जीवशिवानंद | भेट झाली ||७||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

देह सहित प्रभु मिलन है,
परमानन्द विलास ।
जिवन्मुक्ति सोइ जानिये, पद् म पत्र
जल भास ।।६८।।(स्वर्वेद पंचम मण्डल
एकादश अध्याय) ०५/११/६८
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
पाण्यातल्या कमळाप्रमाणे या शरीरात
निर्लेप राहून प्रभू प्राप्ती आणि परमानंदाचा
जो उपभोग आहे, यास जीवन्मुक्त अवस्था
म्हणतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी

माघ वद्य नवमी म्हणजे दासनवमी समर्थांच्या पुण्यस्मरणाचा दिवस. मित्रांनो मला काही विचारणा झाली की दासनवमी च्या निमित्ताने मला भावलेले समर्थ ही सात दिवसांची लेखमाला लिहा. लिहिली खरी !!पण सांगू का!!! समर्थांचे विचार हे गेली तीन वर्षे सातत्याने लिहित आहे तर आता नववा दशक चालू आहे. हे अवघड काम माझ्या आयुष्यात पूर्ण व्हावे हीच समर्थ चरणीं प्रार्थना तर समर्थांचे विचार सात दिवसांत थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न म्हणजे *लहान तोंडी मोठा घास* आहे. त्यात काही चूक झाली तर समर्थ माफ करतील अशी आशा करून सात दिवस लेखमाला लिहिली व वाचकांची मागणी पूर्ण केली.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नामाकरताच नाम घ्यावे

आधुनिक केसरी

नाम हे निसरड्यासारखे आहे. निसरड्यावर गवत वाढत नाही, आणि त्याच्यावर पाय पडला तर घसरतो, त्याप्रमाणे नाम आपल्यावर उपाधी ठरू देत नाही. त्याला कोणत्याही उपकरणाची गरज लागत नाही. रोगी-निरोगी, विद्वान्-अडाणी, श्रीमंत-गरीब, लहान-थोर, स्त्री-पुरुष, जात-गोत, यांपैकी कोणतीही गोष्ट असली तरी अडत नाही, नसली तरीही अडत नाही. नामाशिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनाला शक्ती, बळ, पैसा वगैरे कोणत्या तरी गोष्टीची मदत लागते. असे हे अत्यंत उपाधिरहित असलेले नाम आपणही अत्यंत उपाधिरहित होऊन घेतले तरच त्यात आपल्याला प्रेम येईल. आपण उपाधिरहित होणे म्हणजे नाम हे केवळ नामाकरिताच, स्वतःच्या कल्याणाकरिताच घेणे, जगातल्या दुसऱ्या कशाहीकरिता न घेणे. आपण जर ते सकाम बुद्धीने घेतले, तर इच्छित कार्यभागही साध्य होत नाही, आणि आपले कल्याणही साधत नाही. सकाम नाम घेणे हे किती वाईट आहे हे सांगणे फार कठीण आहे. असे पहा की, स्त्री ही अत्यंत पवित्र आहे, कारण देव, संत यांसारख्या विभूतीही तिच्यापोटी जन्म घेतात; अशा



स्त्रियांना पळवून नेऊन अनीतीने वागायला भाग पाडून त्यावर पैसे मिळविण्याचा धंदा काही लोक करतात, ही किती निंद्य गोष्ट आहे बरे ! पण सकाम नाम घेणे ही गोष्ट त्याच्याहीपेक्षा कितीतरी पटीने अधिक निंद्य आहे. म्हणून नाम हे नामाकरिताच घ्यावे, त्याचा संबंध आपल्या इच्छा-अपेक्षांशी ठेवू नये. नामाकरिता नाम घेतल्याने मन आपोआप अंतर्मुख होऊन जाते. नामाच्या साहाय्याने मन अंतर्मुख केल्यावर आनंद सापडतो. आपल्या हृदयातच तो सापडतो. आपण तीन गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. आचरण अगदी शुद्ध ठेवावे; दुसरी, नामाला कधीही सोडू नये; आणि तिसरी, माझा सांभाळ करणारा कुणीतरी - म्हणजे सद्गुरु - आहे ही जाणीव जागृत ठेवावी. प्रत्येक माणसाला कशाचीतरी विशेष आवड असते; त्या आवडीमध्ये राहावे आणि त्यात जबरीने नाम घ्यावे. आत्मज्ञान व्हावे म्हणून त्याच्या मागे लागले तर ते लवकर होत नाही, भगवंताकडे लक्ष लागले म्हणजे ते आपोआप होते. भगवंताचे नाम घेणे हे ज्ञान होण्याचेच लक्षण आहे. उत्तम वस्तू नेहमी थोडीच असते. श्रीखंडामध्ये चक्का आणि साखर कितीतरी असते, पण केशर किती थोडे घालावे लागते ! तसे भगवंताच्या नामाचे आहे. रोज थोडे पण अगदी मनापासून आणि मोबदल्याची अपेक्षा न करता नाम घ्यावे, ते फार काम करील. भगवंत हा सर्वसत्ताधीश खरा, पण एका बाबतीत तो लुळापांगळा होतो व सहज अडकतो. भुंगा जसा लाकूड पोखरतो पण कमळात अडकतो, तीच स्थिती नामाच्या बाबतीत भगवंताची होते.

## निरूपण

आधुनिक केसरी

वृक्ष आंगावरी मोडती । या नांव आदिभूतिक ॥ १४॥
कोणी येकाचा श्राप जडे । कोणी येकें केले चेडे ।
आधांतरी होती वेडे । या नांव आदिभूतिक ॥ १५॥
कोणी येकें चाळविलें । कोणी येकें भ्रष्टविले ।
कोणी येकें धरून नेलें । या नांव आदिभूतिक ॥ १६॥
कोणी येकें दिलें वीष । कोणी येकें लाविले दोष ।

रविवार, १४ एप्रिल २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २२९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 14 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-229 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05





















# रामनवमी निमित्ताने तीन दिवस साई मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थानच्या वतीने रामनवमी उत्सव कालावधीत



विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दिनांक १६ एप्रिल रोजी सायं.४ ते ६या वेळेत ह.भ.प. विक्रम नांदेडकर, गोरटे यांचा कीर्तन कार्यक्रम, दुपारी २ते ३.३० वा. यावेळेत पं.ह.भ.प. देवरावजी कुळमेथे महाराज, नाशिक रोड यांचा साई महिमा गुणगाण कार्यक्रम, दुपारी ३.४५ ते ५.३० वा. यावेळेत सौ.पद्मावती गोविंद पारेकर, निनाद ग्रुप, पुणे यांचा साईभजने व भक्तीगीतांचा कार्यक्रम व रात्रौ ०७.३० ते ०९.३० यावेळेत मिराज इव्हेंटस्, नवी मुंबई यांचा साई भजन संध्या कार्यक्रम होणार आहे. दिनांक १७ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२. यावेळेत ह.भ.प. विक्रम नांदेडकर, गोरटे यांचा कीर्तन कार्यक्रम, दुपारी ३.३० ते ५.३० वा. यावेळेत डॉ. लता सुरेंद्र, मुंबई यांचा आयना, प्रभु रामाचा महाकाव्य प्रवास हा कार्यक्रम व रात्रौ ७.३० ते ९.३० यावेळेत श्री. विजय साखरकर, साईसेवा नृत्योत्सव, मुंबई यांचा साईस्वर नृत्योत्सव कार्यक्रम होणार आहे. दिनांक १८ एप्रिल रोजी सकाळी १०.ते १२. यावेळेत ह.भ.प. विक्रम नांदेडकर, गोरटे यांचे काल्याचे कीर्तन कार्यक्रम, दुपारी ३.३० ते ५.३० वा. यावेळेत डॉ. प्रसाद श्रीराम चौधरी, जालना यांचा अभंगवाणीचा कार्यक्रम व रात्रौ ७.३० ते ९.३० यावेळेत अलोक मश्रिा, साई आस ट्रस्ट, दिल्ली यांचा साई भजनसंध्या कार्यक्रम होणार आहे. दिनांक १६ एप्रिलचा कीर्तन कार्यक्रम हे समाधी मंदिराच्या उत्तर बाजुच्या स्टेजवर होईल व दिनांक १७ आणि १८ एप्रिलचा कीर्तन कार्यक्रम मारुती मंदिराशेजारील शताब्दी स्टेजवर होणार आहे. तर निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम मारुती मंदिराशेजारील श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपाच्या स्टेजवर होणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष .गाडीलकर यांनी दिली

या वर्षीचा श्री रामनवमी उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थानचे तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, समिती सदस्य तथा जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व उप मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थान प्रयत्नशिल आहे.



# मतदार संघाच्या विकासासाठी परिवर्तनाची गरज : डॉ. अभय पाटील

## रिसोड येथील मेळाव्यास शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव आहे . त्यात स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हा ..! :** निवडणूक कार्यक्रम ही एक प्रक्रिया नसून, तो लोकशाहीचा उत्सव आहे . आणि मतदान करणे हा त्या उत्सवातील सहभाग असतो . जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे पाहिले जाते . ती टिकवून ठेवण्यासाठी डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून मतदानाचा सर्वोच्च अधिकार दिला आहे .तो प्रत्येकाने बजावून लोकशाही बळकट केली पाहिजे . त्यासाठी मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन डॉ अभय पाटील यांनी केले आहे .

**वसंत पाटील**

**वाशिम :** काँगेस हा केवळ राजकीय पक्ष नसुन ती एक विचारधारा आहे. मात्र धर्माच्या नावावर भाजप ही विचारधारा गाडण्याचा प्रयत्न करत आहे. परिणामी विकासाऐवजी धर्म आध्यात्मामध्ये सर्वसामान्य जनतेला गुंतवले जात आहे. त्यामुळे केवळ राज्याचीच नव्हे; तर देशाची वाट लागली आहे. तीच गत गेल्या दोन दशकांपासून अकोला मतदार संघाची झाली आहे. विकास साधायचा असेल तर आता परिवर्तन होणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन अकोला लोकसभा मतदारसंघाचे महा विकास आघाडीचे उमेदवार डॉ. अभय पाटील यांनी केले आहे. रिसोड येथील आयोजीत संवाद मेळाव्यास ते संबोधित करीत होते. रिसोड येथील बालाजी रिसॉर्ट वाशिम रोड येथे आज दि.१३ एप्रील रोजी अकोला लोकसभा मतदारसंघाचे काँगेस उमेदवार डॉ. अभय पाटील यांच्या निवडणुक प्रचाराच्या निमित्ताने महा विकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर रिसोड-मालेगाव विधानसभा मतदार संघाचे काँग्रेस आमदार अमित झनक, माजी आमदार हरिभाऊ भदे,आ. नितीन देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे, काँग्रेसचे प्रदेश सचिव ॲड. दिलीपराव सरनाईक, शिवसेना ( ऊबाठा ) चे बाळासाहेब देशमुख, भूमिपुत्र संघटनेचे अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर, संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष गजानन भोयर आदीसह महा विकास आघाडीच्या अनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काँग्रेसचे अमोल नरवाडे यांनी केले. सदर मेळाव्यास शेकडोच्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. मंचकावरील आघाडीतील घटक पक्षांच्या नेत्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, लोकशाही टिकवायची असेल तर, महा विकास आघाडीशिवाय दुसरा पर्याय नसल्याचा सूर निघत होता. यावेळी बोलतांना सर्वांनीच रिसोड- मालेगाव तालुक्यातून डॉ. अभय पाटील यांना जास्तीत जास्त मताधिक्य देण्याचा निर्धार केला.तर प्रत्येक वक्त्यांनी भाजपाच्या हुकुमशाही धोरणावर सडकून टीका केली. यावेळी पुढे बोलताना डॉ. अभय पाटील यांनी भाजपाच्या आध्यात्मिक बडेजावपणाचा खरपूस समाचार घेत, काँगेस राजवटीत उभारण्यात आलेल्या मंदिराचा कुठलाही बडेजाव करण्यात आला नाही. महात्मा गांधीनी कुठल्याही पदावर नसतांना देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. ते टिकवून ठेवण्याची जबाबदारी आता आपल्या सर्वांची आहे. त्यासाठी केवळ अकोला लोकसभा मतदारसंघातच नव्हे; तर राज्यासह संपुर्ण देशातून भाजपा हद्दपार करणे गरजेचे आहे. कारण लोकशाही संपवण्याचा जो घाट भाजपाने घातला आहे तो महा विकास आघाडीच्या माध्यमातून आपल्या सर्वांना उधळून लावायचा असल्याचे मत डॉ.पाटील यांनी व्यक्त केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्व सावळदबारा नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा!

-: शुभेच्छूक :-
दिलीप प्रल्हाद सुरडकर
उत्सव समितीचे कोषाध्यक्ष सावळदबारा, ता. सोयगाव


# पळसखेड पिंपळे शिवारात अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान; भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणात नासाडी

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** सायंकाळच्या सुमारास अचानकपणे वातावरणात बदल झाल्याने राजूरसह पळसखेडा पिंपळे शिवारात ढगांचा गडगडाट आणि विजेच्या कडकडाटासह वादळ वाऱ्यासह गारांचा पाऊस झाला. सोसाट्याच्या वारा आणि अवकाळी पावसामुळे अनेकांच्या शेतातील शेडनेट, पॉलिहाऊस फाटल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.सतत येणाऱ्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून त्यांना फार मोठे आर्थिक नुकसानही सहन करावे लागत आहे. अवकाळी पावसामुळे भाजीपाला व फळ पिकांचे नुकसान होऊन शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. त्यामध्ये टोमॅटो, कारले, मिरची ,दोडकी यासारख्या पिकांची नासाडी झाली असून वाऱ्याच्या वेगामुळे झाडे उन्मळून पडली आहेत. अनेकांच्या घरावरील आणि जनावरांच्या गोठ्यावरील पत्रेही उडाली आहेत. रमेश बाबुराव पिंपळे यांच्या मळणी यंत्रावर झाड पडल्याने मळणी यंत्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.सुदैवाने कोठेही जीवितहानी झाली नाही. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून तात्काळ मदत देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.





"कोणत्याही समाजाची उन्नती त्या समाजातल्या शिक्षणाच्या प्रगतीवर अवलंबून असते."
महामानव, विश्वरत्न
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
यांना जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन!

अभिवादक
श्रीकृष्ण गवई
स्वाभिमानी नेतृत्व,
पिंपळगाव काळे



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्व सावळदबारा नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा!

-: शुभेच्छूक :-
शालिकराम तुकाराम जाधव
बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे
अध्यक्ष सावळदबारा, ता. सोयगाव


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्व सावळदबारा नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा!

-: शुभेच्छूक :-
भास्कर प्रल्हाद सुरडकर
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष
मुंबई, ह.मु. सावळदबारा, ता. सोयगाव



रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १४ एप्रिल २०२४

# 'इंदिरा हटाव'चा नारा विरोधकांच्या अंगलट!

आधुनिक केसरी

**देशात 'नेहरू राज' नंतर 'इंदिरा राज' सुरु झाले! काँग्रेस पक्षाला त्यांच्या 'कर्माची फळे' भोगावी लागत आहेत!.१९७१ च्या लोकसभेच्या पाचव्या निवडणुकीत राष्ट्रीय काँग्रेस पक्षात उभी फूट पडली. त्यावेळी विरोधी पक्षांनी सत्तेसाठी 'इंदिरा हटाव' चा नारा दिला होता,तो त्यांच्या अंगलट आला.२०२४ च्या निवडणुकीत विरोधी पक्ष 'पुनरावृत्ती करत आहे. तो 'मोदी हटाव' घोषणा देत आहे,ती त्यांची मोठी चूक ठरणार आहे.श्रीमती गांधीनी 'गरीबी हटाव'घोषणा देऊन गरिबांना फसविले! तरीही काँग्रेस सवंग घोषणा करत आहे.**

तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरु यांचे निधनाने काँग्रेस पक्षाने प्रभावीशाली नेतृत्व गमावले.काँग्रेस पक्ष दुःखात बुडाला,त्याचबरोबर घटनाकार डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांचे १९५६ ला निधन झाले. नेहरूंनी डॉ.बाबासाहेबांना विधिविभाग बरोबर अन्य नियोजन विभाग देण्याचे मान्य केले होते,पण टाळले गेले.कारण नेहरुंकडून मंत्रिमंडळात त्यांचे महत्व वाढू नये,याची खबरदारी घेतली जात होती.'हिंदु कोड बील संसदेत जसेच्या तसे मंजूर करावे,असे प्रयत्न करता नेहरु मात्र टाळटाळ करत होते,यातून त्यांना अवहेलना सहन होत नव्हती.त्यामुळे त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला,असा उल्लेख डॉ,ज्ञानराज गायकवाड यांच्या 'महामानव' पुस्तकात आहे. काँग्रेस सरकारने देशासाठी बलिदान देणाऱ्या इतर नेत्यांच्या कुटुंबाच्या दुःखाची कधी पर्वा केली नाही.नेहरु हे विरोधी नेत्यांनी निदर्यीपणे वागले पंडित नेहरुं सरकारमध्ये विव्दान नेते श्यामाप्रसाद मुखर्जी मंत्री होते. नेहरूंच्या तुष्टीकरणाचे राजकारणावरुन मुखर्जींनी काँग्रेस पक्ष सोडला. त्यांनी २१ ऑक्टोबर १९५१ मध्ये जनसंघाची स्थापना केली. संसदेत नेहरू व मुखर्जींचा किस्सा की,नेहरुंना माफी मागावी लागली.यामागे दिल्लीच्या नगरपालिकेत काँग्रेस व जनसंघात निवडणुकीवर मुखर्जींनी नेहरु हे 'वाईन व मनी' वापर करत असल्याचा आरोप केला.तेंव्हा नेहरु हे मुखर्जीवर भडकले! त्यांना वाटले की, वाईन बरोबर 'वुमेन' शब्दाचा वापर केला! शेवटी नेहरुंना आपली चूक लक्षात आली व मुखर्जी यांची माफी मागितली. मुख्यमंत्री केजरीवाल यांनी दिल्लीत नेहरुंची 'वाईन व मनी' ची नीती राबविली आहे.यामुळेच आज दिल्लीत आम आदमी पक्ष अडचणीत सापडला आहे.

गांधी हत्येनंतर नेहरु सरकारने राष्ट्रीय संघावर १९४८ मध्ये बंदी घातली. नंतर त्यांना चूक लक्षात आली व बंदी मागे घेतली. २६ जानेवारीच्या राष्ट्रीय स्वंयसेवक संघाला राष्ट्रीय संचलनात सहभागी करुन घेतले.नंतर श्रीमती इंदिरा गांधींनी १९७५ मध्ये व बाबरी ढाचा पाडल्यानंतर संघावर बंदी घातली. पण संघात राष्ट्रीयत्वाची अशी नशा आहे. काँग्रेस संघावर जितके लक्ष्य करेल तितका संघाचा विस्तार वाढेल व तो बलवान होत जाईल!जम्मू -काश्मीरला स्वतंत्र कायद्याला म्हणजे ३७० कलमाला मुखर्जीजींनी तीव्र विरोध केला. देशात दोन "विधान,दोन निशान,दोन प्रधान' चालणार नाहीत,यासाठी विरोध त्यांनी केला. ते काश्मिरला निघाले,त्यावेळेस भारतीयांना तथे केंद्रीय परवानाशिवाय जाण्याची परवानगी नव्हती.पण ते विनापरवाना काश्मिरमध्ये गेले.नेहरु सरकारने त्यांना अटक केली गेली व चाळीस दिवस नजरकैदेत ठेवले!त्यांची प्रकृती बिघडली होती. तेंव्हा डॉ.अली मोहम्मद यांनी इंजेक्शन दिले, कांही वेळातच त्यांचे निधन झाले.मुखर्जींची आई जोगमायादेवींनी नेहरुंना पत्र पाठवून चौकशीची मागणी केली.परंतु नेहरू सरकारने दखल घेतली नाही.मुखर्जींनी काश्मिरसाठी १९५३ मध्ये बलिदान दिले! ते वाया गेले नाही. त्यांचे स्पप्न पंतप्रधान मोदींनी पूर्ण केले.पंडित नेहरू सरकारने व काँग्रेसने त्यांच्या बलिदानाची कधीच दखल घेतली नाही. देश त्यांचे बलिदान विसरणार नाही.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

पं.नेहरू यांचे निधनानंतर काँगेसला हिरा सापडला.आदर्श गांधीवादी नेते लालबहादूर शास्त्री १९६४ ला पंतप्रधान झाले! त्यांच्या कर्तृत्वाने देशाची मान उंचावली. शास्त्री यांची उंची कमी होती.पण'मूर्ती लहान किर्ती महान'असेच कार्य केले. त्यावेळेस देशात अन्नधान्याची तीव्र टंचाई होती! त्यांनी भारतीयांना एक वेळेस उपवास करण्याचे आवाहन केले! लाखोभारतीयांना पालन केले!शास्त्रीजी म्हणजे साधी राहणी व उच्च विचारणीचे होते.राजकारणातील निस्पृह नेता त्यांची ओळख! * जेंव्हा शास्त्रीजी पत्नी व परिवारासह साडी घेण्यासाठी एका दुकानात गेले. पंतप्रधान आले म्हणून दुकानदाराने भारीची साडी काढली पण त्यावेळी त्यांचेकडे तितके पैसे नव्हते,त्यांनी साडी विकत घेतली नाही.तेंव्हा दुकानदाराने त्यांनी ती साडी भेट देण्याचा प्रयत्न केला,पण त्यांनी ती भेट घेण्यास विनम्रपणे नाकार दिला त्यांनी 'जय जवान, जय किसानचा नारा दिला,त्यामुळे शेतकऱ्यांत आत्मविश्वास,आणि जवानात मनोधैर्य वाढविले. काँग्रेस मोदींच्याराष्ट्रहिताच्या धोरणाला व योजनाला विरोध करत आह.कोरोना काळात देशाचे पंतप्रधान मोदी भारतीयांना थाळी वाजविण्याचे सांगितले,याच चूक काय?यातून लोकांत आत्मविश्वास व जागृती निर्माण व्हावी, हाच उद्देश होता. पण नकली गांधीनी घोषणांची टिंगल केली.

१९६५ भारताला- पाकिस्तान युध्दाला समोरे जावे लागले! यात पाकचा पराभव झाला.भारतीय सैन्याने पाकचा पराभव झाला.तेंव्हा सोव्हियत संघाच्या मध्यस्थीने शास्त्री ताश्कंद येथे भारत व पाक करारासाठी गेले. होते. यावेळी भारताचे पंतप्रधान शास्त्री व पाकचे राष्ट्राध्यक्ष आयुबअली यांच्यात करारावर सही झाली. यानंतर रात्री शास्त्री यांचा११ जानेवारी रोजी संशयास्पद मृत्यू झाला त्यांचे अंग निळे पडले होते.त्यांचा मृत्यू विषप्रयोगाने झाला,हे दिसत होते.त्यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करावी, कारण स्पष्ट करावे,अशी मागणी पत्नी श्रीमती ललिता शास्त्री यांनी केली.काँग्रेस सरकारने सरकारने चौकशी केली नाही. कुलदिप नायर यांचे 'बियाँड द लाईन' या पुस्तकात शास्त्रींजीच्या या संशयास्पद मृत्यूचा उल्लेख आहे. २०१९ च्या 'द ताश्कंद फाईल या 'चित्रपटात यावर प्रकाश टाकला आहे.काँग्रेस सरकार कार्यकाळातील अन्यायाच्या घटनेवर चित्रपट निघत आहेत,त्यालाही काँग्रेस नेत्यांचा विरोध करत आहेत.काँग्रेस सरकारने शास्त्रींजींचे पोस्टमार्टम केले नाही,त्यांच्या मृत्यूचे कारण सांगण्यास नकार दिला.पं. नेहरू सरकार निर्दयीपणी वागले !



नेहरुंच्या निधनानंतर गुलजारीलाल नंदा तेरा दिवस हंगामी पंतप्रधान झाले.२४ जानेवारी१९६६ रोजी श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. त्या सत्तेत येताच ७ नोव्हेंबर १९६६ हिंदु हत्याकांड घडविले, देशातील साधू गोरक्षणाच्या मागणीसाठि सुमारे पाच लाख साधू संसदेवर मोर्चा काढला होता.सभा चालू असताना अचानक साधूवर गोळ्या झाडण्यात आल्या! यात सुमारे ५०० साधू मृत पावले व हजारो जखमी झाले. या साधूंचा शाप इंदिरा सरकारला लागला. याबाबत श्रीमती गांधी गृहमंत्री गुलजारीलाल नंदा यांचा राजीनामा घेतला. देशातील गोरक्षक आजही ७ नोंव्हेबर रोजी काळादिवस पाळतात. देशात १९६७ पर्यंत आर्थिक वाढ मंदावली होती.१९६१-६६ पंच वार्षिक योजनेत वार्षिक वाढीचा दर ६ टक्के लक्ष्य होते. वास्तविक विकासाचा दर केवळ २ टक्के होता. चीन युध्दामुळे भारतावर आर्थिक ताण वाढला.'दुष्काळात तेरावा महिना' या प्रमाणे १९६७ मध्ये मध्ये लोकसभेची चौथी निवडणूक काँग्रेसने श्रीमती इंदिरा गांधी यांचे नृत्वाखाली निवडणूक लढविली.या पक्षाला 'आपल्या कर्माची फळे' मिळाली. यावेळी काँग्रेसला सात धक्का बसला. एकूण ५२० जागापैकी व २८३ जागांवर काँग्रेसने विजय मिळविला. काँग्रेसच्या जागेत घट झाली. मताची टक्केवारी ही ४०.७८ टक्के होती. तर जनसंघ पक्षाच्या जागेत वाढ झाली. तो ३५ वर पोंहचला होता. भाकपाच्या जागेत घट त्यांनी २३ जागा मिळविल्या.समाजवादी पक्षाने २३, माकप- १९ द्रविड मुनेत्र कडघम- २५ जागा मिळविल्या.

काँग्रेस पक्षांर्गत श्रीमती इंदिरा गांधींना विरोधी होता,तरी त्या पंतप्रधान झाल्या.काँग्रेस पक्षाच्या ९५ जागात घट झाल्याने पक्षात गांधी विरोधात नाराजी वाढत चालली होती! त्यात श्रीमती गांधी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांचा सल्ला मानत नसत! त्या मनमानी निर्णय घेवू लागल्या. पक्षाचे ज्येष्ठ नेते मोराजजी देसाई हे अर्थमंत्री होते.यांचेत मतभेदाला सुरुवात झाली.जेंव्हा इंदिरा गांधी यांनी ५३ टक्के रुपायांचे अवमुल्यन केले.तेंव्हा देसाई व पक्षाचे नेते के. कामराज यांनी तीव्र नाराज व्यक्त केली.देसाई यांनी इंदिराजींना' गुंगी गुडीया' म्हंटले!काँग्रेसमध्ये सरळ 'सिंडेकट' व 'इंडिकेट' असे दोन गट पडले!त्या झाकीर हुसेन यांना राष्ट्रपती करण्यात त्या यशस्वी झाल्या! तसेच बँकांचे राष्ट्रीयकरण निर्णय घेतला गेला.राष्ट्रपती झाकीर हुसेन यांचे निधनानंतर नवीन राष्ट्रपतींपदाची निवडणूक झाली.काँग्रेसने पक्षाने संजीव रेड्डी यांचे उमेदवारी दिली. पण श्रीमती गांधींनी व्ही. व्ही. गिरी यांचे समर्थन केले.यामुळे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार संजीव रेड्डी हे पराभूत झाले.त्यामुळे पक्षाचे अध्यक्ष एस.निजिलिंगअप्पांनी पंतप्रधान इंदिरा गांधीवर यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करत पक्षातून काढले. याचा परिणाम सरकार अल्पमतात आले.या घटनेपासून काँग्रेस (ओ) आणि काँग्रेस (आय) असे विभाजन झाले यात १९७१च्या लोकसभेच्या निवडणुकीला एकवर्ष आधीच समोरे जावे लागले. १९७१ च्या पाचव्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस ओ.विरुध्द काँग्रेस आय सामना असा सामना झाला.काँग्रेस पक्षात फूट पडल्याने बैलजोडी हे चिन्ह गोठविले. काँग्रेसची स्थापना १८८५ मध्ये इंग्रज अधिकारी ॲलम ऑक्टेव्हिअन ह्युम केली होती.ती मूळ काँग्रेस अस्तित्वातच राहिली नाही व श्रीमती इंदिरा गांधींनी काँग्रेस आयने गाय वासरु चिन्ह घेतले.काँग्रेस आयचे नेतृत्व श्रीमती इंदिरा गांधी यांनी केले.काँग्रेस (ओ )चे नेतृत्व मोरारजी देसाई यांनी केले होते.निवडणूक पूर्वी राष्ट्रीय काँग्रेस पक्ष (ओ) संयुक्त सोशलिस्ट पार्टी, प्रजा सोशलिस्ट पार्टी,स्वतंत्र पक्ष, भारतीय जनसंघ, आदींनि श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पक्षाला पराभूत करण्यासाठी विरोमी पक्षांनी आघाडी करुन त्यांचे विरोधात एक उमेदवार देण्याचा निर्णय घेतला होता.तेंव्हा विरोधी पक्षाने "इंदिरा हटाव' चा नारा दिला होता.तो त्यांच्या अंगलट आला. तर श्रीमती गांधी यांनी 'गरीबी हटाव' नारा दिला व गरिबांना ठकविले! गरीबी, बेकारी, महागाई ही काँग्रेस देण आहे,काँग्रेस सरकारने भारताचे ५५ वर्षे वाया घातले! श्रीमती गांधी नेतृत्वासमोर काँग्रेस संघटन पक्ष दुबळा ठरला. काँग्रेस आयने सर्वाधिक ३५२ जागेवर दमदार विजय मिळविला. तर मतांची टक्केवारी ४३.६८ होती. यात काँग्रेस संघटचा सुपडासाफ झाला.त्यांना केवळ १६ जागा मिळाल्या. जनसंघ-२२, माकप- २५, भाकप-२३ व द्रविड मुनेत्र कडघम-२३ जागेवर विजय भिळवला. काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांना बाजूला सारुन श्रीमती गांधी यांनी केंद्रात पुन्हा सत्ता मिळविली. स्वातंत्र्यानंतर पाकचे,पश्चिम व पूर्व पाकिस्तानचे भाग होते. पाकचे लष्कर प्रमुख याह्याखाने पूर्व पाकमध्ये ३० लाखांचा नरसंहार केला. महिलांवर बलात्कार केले.त्यामुळे लष्काराच्या विरोधात लोकांनी बंड केले.१९७१ मध्ये शेख मुजीबच्या अवामी लिग पक्षाला बहुमत मिळाले. पण पाक सरकारने नकार दिला.तेंव्हा शेख मुजीब यांनी स्वातंत्र्याची घोषणा केली. पाकने लष्करी कारवाई सुरु केली.तेंव्हा भारताने ९० हजार लष्करी सैनिक 'मुक्तीसेना'म्हणून पाठविले.

भारतीय लष्करासमोर पाकने गुडघे टेकले. त्यामुळे पूर्व पाकिस्तान भाग दि. १६ डिसेबर १९७१ रोजी स्वतंत्र बांगला राष्ट्र निर्माण घोषित झाला. श्रीमती गांधीनी पाकचे दोन तुकडे केले. याचे श्रेय श्रीमती गांधीना दिले लष्कराला दिलेले नाही? काँग्रेसने तर हा निवडणुकीत राजकीय मुद्दा बनवविला होता.विरोधी पक्षाने श्रीमती गांधींच्या पाक विरोधी भूमिकेचे स्वागत केले!विरोधी पक्ष नेते अटलबिहारी वाजपेयी श्रीमती गांधी यांना'दुर्गा' म्हंटलेले नसताना त्यांच्या तोंडी घालून पाठ थोपटून घेतली. स्वतंत्र बांगला देश निर्माण झाल्याच्या प्रित्यर्थ शे.का. पक्षाचे ज्येष्ठ नेते स्व. केशवराव धोंडगे यांनी कंधार येथे विजय स्मारक उभारलेले आहे. श्रीमती गांधी यांच्या सामर्थ्यांचे आजही कौतूक जाते. प.नेहरूंच्यानंतर कन्या इंदिरा राज सुरू झाले.श्रीमती इंदिरा गांधी ह्या हुकूशाहीवृत्तीने वागल्या.त्यांनी भारतीय घटना पायमल्ली कशी केली व लोकशाहीचा हत्या केली, याची संपूर्ण कथा पुढील लेखात!

# कसा केला तैवानने भूकंपाशी सामना ?



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**तैवान या स्वशासित लोकशाही प्रधान देशाने ७.४ रिक्टर स्केलच्या भूकंपाने हादरून टाकले. पण आपत्ती व्यवस्थापनाचा अजोड आदर्श प्रयत्न समोर ठेवून तैवानने आशियायी देशापुढे नवा वस्तुपाठ निर्माण केला आहे. पुढे आणखी धक्के बसले तरी संकटाशी सामना करण्यास तेथील जनता निर्भय बनून समर्थपणे वाटचाल करत आहे. सावधानता व सुरक्षा व समर्थ व्यवस्थापन ही तैवानच्या यशाची गुरुकिल्ली होय. चीनच्या पूर्वकिनारपट्टीवरील हुआलियन हे एक मोठे सुंदर शहर. ग्रामीण भागाच्या परिसराने व्यापलेले. तैवानच्या पूर्व किनापट्टीवरील निसर्गरम्य नयनरम्य अशा या प्रदेशात विदेशी पर्यटन मोठ्या प्रमाणात येत असतात. परंतु येथील जनजीवन भूकंपाने उध्वस्त झाले नाही.**

तैवान बेटावरील लोकांनी या भूकंपाशी मोठ्या जिद्दीने सामना केला. हे कसे घडले हे समजून घेण्यासारखे आहे.

तैवानमध्ये ७.४ रिक्टर स्केलच्या भूकंपाने जगाला धक्का बसला. पण दोन दशकाच्या तयारीमुळे तैवानमधील लोक मात्र मजबूत आणि भक्कम अशा तयारीनिशी या भूकंपाशी लढले, झुंजले आणि त्या संकटातून समर्थपणे बाहेर पडले. तैवानने हे यश कसे संपादन केले, भूकंपाशी तैवानने कशी लढाई केली आणि या आपत्तीशी या छोट्या बेटावर राहणाऱ्या लोकांनी कसा सामना केला, हे अभ्यासणे म्हणजे तैवानी लोकांच्या शर्थीच्या प्रयत्नाचे आणि त्यांनी दिलेल्या झुंजीचे कौतुक करणेच होय. एखाद्या देशावर आलेले नैसर्गिक संकट त्या देशातील लोक आणि सरकार सामुदायिक प्रयत्नातून कशारितीने परतावून लावू शकतात याचे हे एक उत्तम उदाहरण होय. भारतासारख्या देशाला या नैसर्गिक आपत्तीशी लढण्यात तैवानी जनतेने दिलेला लढा खरोखर समजून घेण्यासारखा आहे. त्यामुळेच तैवानच्या भूकंपाचा शोध आणि बोध घेणे उचित ठरेल. देशातील लोक एखाद्या आपत्तीपासून धडे घेतात, शहाणे होतात आणि सुधारणा करतात तेव्हा होणारे नुकसान हे कमी असते. त्याची तीव्रता सुसह्य होते हीच गोष्ट तैवानच्या या नव्या संकटाने सिद्ध केली आहे. तैवानला भूकंपाचा सहा वर्षापूर्वीचा अनुभव होता. काय करावे, काय करू नये हे नेमके माहीत होते. भूकंपाची शक्यता होती. परंतु आमची पूर्वतयारीही भक्कम होती त्यामुळेच आम्ही या संकटाशी धीरोदात्तपणे सामना करू शकलो असे या नगरीच्या महापौरांचे मत बोलके आहे.

२०१८ च्या भूकंपापासून तैवानने धडा घेतला. शासकीय यंत्रणा, सार्वजनिक सेवेतील लोक, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांच्यामध्ये चांगला समन्वय होता. त्या शहरामध्ये जेव्हा भूकंप झाला, तेव्हा शेजारच्या शाळेमध्ये पुनर्वसनाची व्यवस्था होती. तसेच १३० आपत्ग्रस्त लोकांना शेजारच्या शाळेतील इमारतीत ताबडतोब स्थलांतरीत करण्यात आले आणि दोन तासाच्या आत त्यांना मदतीसाठी सर्वकाही सहाय्य देण्यात आले. नागरीक, सरकारी यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्था जेव्हा हातात हात घालून काम करतात, तेव्हा नुकसान कमी होते. सफाई, पुनर्रचना संकटाशी सामना, मदतीचा हात या सर्व बाबतीमध्ये सर्वांनी मिळून कमीत कमी वेळामध्ये यंत्रणा तयार केली, ती उभी केली आणि लोकांना मदतीचा हात दिला. त्यामुळे संकटाची तीव्रता कमी झाली असे लक्षात येते. हा प्रदेश तेथील २ टेक्टॉनिक प्लेटमधील हालचालीमुळे भूकंप प्रवण बनला आहे. पण तरीदेखील तैवानी लोक भूकंपाची शक्यता लक्षात घेऊन चांगलीच मानसिकता ठेवतात आणि तयारीही करतात. २०१६ च्या भूकंपात शंभराहून अधिक लोक मरण पावले होते. त्या तुलनेत या वेळच्या मृतांची संख्या दोन आकड्यांच्या आतच आहे. त्याचे कारण म्हणजे लोकांनी लासराव, भक्कम पूर्वतयारी आणि यंत्रणेतील समन्वय हेच असल्याचे म्हणावे लागेल.

१९९९ साली झालेला भूकंप अधिक संहारक होता. त्याला '९२१ भूकंप' असे म्हणतात कारण ९९ साली २१ सप्टेंबरला हा भूकंप झाला म्हणून तेथे ९२१ या नावाने हा भूकंप ओळखला जातो. ९२१ चा अनुभव आपत्ती व्यवस्थापन करणे, जुन्या इमारतींची पुनर्रचना करणे, त्यासाठी कोड तयार करणे या प्रकारच्या पूर्वतयारीसाठी धडे देणारा ठरला आणि हे धडे वळ घेतले आणि विसरले, 'नळी फुंकले सोनारे इकडून तिकडे गेले वारे' असे मात्र तैवानने केले नाही. प्रत्येक भूकंपातून त्याने धडा घेतला आणि आपल्या व्यवस्थेत सुधारणा केल्या त्यामुळे तैवानमधील भूकंप सौम्य होऊ शकला. तैवानच्या इतिहासात गेल्या २५ वर्षातील सर्वात शक्तिशाली भूकंपात फक्त ९ ठार आणि ९०९ जखमी झाले व एका राष्ट्रीय वाहनातून प्रवास करणारे ५० जण बेपत्ता झाले. हा अपवाद वगळता, तैवानमध्ये एवढा मोठा शक्तिशाली भूकंप होऊनही हा देश सुरक्षित कसा राहिला, लोकांनी भूकंपाशी सामना कसा केला, याची कहाणी मोठी उद्बोधक आणि तेवढीच मार्गदर्शक पण आहे. विरळ लोकसंख्या असलेल्या तैवानच्या पूर्व किनाऱ्यावरील हुआलियन या प्रांतानजीक या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. विरळ लोकसंख्या असलेल्या पूर्व किनाऱ्यावरील काही भागामध्ये इमारती विशिष्ट कोनामध्ये झुकल्या. तैवानमधील पुनर्वसन यंत्रणा इतकी तत्पर होती की, त्यांनी सहा महिने आधीच त्या इमारती पाडण्यास सुरूवात केली होती. पुनर्वसन कार्यातील उपकार्यवाह वारली लोम यांच्या मते, युरेनस ही ७ मजली इमारत असुरक्षित होती. तिच्यातील स्थलांतर आधीच झाले होते. भूकंपाने तिचे दोन मजले जमिनीमध्ये गाडले गेले. परंतु इमारत मात्र तशीच राहिली. हुआलियन या नगरीचे महापौर हसू चेन वै यांच्या म्हणण्यानुसार, या शहरातील खराब झालेल्या इमारतीतील सर्व रहिवाशांचे स्थलांतरण करण्यात आले आहे आणि तेथील व्यवसाय, उद्योगांनासुद्धा इमारत रिकामी करण्यास सांगण्यात आले आणि त्यांनी तसे केले सुद्धा. तसेच धोकादायक असलेल्या इमारती पाडण्याचे काम सुरू आहे. अशा प्रकारची सावधगिरी तैवानमधील लोकांनी पाळल्यामुळे तेथील भूकंपाची वित्तहानी कमी झाली आहे. रिक्टर स्केलपेक्षा अधिकचा भूकंप हा अधिक तीव्रतेचा मानला जातो. त्याचे कारण असे की, या भूकंपलहरी तिचे मापन केले असता, त्यांचा आकार व गती किती मोठे आहे हे स्पेस लॉगॅरिदमिक प्रक्रियेवरून कळू शकते. याचाच अर्थ असा की, भूकंपाच्या मापनामध्ये आकाराच्या दहापट उडी दर्शविते. त्यावरून भूकंप किती भयानक ठरू शकतो, किती तीव्र



ठरू शकतो याची कल्पना येते. अशाप्रकारे आता शिस्मोग्राफवरून भूकंपाच्या लहरी आणि त्यांचा सामाजिक आर्थिक परिणाम व त्याची उंची ही मोजता येणे शक्य झाले आहे.

काही दमदार पावले आपत्ती व्यवस्थापनाचे कायदे मजबूत करणे ही सुद्धा एक फार महत्त्वाची बाब होती. कायदे असतात पण त्यांची अंमलबजावणी कागदावरच असते. पण तैवानी लोकांनी मात्र या कायद्यांच्या पद्धतशीर अंमलबजावणीसाठी डोळ्यात तेल घालून प्रयत्न केले ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. एरवी भूकंप झाला की, पुढचा भूकंप येईपर्यंत अशियातील लोक विसरतात. पण तैवानमधील लोक मात्र मोठे चतुर आहेत. त्यांनी २१ सप्टेंबर हा 'भूकंप जागृती दिवस' म्हणून साजरा केला आहे. त्या दिवशी ते मॉकड्रिल करतात, कवायती करतात आणि मोबाईलवरून लोकांना सुरक्षिततेचे संदेश देतात. म्हणजे पुन्हा २१ सप्टेंबर होऊ नये म्हणून ते डोळ्यात तेल घालून प्रयत्न करतात. त्यांची ही जागृती खरोखर आशियातील इतर देशांनी शिकण्यासारखी आहे. कार्यविभागणी व २०१८ मध्ये जो भूकंप झाला त्यापासून धडे घेऊन कार्यविभागणी आणि विशेषीकरण या तत्त्वानुसार प्रत्येक गटाला कामे वाटून देण्यात आली आणि कुठल्या वेळी, कोणती जबाबदारी, कोणी पार पाडावयाची हे ठरविण्यात आले. काही वैज्ञानिक व्यवस्थापनच त्यांनी केले. भूकंपाच्या संकटाशी मुकाबला करण्यासाठी प्रत्येक समूहाला कामे वाटून देऊन सामुदायिक जाणीव जागृतीतून कार्यविभागणी आणि विशेषीकरण या तत्त्वाचे पालन केल्यामुळे तैवानला यावेळी भूकंपाशी चांगला सामना करता आला. मिन आन म्हणजे भूकंपाच्या संकटाशी सामना करावयाच्या कवायती. अशा नागरी कवायती दरवर्षी तैवानमध्ये घेतल्या जातात. शिवाय भूकंप संदेश वहनासाठी मोबाईलवरून विशिष्ट प्रकारच्या आवाजात संदेश दिले जातात. चीनच्या संभाव्य आक्रमणाच्या विरुद्ध जागृतीसाठी जे संदेश दिले जातात, त्याच पद्धतीने भूकंपाशी सामना करण्याचे संदेश सुद्धा दिले जातात. म्हणजे आपल्या कम्युनिकेशन यंत्रणेचा म्हणजे संज्ञापन यंत्रणेचा भूकंपाशी सामना करण्यासाठी तैवानने केलेला उपयोग एक उत्तम वस्तुपाठ म्हणावा लागेल. तैवानने आपल्या आर्थिक व्यवहाराचे डिजिटलीकरण केले आहे आणि हे डिजिटल नेटवर्क व्यवस्था तयार करण्यास सहाय्यभूत ठरले आहे. भूकंपामुळे ही व्यवस्था प्रभावित होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आणि त्यांच्या कुठल्याही व्यवस्थेवर नकारात्मक परिणाम झाला नाही. हे विशेष होय. तेव्हा भूकंपाच्या काळात लोकांचे संदेशवहन सुरळीत राहिले. म्हणजे लोकांना व्यवस्थेविषयी विश्वास वाटतो ही गोष्ट तैवानने जी काळजी घेतली त्यावरून सिद्ध झाली आहे. तैवानमधील अमेरिकन राजदूत सँड्रा औडकिर्क यांनी म्हटल्याप्रमाणे, तैवानने भूकंपाशी सामना कसा करावयाचा आणि लोकांचे जीवन कसे सुरक्षित ठेवावयाचे याचा एक वस्तुपाठच जगापुढे ठेवला आहे. तैवानी लोकांची जिद्द, इच्छाशक्ती आणि सामुदायिक शहाणपणाचा हा एक परिपाक आहे असे त्यांनी म्हटले आहे. तेव्हा जगातील ६-७ देशांचीच मान्यता असलेल्या आणि लोकशाही पद्धतीने कारभार करणाऱ्या तैवानने भूकंपाशी केलेला हा सामना खरोखर महत्त्वाचा आणि तेवढाच निर्णायक म्हटला पाहिजे.

तैवानमधील लोक, सरकार आणि स्वयंसेवी संस्थांनी भूकंपाशी कसा सामना केला याची मिमांसा केली असता पाच प्रमुख गोष्टी समोर येतात. पहिली गोष्ट म्हणजे भक्कम पूर्वतयारी. तैवानमधील सरकारने मागील चार अनुभवांवरून धडे घेऊन भूकंपाशी कुठल्याही प्रसंगी सामना करण्याची भक्कम पूर्वतयारी केली आहे. दुसरे कारण म्हणजे प्रगत तंत्रज्ञानाचा वापर. विज्ञान तंत्रज्ञानाच्या आधारे भूकंपसूचक संदेश व यंत्रणा तयार केली आणि ही यंत्रणा लोकांना ताबडतोब जागी करते. भूकंपाच्या शक्यतेची आणि माहितीची जेव्हा ताजी आकडेवारी प्राप्त होते, तेव्हा ती लोकांना ताबडतोब पाठविली जाते आणि लोकांना सतर्क केले जाते. जेणेकरून, जीवितहानी, वित्तहानी कमी होते. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रभावी लोकशिक्षण प्रसार माध्यमांचा उपयोग करून तैवानमधील जनतेला सातत्याने आपत्तीशी झुंज कशी द्यावयाची याबद्दल शिक्षण दिले जाते व त्यांना सतर्क केले जाते. चौथी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कार्यव्यवस्थापन आणि विभागणी. कार्याचे विभाजन आणि विशेषीकरण. भूकंपाशी सामना करताना शासकीय यंत्रणा, सार्वजनिक सेवा संस्था यामध्ये कमालीचा समन्वय आहे. परदेशातून येणारी मदत आणि स्थानिक मदत ही गरजू लोकांपर्यंत तत्परतेने पोहोचविली जाते. पाचवी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जीवन पूर्ववत करण्यासाठी करावयाचे प्रयत्न. तैवानी लोकांनी आपले जीवन भूकंपानंतर पूर्ववत करण्यासाठी केलेले प्रयत्नही इतके गतिमान असतात की, अल्पावधीतच जीवन पुन्हा सुरळीत होते. येथे भूकंप झाला होता याचा मागमूसही रहात नाही. त्यामुळे येथील सरकारने जनतेला जणू एक सुखद धक्का दिला आहे.

या सर्व चर्चेचे सार असे की, ७.४ रिक्टर स्केलचा मोठा भूकंप होऊनही तैवानमधील जनतेने ज्या पद्धतीने त्याच्याशी सामना केला आणि जगापुढे एक आदर्श ठेवला आहे, विशेषतः एक छोटेसे आशियाई बेट जे मोठ्या लाल चिनच्या कोटाखाली बसलेले आहे. त्याच्यावर सतत आक्रमणाचा धोका असतो. पण आपत्ती मानवाने लादलेली असो की, निसर्गाने आणलेली असो. कोणत्याही आपत्तीशी संघर्ष कसा करावयाचा याचे उदाहरण म्हणजे तैवानची इच्छाशक्ती होय. प्रबळ इच्छाशक्ती आणि प्रभावी मूल्ये असतील तर कोणत्याही संकटाशी राष्ट्र सामना करू शकते हाच तैवानच्या भूकंपाचा संदेश होय असे म्हणता येईल.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री सक्षमीकरण



कल्पना घुगे
छत्रपती संभाजीनगर.

आधुनिक केसरी

**'दलितांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हे वाक्य आपल्या नेहमीच कानावर पडते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे केवळ दलितांचेच नेते..! त्यांनी फक्त दलितांसाठीच कार्य केले..! असा असंख्य लोकांचा सुर आपल्याला समाजात वावरत असताना ऐकायला मिळतो. परंतु वास्तव मात्र काही वेगळेच आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य केवळ एक धर्म, पंथ, जात या चौकटीत बंदिस्त करता येईल एवढे मर्यादित नसून ते सर्वव्यापी आहे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ दलितांसाठी नव्हे तर देशातील समस्त वंचित,शोषित घटकांसाठी कार्य केलेले आहे. यामध्ये शेतकरी, शेतमजूर, कामगार, महिला, इ.समावेश होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण कार्याचा आढावा घेत असताना स्त्री सक्षमीकरणात त्यांचे भरीव योगदान असल्याचे आपल्याला दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री सक्षमीकरणात दिलेल्या योगदानाची मांडणी आपल्याला पुढीलप्रमाणे करता येईल. प्राचीन काळापासून स्त्री ही विविध बंधनात कायम बंदिस्त असल्याचे आपल्याला दिसून येते. समाजाने ठरवून दिलेल्या लक्ष्मणरेषा स्त्रीला ओलांडता याव्यात, स्वतःबरोबरच,कौटुंबिक,सामाजिक विकासास गती मिळावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुरूषांप्रमाणेच स्त्रीयांना हक्क मिळवून देण्यासाठी स्त्रीयांचे मनुष्यत्व नाकारणाऱ्या मनुस्मृतीचे २५ डिसेंबर १९२७ साली महाड येथे दहन केले व समस्त स्त्री वर्गाचा बंदिस्त झालेला श्वास मोकळा केला. एवढेच नव्हे तर स्त्री सक्षमीकरणाला अधिक गतिमानता देण्यासाठी कायद्याचा आधार घेऊन २१ ऑगस्ट १९४८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीसमोर 'हिंदू कोड बील' मांडले. हिंदू कोड बील म्हणजे स्त्री स्वातंत्र्याचा एक प्रकारचा जाहिरनामाच म्हणता येईल. या हिंदू कोडबीलामध्ये आंतरजातीय विवाहास मान्यता, एक पत्नी तत्वाचे बंधन, पुरूषां प्रमाणेच स्त्रीयांनासुध्दा घटस्फोट मागण्याचा अधिकार, पोटगी, वारसा हक्क, दत्तक विधान, वडिलोपार्जित संपत्तीत समान वाटा, पूर्नविवाह, राजकीय व शैक्षणिक अधिकार यांचा समावेश होता. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले हिंदू कोड बील सभागृहात नामंजूर करण्यात आले. हिंदू कोड बील सभागृहात नामंजूर केल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मंत्रीपदाचा तडकाफडकी राजीनामा दिला. त्यावेळी हिंदू कोड बील जरी नामंजूर झाले असले तरी त्यात असलेल्या महत्वाच्या तरतुदी आज कायद्याच्या माध्यमातून अंमलात येत आहेत. यात हिंदू विवाह कायदा १९५५,विशेष विवाह कायदा १९५४, हिंदु वारसा हक्क कायदा १९५६, हिंदू उत्तरधिकार कायदा १९५६, हिंदू दत्तक व निर्वाह कायदा १९५६ इ. प्रमुख कायदे आपल्याला सांगता येतील.

१९४२ रोजी नागपूर येथे 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वुईमन्स कॉन्फरन्स' आयोजित करण्यात



आली होती. या कॉन्फरन्स मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महिलांना उद्देशून म्हणाले होते की, "स्त्रीयांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजतो. म्हणुन सर्व दुर्गुणांपासून दुर रहा व आपल्या मुलाबाळांना शिक्षण द्या." महामानवाचे हे उद्गार म्हणजे स्त्री सक्षमीकरच्या दूरदृष्टीकोनाचे द्योतक म्हणता येतील. महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षण ही मुलभूत गरज आहे हे ओळखून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मुलींना मोफत शिक्षण मिळावे अशी कायद्यात तरतूद केलेली आहे. त्याचबरोबर व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात कामगार मंत्री म्हणून कार्यरत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २१ फेब्रुवारी १९२८ रोजी मुंबई असेंब्लीत बजेटवरील चर्चेत सहभाग घेऊन महिला कर्मचाऱ्यांना बाळांतपणात रजा मिळण्याच्या विधेयकाचे जोरदार समर्थन केले. त्याबाबतचा खर्च शासनाने व मालकाने सहन करावा' असे सुचवले.' समान कामासाठी समान मोबदला' या तत्वाचा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रदीर्घ अशी स्वतंत्र भारतीय राज्यघटना लिहिली.या राज्यघटनेत स्त्री व पुरूषांना विकासाच्या समान संधी प्राप्त करून देण्याच्या तरतुदी केलेल्या आहेत.या तरतुदी म्हणजे स्त्री सक्षमीकरणासाठी उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.यामध्ये खालील तरतुदींचा समावेश होतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री सक्षमीकरणासाठी आपले भरीव असे योगदान दिलेले आहे. या भरीव योगदानामुळेच आजघडीला विविध क्षेत्रात अनेक महिला या भरारी घेत असताना दिसत आहेत. परंतु आज ही स्त्री सक्षमीकरण हे पूर्णपणे झालेले आहे,असे आपल्याला म्हणता येणार नाही. कारण आज प्रगत समजल्या जाणाऱ्या समाजात स्त्रीभृणहत्या,अमाप अशा हुंड्याची मागणी, हुंड्यासाठी छळ,खून इ. घटना पहायला मिळतात. महिला जरी शिक्षण घेऊन प्रगत झाल्या असल्या तरी त्यांच्यावर लादलेली जाचक रूढी,परंपरा इ. बंधने अजूनही समाजाने तोडलेले नाहीत, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. ख-या अर्थाने स्त्री सक्षमीकरण होण्यासाठी सर्वप्रथम प्रत्येक स्त्रीने जाचक बंधने जुगारून देऊन परिवर्तनाची सुरूवात स्वतः पासून करायला हवी. तरच खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्त्री सक्षमीकरणासाठी आपले योगदान देणाऱ्या महामानवांच्या संकल्पनेतील निकोप असा समाज निर्माण होईल,यात शंका नाही.



प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये
संपर्क : 91580 64068

# चला, बाबासाहेबांची संगत करूया

आधुनिक केसरी

**महामानव कालातीत असतात. ते आपल्या अस्तित्वाने आपला वर्तमान फुलवून टाकतात आणि भविष्यकाळ कायमचा जागृत करून जातात. वृक्षाप्रमाणे स्वतः अंगावर ऊन, वारा, पाऊस झेलून भविष्याला महान विचारांची सावली, ग्रंथरूपी सुगंध आणि विचारांची फळे अनंत काळासाठी आपल्याला विनामुल्य मागे ठेवून जातात. सज्जनहो, आज आपण बोधिसत्व, महामानव, प्रज्ञासूर्य, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करतांना सर्वांनीच त्यांची नित्य संगत करणे काळाची गरज बनली आहे.**

भारत मातेच्या वीर पुरुषांच्या अहोरात्र संघर्ष, कष्टाने आणि रक्ताने स्वतंत्र झालेली भारत माता आणि तिचे स्वातंत्र्य आपल्याला अबाधित, चिरकाल ठेवतांना इथला क्रांतीचा, नवनिर्माणाचा, स्वातंत्र्याचा विचार चिरंतन, जिवंत ठेवावा लागणार आहे. मित्रहो, सत्याच्या, क्रांतीच्या मार्गावर चालणाऱ्या लोकांसाठी काळ नेहमीच खडतर असतो. ज्या ज्या महापुरुषांनी जगाला नवा, सत्याचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला त्यांच्या जीवनात त्यांना प्रचंड संघर्ष करतांना त्यांच्या जीवनाचा शेवट गोड झालेला आढळत नाही. अगदी सॉक्रेटीस, रोमेल, येशू ख्रिस्त, ज्ञानोबा, एकनाथ, जोतीबा, सावित्रीबाई, बाबासाहेब आणि अलीकडच्या समाजसुधारकांचा शेवट खडतर झालेला इतिहासाला माहिती आहे. याचा अर्थ काळ बदलला की; सत्याची कास धरणारी नवीन माणसे निर्माण व्हायला पाहिजेत की नाही? हा सतत सतावला जाणारा प्रश्न मला नेहमीच सतावत असतो. आज काल सगळीकडे केवळ चर्चा करणाऱ्या लोकांच्या टोळ्या दिसताहेत मात्र कुणीही मांजराच्या गळ्यात घंटा बांधायला धजावत नाही. ठीक आहे. हे ही दिवस जातील. असे असले तरी अलीकडच्या दहा वर्षात माणसं प्रचंड बदलतांना दिसत आहेत. एकीकडे क्रांतीच्या वल्गना करतांना दुसरीकडे माणूस भ्रांती हरवत चाललेला दिसतोय. वेगवेगळे इझम आणि विविध प्रकारच्या कट्टरता माणसातील खरा माणूस झाकाळून टाकत आहेत. अगोदरही माणसांचे संघर्ष होते, परंतु त्याला एवढे टोकदार रूप नव्हते. टिळक-आगरकर, गांधी-आंबेडकर इत्यादी विचारवंत धुरीण लोकांमध्ये मतभेद होते परंतु मनभेद मात्र नव्हते. ही सगळी माणसे आपल्या वैचारिक अधाष्ठानावर ठाम असतांना कधीही कुणी हिंसेचा मार्ग अवलंबिलेला वाचनात नाही. आज चित्र यापेक्षा प्रचंड बदलले आहे. जात, धर्म, रंग या बाबतीत माणसे कट्टर झालेली पाहून येणारा काळ कसा असेल( ?) याची भीती वाटते! जात, धर्म, रंग याला अती स्वार्थाची जोड दिली की त्याचे बीभत्स स्वरूप समोर येत असते. जगाला प्रेम अर्पावे सारखे काव्य, वसुधैव कुटुंबकम वचन किंवा सत्यम शिवम सुंदरम सारखी गीते कालबाह्य होऊन फक्त ऐकायलाच शिल्लक राहतील का? असा



प्रश्न मनाला पडतो. त्यात कविवर्य इंद्रजीत भालेराव सरांच्या 'गर्भखुणा' कवितेतील हे सिद्धच झालंय की लोकांना प्रेम नकोय विद्वेष हवाय पण असं कसं होऊ शकतं ?
विचार करणाऱ्या प्रत्येकाला हा प्रश्न पडलाय
ह्या ओळी आणखीनच अस्वस्थ आणि अंतर्मुख करतात. असे असले तरी महापुरुष आपल्या देदीप्यमान चरित्राने आपल्यासोबत धीरोदात्तपणे उभे असतात हे विसरून चालणार नाही.
त्यातल्या त्यात डॉ.भीमराव रामजी आंबेडकरांसारखा प्रज्ञावंत महामानव नित्य सोबतीने घेतल्यास आपल्याला खडतर काळात अवघड होत चाललेला रस्ता सुकर व्हायला लागतो. अगदी वयाच्या नवव्या वर्षापासून संघर्षात वाढलेल्या बाबासाहेबांना आपल्याला आपले सन्मित्र बनवावे लागेल. बाबासाहेबांचा एक एक दिवस आणि त्यांच्या जीवनातील एकेका प्रसंगाची जाण आणि भान ठेवून त्यांच्या लेखणीचे सामर्थ्य सोबत बाळगावे लागेल. जगातली देखणी असणारी बाबासाहेबांची लेखणी आपल्याला सोबत बाळगावी लगेल. जगात आतापर्यंत या लेखणीने अनेक क्रांतीची बीजं पेरली आहेत. त्यासाठी आपण बोधीसत्वाच्या लेखणीचा वारसा जपणे काळाची गरज आहे. अलीकडे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे; परंतु त्याप्रमाणात क्रांतिकारी, सडेतोड लेखनाचे प्रमाण दिवसेंदिवस अत्यल्प होत चालले आहे. शिकलेल्या लोकांनी आपल्या रोखठोक लेखणी म्यान केल्यामुळे इथे अविचाराचे तणकट फोफावले आहे. त्याच्या जोडीला त्याग नावाची कृती तर कुठेच दिसायला तयार नाही. पोटार्थी आणि जगण्याला हापापलेली माणसे कधीच क्रांती करू शकत नाहीत. त्यासाठी लेखणी आणि विचाराला त्यागाची जोड दिल्यास क्रांती फार दूर नाही. नक्कीच यात काही निरपराध, निष्पाप, विचारवंत लोकांचे बळी जातील, पण तेच नव्या पिढीचे नवे महात्मे असतील! क्रांतिकारी, नवीन महात्मे आणणार तरी कुठून? भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर केवळ भाषण, मिरवणूक, लेख, पुस्तके छापण्याचे विषय नसून तो जीवनात अंगीकारण्याचा एक सर्वोत्तम,महान मार्ग आहे. भीम विचारांचा वसा घेणे काळाची गरज बनली आहे.

**भिम माझा जीव आहे**
**गोर गरिबांची कीव आहे**
**विचारतोस काय गड्या?**
**भीम भारत जाणीव आहे**

असा विचार करून हा महान विचार नित्य सोबत बाळगावा लागेल. सत्यासाठी जीवनात संघर्ष, लोकांना अंगावर घेणे याची सवय लावून घ्यायची असेल तर बाबासाहेबांची सतत संगती अत्यावश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने भारतीय संविधान आपला जीव की प्राण आहे( ! ) असे समजून त्याच्या रक्षणासाठी सदैव तत्पर आणि सज्ज असलेच पाहिजे. आता आपल्याला अभ्यास करून नवीन संविधान लिहिण्याची गरज नाही. फक्त डोळ्यात तेल घालून मोफत मिळालेला हा अनमोल खजाना जपावा लागणार आहे. असे करतांना आपल्यात कोणतीही कट्टरता येता कामा नये. बाबासाहेबांचा एक एक विचार आणि महान ग्रंथ संपदा आपल्याला सोबतीने ठेवावी लागेल. असे असले तरी त्यांची व्यासंगी वृत्ती, जिद्द, चिकाटी आणि एखाद्या विषयाचे संशोधन करून त्याची मांडणी कशी करावी? हे ही शिकून घ्यावे लागेल. एखाद्या प्रश्नाच्या मुळाशी कसे जावे? त्याची सोडवणूक कशी करावी? हे आपल्याला त्यांच्याकडून शिकावे लागेल. असे असले तरी बहुजनांचे विखुरलेले संघटन मजबूत करावे लागेल. विविध जाती, धर्मातील विखुरलेल्या आंबेडकरवादी लोकांची एक वज्रमुठ बांधावी लागेल. आपला संघर्ष कुण्या व्यक्ती विरुद्ध न उभारता सर्वांनी एकजुटीने देशाच्या उत्थानासाठी काम करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी इथे प्रत्येकाला आपल्यातील 'मी' बाहेर काढून 'आम्ही' व्हावे लागेल. या वेळी केवळ देश हा धर्म सोबत असायला हवा.

बाबासाहेबांची प्रज्ञा, शील, करुणा हे तीन मूलगामी शस्त्र सोबत बाळगतांना आपले स्वत्व बाजूला ठेवावे लागेल. मोठ्या मनाने बाहेर यावे लागेल. अगोदर सामाजिक लढाई एकोप्याने लढून लोकांमध्ये नवे स्फुल्लिंग चेतवावे लागेल. सामान्य लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडतांना महाग होत चाललेले जगणे स्वस्त करावे लागेल. लोकांनी आपल्या गरजा मर्यादित कराव्या लागतील. व्यसने, भपकेबाजपणा, खोटा मोठेपणा, कुवत नसतांना खर्च करण्याची सवय इत्यादी बाबतीत समाज जागृत करावा लागेल. लोकांना आपल्या मर्यादांची जाणीव करून द्यावी लागेल. फुकटचे, स्वस्तातले, सरकारी योजनांवर जगणे मर्यादित करण्याचे प्रबोधन करावे लागेल. असे झाल्यास माणूस सरकार अथवा एखाद्या व्यक्तीवर अवलंबून राहणार नाही. त्याला कष्ट करायची आणि कष्टाचे खायची सवय लागेल! मागण्याच्या वृत्तीला आळा बसेल. स्वाभिमान जागृत होईल! असे होणे म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची संगती लागणे होय! चला तर मग, बाबासाहेबांसोबत आनंदी जगूया! जय भिम!

**(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, किर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)**



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

# स्वाभिमान जागृत करणारे प्रज्ञावंत: डॉ. आंबेडकर

आधुनिक केसरी

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी मध्यप्रदेशातील इंदूर जवळील महु या गावात झाला. लहानपणापासूनच ते तल्लख बुद्धिमत्तेचे होते. ते उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशात गेले आणि बॅरिस्टर होऊन ते भारतात परतले. गंगेत स्नान किंवा देवपूजा केल्याने पाप नष्ट होत नाहीत. अनेक श्रीमंत गरिबांच्या श्रमावर जगतात, परंतु गरिबांना तुच्छ मानतात. चंदन आणि कोळसा आपल्याजवळ असला तर काय उगाळायचे ते आपणच ठरवावे. क्रोधामुळे बुद्धी दूषित होते. वृक्षाचा नाश म्हणजे संस्कृतीचा नाश होय.**

जो स्वतः गुलाम आहे तो दुसऱ्यास कसे मुक्त करणार, म्हणून"गुलामाला गुलामीची जाणीव करून दिल्याशिवाय तो बंड करून उठणार नाही" हे शब्द भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अमृतासारखे मला वाटतात. खरोखरच आपल्याला आपला स्वाभिमान कळाला तर आपण ताठमानाने समाजात जगू शकतो, जर आपणाला आपला स्वाभिमान कळाला नाही तर आपण एखाद्या गाढवा सारखे उच्चवर्णीय लोकांच्या दावणीला जूंपतो, आणि तिथेच आपले जीवन संपते, म्हणून शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा. असे त्यांनी आपणास सांगितले. त्यामुळेच दलित, वंचित समाज शिकायला लागला. शिकल्यानंतर तो संघटित झाला. आणि संघर्ष करायला सुरूवात केली.

हे सर्व करण्यासाठी अनेक वर्ष लागले. आज दलित समाज उन्नतीच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. त्याची कारणे फार भयानक व गंभीर आहेत. दसरा आला की आपट्याच्या पानाला सोनं सोनं म्हणतात. तसं काही चतुर लोक दलित समाजातील लोकांची गरज लागली की त्यांना आपण आठवतो. त्यावेळेस आपली जात -पात बाजूला ठेवतात,आणि आपला हेतू साध्य करून घेतात, हे सर्व होऊ नये म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वानाच स्वातंत्र्य, समता, बंधुता ,न्याय या तत्त्वावर समाजिक आधार दिला पाहिजे. असे सांगितले. भारतातील लोकशाही ही संसदीय लोकशाही असावी, असे त्यांचे स्पष्ट मत होते, हुकूमशाही वादी लोक गरीब लोकांवर अन्याय.अत्याचार करून मुस्कटदाबी करतात. अल्पसंख्याकांचे प्रश्न विचारात घेत नाहीत. त्यासाठी सत्ताही विभागली पाहिजे.कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्याय मंडळ या पद्धतीने राज्यकारभार चालला पाहिजे. जर सर्व सत्ता एकाच व्यक्तीच्या हाती आली तर तो हुकूमशहा बनतो, आणि तो जो म्हणेल ती पूर्व दिशा समजली जाते. सर्व व्यक्ती आपण एक आहोत. म्हणून भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे, असे म्हटले जाते,पण हे सत्य आहे काय ? शाळेत दाखला दिल्याबरोबर जात विचारली जाते. रूम भाड्याने घ्यायचे असेल तर जात विचारली जाते. विवाह करते वेळेस जात विचारली जाते. आपल्या देशात जातीवर सर्व काही अवलंबून आहे. आपल्याच जातीच्या माणसाला मतदान केले जाते .व्यक्तीचे कर्तृत्व पाहून मतदान केले जात नाही हा सगळ्यात मोठा अज्ञानपणा आहे. त्यामुळे तर आपल्या देशाचा विकास हळूहळू होतो ,आजही आपण विकसित नाहीत. आपल्या देशाचा संख्यात्मक विकास झाला .गुणात्मक विकास झालेला नाही याची खरी कारणे वेगळीच आहेत ही शोकांतिका आहे म्हणून जातीची व्याख्या करताना ते म्हणतात. जात नाही ती जात. दलितांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी आयुष्य खर्च केले म्हणून त्यांना दलिताचे कैवारी असे म्हणतात. अमेरिकेमध्ये शिक्षण घेऊन भारतात परत आल्यानंतर या ठिकाणच्या दलित आणि बहुजन समाजाचा त्यांनी अभ्यास केला. गरीब गरीब होत चालले, झोपडपट्टी वाढू लागली .श्रीमंतांची इमले इमल्यावर चढायला लागले, ही विषमता त्यांच्या लक्षात आली, म्हणून त्यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. वेडगळ समजुती. अंधश्रद्धा. अनिष्ट रुढी, दैवी परंपरा या बाजूला सारल्या तरच महिला -पुरूष पुढे जाऊ शकतात असे ते ठाम पणाने म्हणाले. म्हणून त्यांनी मूकनायक जनता*ही वर्तमान पत्रे व *बहिष्कृत भारत हे मासिक सुरू केले या वर्तमानपत्रातून समाजाची गा-हाणी लोकांसमोर मांडली. त्यामुळे समाज दिवसेंदिवस प्रगत होत चालला, शूद्र कोण होते? याविषयी त्यांनी ग्रंथ लिहिले, त्या ग्रंथातून आपला स्वाभिमान जागृत झाला. एक -एक गोष्ट लोकांना कळू लागली, आपण गुलामी किती दिवस करायची ? म्हणून खेड्यांकडून लोक शहरांकडे जाऊ लागले. खेड्यांमध्ये जेवढी भेदभाव, स्पृश्य -अस्पृश्यता आहे. तेवढी शहरात कमी प्रमाणात आहे, म्हणून शहरे फुगू लागली, स्वाभिमान जागृत झाल्यामुळे लोक हुशार झाले. शिक्षणातून ज्ञान मिळू लागले. त्यामुळे हातात पैसा आला, राहणीमान सुधारले, अशा पद्धतीने हळूहळू हा समाज पुढे येऊ लागला. याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच द्यावे लागते. नाशिक येथे असलेले काळाराम मंदिरामध्ये दलितांना प्रवेश नव्हता,मानव म्हटल्या नंतर सर्वांना सर्व अवयव सारखेच आहेत .तरीही काही सनातनी लोकांनी मुद्दाम जातीचे गट पाडले. वर्ण व्यवस्था निर्माण केली. शिवा-शिव सोवळे केले जाऊ लागले .याचा परिणाम दलित समाजावर झाला. आणि दलित समाजाला आशेचा किरण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने मिळाला म्हणून त्यांना महामानव म्हणतात. 15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. 26 जानेवारी 1950 पासून भारत प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उदयाला आले. आपल्या देशाची राज्यघटना असावी.आपण सार्वभौम झालो म्हणून या देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी राज्यघटना लिहिण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे दिले. आणि मसुदा समितीचे त्यांना अध्यक्ष पद दिले. त्यामुळे त्यांनी अनेक देशांच्या घटनेचा अभ्यास करून त्यांनी भारतीय राज्यघटना लिहिली. त्यामुळे देशाचा हा राष्ट्रीय ग्रंथ तयार झाला. त्यामुळे त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून सर्वत्र गौरविले जाते. माणूस म्हटल्यानंतर सर्वजण सारखेच पण महाड येथील चवदार तळ्याचे पाणी जनावरे पीत असत. परंतु माणसाला पिऊ दिले जात नव्हते, ही किती मोठी शोकांतिका आहे. घरा समोर कुत्रा, मांजर, हरीण, वराह, कोंबडे ,बदक ,ससा तसेच इतर जनावरांचे पालनपोषण केले जात होते, परंतु दलित माणूस दिसला की विटाळ होतो अशी समजूत त्या काळात होती हे सर्व बाजूला सारून माणसाला माणसासारखे जीवन जगण्यास त्याचा स्वाभिमान जागृत करण्यास डॉ. बाबासाहेबांनी संजीवनी दिली ,त्यामुळेच ते मानवतावादी समाज सुधारक झाले. तेव्हा या प्रखर बुद्धिवादी विचारवंताने महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह यशस्वी करून दाखवला व भल्या भल्यांना पाणी पाजले आणि समानतेचा ढेकर दिला. तेव्हा सर्वांचा स्वाभिमान जागृत झाला. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात पुणे येथे करार झाला. राष्ट्रहित लक्षात घेऊन या घटनेला तह म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा गांधीजींना उपोषण सोडायला लावले ही घटना प्रत्येकानी विचार करण्या सारखी आहे. वैदिक संस्कृतीनुसार दलित पुरुष-महिलांना अजिबात शिक्षण दिले जात नव्हते. वेद ऐकण्यास, वाचण्यास मनाई होती. चालताना दुरून जावे लागत असे, कारण इतरावर त्याची सावली पडू नये ,असा दंडक होता. पायाला खराटा, थुंकण्यासाठी कमरेला गाडगे बांधावे लागत असे, तेव्हा सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ही प्रथा मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांना सामाजिक क्रांतीचे प्रणेते असे म्हणतात. महिलांचे शिक्षण झाल्याशिवाय सामाजिक उन्नती होणार नाही हे त्यांनी ओळखून घेतले .हिंदू कोड बिल तयार केले त्यामुळे महिला आज समाजामध्ये ताठ मानेने सर्व पदावर कार्यरत आहेत,ही सगळी यशाच्या गुरुकिल्लीची चावी त्यांनीच फिरवली. त्यांनी संविधान लिहून "आम्ही भारताचे लोक" म्हणून सर्वांना समानता दिली, त्यांचे शिक्षण त्यांनी केलेले सामाजिक, शैक्षणिक कार्य अजरामर झाले आहे. बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना शिष्यवृत्ती दिली, ते ज्या दिवशी शाळेत गेले होते, तो दिवस 7 नोव्हेंबर विद्यार्थी दिन, व 26 नोव्हेंबर संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजतागायत कोलंबिया विद्यापीठात त्यांच्या एवढा प्रखर बुद्धिमत्तेचा हुशार विद्यार्थी झाला नाही. दररोज ते कमीत कमी 18 तास अभ्यास करत होते. ग्रंथालयामध्ये बसून रात्रभर त्यांनी वाचन केले होते. हे सर्वश्रुत आहे, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे आजच्या तरुणांनी वाचन करावे, मोठमोठ्या पदव्या मिळवाव्यात ,स्वातंत्र्य ,समता, बंधुता न्याय या तत्त्वावर लोकशाही चालवावी, सर्वांना समानतेने घेऊन चालावे ,भेदभाव करू नये, सर्व मनुष्य सारखेच आहेत याची जाणीव ठेवावी, आपला अमूल्य वेळ मोबाईल मध्ये न घालवता इतराविषयी न बोलता टवाळकी, कुटाळकी, चहाडी न करता स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून बॅरिस्टर व्हावे, हुशार माणसे राष्ट्राची संपत्ती असतात हे त्यांच्याकडून शिकावे, नुसते ढोल -ताशे किंवा डी, जे लावून मद्य पिऊन जर आपण जयंती साजरी करत असाल तर ते योग्य होणार नाही. स्वातंत्र्याची फळे उपभोगायचे असेल तर समाजात समता निर्माण करायची असेल तर शिक्षणाचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. शिक्षण हे सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशद्वार आहेत हे ठामपणे त्यांनी संविधान हातात घेऊन आकाशाकडे बोट दाखवून सांगितले. त्यामुळे ते स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री झाले.1950 मध्ये औरंगाबाद येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.1952 ला कोलंबिया विद्यापीठाने त्यांचा यथोचित सन्मान करून अनेक पदव्या प्रदान केल्या.1953 ला हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लिटरेचर ही पदवी बहाल केली. 14 ऑक्टोंबर 1956 रोजी नागपूर येथे हिंदू धर्माचा त्याग करून विज्ञानवादी ,समतावादी आणि करुनेने भरलेला भारतातच जन्मलेल्या बौद्ध धर्माची दीक्षा त्यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनी घेतली. पाच लाख बांधवांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. जगाच्या पाठीवरील हे सर्वात मोठे धर्मांतराची घटना होती. काठमांडू येथील बौद्ध परिषदेत भाग घेऊन तथागत गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स या विषयावर ऐतिहासिक भाषण केले. तेथून ते बुद्धगयाला गेले. बनारस विद्यापीठात त्यांनी प्रबोधन पर भाषण केले. तेथून पुढे सारनाथ येथे जाऊन तेथील कार्य पूर्ण करून दिल्लीला परत आले. धकाधकीच्या जीवनात सारखे लेखन, वाचन, चिंतन, चालूच होते, त्यांची बौद्धिक विचारांची लढाई होती . समाजाने त्यांच्या कार्याची माहिती झाल्यावर पुढील विशेषणे लावली त्यांना अर्थशास्त्रज्ञ, पत्रकार, समाजकारणी, घटनाकार, जलतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, प्रज्ञावंत, क्रांतीसुर्य विद्वान ,महामानव ,भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, दलितांचे कैवारी महिला व कामगारांचे उद्धारक कर्त असे म्हटले जाते .भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार दिला. अलीकडेच कोलंबिया विद्यापीठाने शंभर माजी विद्यार्थ्यांचा सर्व्हे करून विद्वान विद्यार्थी म्हणून त्यांना निवडले गेले त्या सर्वामधून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे पहिल्या क्रमांकाचे बुद्धिमान विद्यार्थी म्हणून बहुमताने गणले गेले , त्यांचे छायाचित्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या हस्ते सन्मानाने विद्यापीठात लावण्यात आले; या जगाने त्यांच्या ज्ञानाला, कार्याला केलेला हा मानाचा मुजरा आहे .जो पर्यंत सूर्य ,तारे, चंद्र आहेत,तो पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अजरामर राहणार आहे. हे काल, आज आणि उद्या चिरकालः राहणार आहे. संपूर्ण जगाने त्यांच्या बुद्धिमत्तेला वंदन केले आहे .म्हणूनच ते आज महामानव विश्वरत्न या नावाने ओळखले जातात. या महामानवाचे दिल्ली येथे 6 डिसेंबर 1956 ला महानिर्वाण झाले. करोडो लोकांनी साश्रुनयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. त्यांच्या मुंबईतील स्मृतिस्थळाला चैत्यभूमी या नावाने ओळखले जाते. दरवर्षी लाखोंचा समुदाय त्यांच्या दर्शनासाठी महापरिनिर्वाण दिनी मुंबई येथे एकत्रित येत असतो. विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी ता. मुखेड यांच्या वतीने त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन.

# महासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर




रमेश काकासाहेब शिंदे

संपर्क : ९४२२९७०८९६


आधुनिक केसरी

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा वडील सुभेदार रामजी सकपाळ आणि आई भीमाबाई यांच्या पोटी १४ एप्रिल १८९१ रोजी अतिशय सामान्य आणि शुद्र ठरवलेल्या मागास जातीत जन्म झाला. पण या सामान्य मुलाने व्यवस्था परिवर्तनाचे असामान्य कार्य केल्याने तो महामानव आणि सामाजिक क्रांतीचा महानायक झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक संशोधक, पत्रकार, लेखक, समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, कायदेतज्ञ, इतिहासकार, संविधानाचे जनक, तत्वज्ञानी, मानववंश शास्त्रज्ञ, दलित आणि महिला अधिकारांचे उध्दारक, पाली, बौद्ध साहित्याचे अभ्यासक, देशातील पहिले कामगारमंत्री, संस्कृत, हिंदी साहित्याचे अभ्यासक, जलतज्ञ, राजनीतीतज्ञ, विज्ञानवादी, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते, शेतकरी, शेतमजुर, कामगारांचे आधारस्तंभ होते.**

त्यांना साहित्य, संगीत, चित्रकला यातही रुची होती एवढेच नाही तर दोन वर्ष परिश्रम घेऊन त्यांनी व्हायोलीन वादन शिकून घेतले होते. आपला कदाचित असा समज झालेला असेल की, बाबासाहेब खुपच शिस्तप्रिय आणि गंभीर होते. परंतु ते फार मिश्किल आणि जिंदादिल व्यक्ती होते. मनमिळावू, रसिक आणि बोलके होते. हे सुद्धा फार कमी लोकांना माहिती आहे. प्रस्थापित वर्णव्यवस्थेने समाजात विषमता, भेदाभेद निर्माण केला होता. परिणामी शोषित, मागास वर्गाला माणूस म्हणून त्यांचे मुलभूत हक्क, अधिकार नाकारल्या गेले. यावर एक कवी म्हणतो. डॉ.बाबासाहेबांनी नियतीशी एक करार केला होता. त्या कराराला त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत पाळले देखील. बाबासाहेब सुर्यास म्हणाले... ***'तू तिथला तर मी इथला सुर्य आहे. आपण दोघं ठरवू या.. तू ताऱ्यांना प्रकाशमान कर, मी या 'साऱ्यांना' प्रकाशमान करीन'*** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खरी प्रेरणा मानवता होती. माणसाला माणूसपण मिळवून समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. कुशाग्र बुध्दिमत्ता आणि चिकित्सक वृत्ती असल्याकारणाने त्यांना समस्यांची उकल लवकर व्हायची. परिमाणी त्यावर ते प्रभावी उपाय सुचवून प्रश्न निकाली काढायचे. बाबासाहेबांच्या आयुष्याला कलाटणी देणारी गोष्ट कुठली तर शिक्षण.. म्हणून ते म्हणायचे "शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे. ते जे कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही" शिक्षण घेतल्याने आपल्याला व्यवस्था कळते. चांगले वाईट याची समज येते. शिक्षण यशाची गुरुकिल्ली आहे. म्हणूनच बाबासाहेबांना ग्रंथालयात ग्रंथवाचन करायाचा जगावेगळा छंद लागला होता. त्यामुळे शिक्षणाचा ध्यास घेतलेले अनेक पदव्यांचे स्वामी जागतिक किर्तीचे प्रज्ञावान बाबासाहेब लाखोंचे युगपुरुष झाले. अनेक विषयांचे ज्ञान त्यांनी आपल्या जीवनात प्रयत्नपूर्वक खेचून आणले होते. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, कायदा, घटना, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, शिक्षणशास्त्र अशा अनेक विषयांना त्यांनी नवे आयाम दिले. परंतु जातीय विषमतेचे चटके आणि मागास, दलित, शूद्र यांना मिळणाऱ्या हिन वागणूकीचा सामना त्यांनाही करावा लागला. माणसाला माणूस म्हणून वागणूक,हक्क न देणाऱ्या समाज व्यवस्थेला त्यांनी प्रखर विरोध केला. गरीब, दलित, वंचित, शोषित, शेतकरी, कामगार, शेतमजुर या दुःखी, कष्टी लोकांसाठी आपले अमुल्य योगदान देऊन परीवर्तनाकरिता लढा उभारण्याचा निर्णय त्यांनी घेतला. जगाला शांततेचा संदेश देणारे सर्वोत्तम भूमिपुत्र तथागत गौतम बुध्द, सर्वधर्म समभावाची शिकवण देणारे संत कबीर आणि मनुवादी वर्णव्यवस्थेवर आसूड ओढणारे महात्मा जोतीराव फुले यांच्याकडून प्रेरणा घेऊन बहुजनांच्या उद्धाराचे कार्य त्यांनी सुरु केले. भारतीय समाजरचना ज्या पायाभूत तत्वावर उभारलेली आहे. ज्या अधिष्ठाणावर विसंबून आहे. ते अधिष्ठाण केवळ उच्चवर्गीयांच्याच हिताचे आहे. ते त्यांचेच हित जोपासतात, ज्या तत्वावर, अधिष्ठानावर ही व्यवस्था उभी आहे ती आपल्या हिताची नाही असे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा त्यांनी 'रिडल्स इन हिंदुइझम, रिव्होल्यूशन ॲण्ड काउंटर रिव्होल्युशन, हु वेअर द शूद्राज, दि अन्टचेबल्स, द बुद्धा अंड हिज धम्मा, अन्हीलेशन ऑफ कास्ट या आणि अशा इतर ग्रंथामधून त्यांनी भारतीय समाजरचनेचे विद्यमान तसेच इतिहासातील स्वरुप तपशिलवार पध्दतीने समजून घेतले. अन्यायी विषमतेवर आधारलेली समाज रचना आणि तिचे तत्व अमानवी आहेत हे त्यांनी उघडपणे दाखवून दिले. या महानायका बद्दल कवी प्रा.दासू वैद्य म्हणतात...

तो महासुर्य होता, शब्दांनी बोलायचा<br>
जगातील सर्व वेदनांना हृदयाने तोलायचा<br>
त्याच्या विचाराच्या शाईत सर्व विरघळायचे<br>
धगधगते विचार मग अंगार होऊन जळायचे<br>
त्याच्या डोळ्यात आभाळ सामावून जाई<br>
नजरेतून बुध्दाची करुणा सांडत राही<br>
तो न दमला न थकला न भेकला न झुकला<br>
हजारो वर्षाचा अंधार प्रकाशाच्या गर्भात फेकला...

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक योगदान प्रचंड मोठे आहे. त्यांची महत्ती सांगण्यासाठी शब्दांचे विशेषण अपुरे आहेत कारण जगाला हेवा वाटावा



एवढ्या उंचीचा आणि हजारो वर्षाची गुलामी झुकारून मानवता रुजवणारा महापुरुष आपल्याला देशात जन्माला आला. हे आमचे अहोभाग्य म्हणावे लागेल. त्यांच्या विषयी दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्र अध्यक्ष तथा स्वातंत्रसेनानी स्व. नेल्सन मंडेला म्हणाले होते... "आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन आणि कार्यापासून प्रेरणा घेऊन आमचा संघर्ष सुद्धा त्याच आधारावर चालवणार ज्या आधारावर डॉ. आंबेडकरांनी समाज परिवर्तनाचा प्रयत्न केला आणि यश मिळाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री असतांना त्यांनी अत्यंत महत्वाचे हिंदू कोड बिल २४ फेब्रुवारी १९४९ ला संसदेत मांडले होते. त्यात विधीपूर्वक होणाऱ्या लग्नाच्या बरोबरीने नोंदणी पध्दती विवाहाला मान्यता मिळावी. आंतरजातीय आणि सगोत्र विवाहांना मान्यता असावी, बहुपत्नीत्वाला विरोध, घटस्फोटाच्या माध्यमातून वेगळे होण्याचा अधिकार मिळावा, स्त्रियांना समान वारसा हक्क, हुंडा आणि स्त्रिधनावर स्त्रीयांचा अधिकार असावा, परित्याक्ता स्त्रीयांना पोटगीचा अधिकार, मुल दत्तक घेतांना पत्नीची संमती इ. तरतुदी असलेली हिंदू कोड बिल त्यांनी मांडले परंतु ते बील पास न झाल्यामुळे मंत्रीपदाचा राजीनामा देऊन ते मंत्रीमंडळातून बाहेर पडले. आजचे राजकीय नेते सत्तेसाठी तत्व सोडतात. बाबासाहेबांनी तेव्हा तत्वासाठी सत्ता सोडली होती. असा राजकीय नेता आज होणे नाही. बाबासाहेब स्त्रियांच्या प्रगतीवरून समाजाचे मोजमाप करायचे. ते स्त्रीयांच्या प्रश्नाबद्दल अत्यंत जागृत होते. १९३८ मध्ये एकदा वाघ्यामुरुळी आणि देवदाशी समोर त्यांनी भाषण केले. ते विनंतीपूर्वक म्हणाले होते "वेश्या व्यवसाय बंद करा आणि सन्मानाने चांगले जीवन जगा" अनाथाना आधार द्या, परित्याक्त्या व कुमारी मातांना अभय द्यावे अशी त्याची तळमळ असायची. यातून त्यांची स्त्रियाविषयी अपार करुणा व्यक्त होते. या भावनेतून त्यांनी सावित्रीबाई बोराडे आणि अंबुताई गायकवाड या दोघींना जनता वृत्तपत्राच्या कार्यकारणीत घेतले होते.तसेच गिरण्या, कारखाने, खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांना पुरुष कामगारा एवढेच वेतन मिळावे, त्यांना बाळांतपणाची रजा मिळावी, कामाच्या ठिकाणी पाळणाघर, स्वच्छता गृह असावे आणि पुरुष्याच्या बरोबरीने स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून बाबासाहेबांनी संघर्ष केला. बाबासाहेबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात शिक्षणाला अनन्य साधारण महत्व दिले होते. शिक्षणामुळेच त्यांनी अन्याय ग्रस्तांना न्याय मिळवून दिला. यातूनच त्यांचे कर्तुत्व आणि नेतृत्व जगप्रसिद्ध झाले. त्यांनी घराला ग्रंथालय आणि ग्रंथालयाला घर केले होते. तसेच समाजाला जागृत करण्यासाठी आपले विचार लोकांपर्यंत पोहचवण्या करिता त्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत यासारखे पत्र, पाक्षिक, नियतकालीके सुरु केले. शिका-संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा यशाचा गुरुमंत्र त्यांनी समाजाला दिला यासोबत संघर्ष,स्वावलंबन, स्वातंत्र्य असा प्रवास करत असतांना एकत्र आलेल्या समुदायाला कानमंत्र दिला. 'एकीत जय आणि बेकीत क्षय' होत असतो त्यामुळे एकत्र रहा, संघटीत व्हा. हक्काचे मिळवण्यासाठी सक्षम बना. नसता गटा-तटात विभागल्या गेला तर मिळवलेले स्वातंत्र्य सुद्धा हिरावल्या जाईल आणि पुन्हा गुलामीत खितपत पडावे लागेल. असा इशारा त्यांनी दिला होता. आपण कायम आठवण ठेवावी असा आणखी एक विचार त्यांनी आपल्याला दिला होता.डॉ.बाबासाहेब सांगतात.."विषमता जन्माला घालून मातेच्या ममतेने तिला जोपासणारे कधीही समतेचा पर्याय देऊ शकत नाही.त्यामुळे व्यवस्था परिवर्तनाच्या लढ्याचे नेतृत्व ज्याचे शोषण होत आहे. त्यांनाच करावे लागेल" तेव्हा बाबासाहेबांच्या नावाने जयघोष करून मिरवणारे खरेच त्यांच्या विचारांचे आहेत का? याचाही अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे...आज आपणही एक संकल्प करूया या महामानवाकडून सामाजिक परिवर्तनाचा, पुरोगामी विचारांचा,शिक्षणाचा वारसा घेऊन येणाऱ्या काळात त्यांना अभिप्रेत असलेला तरुण, महिला, समाज,राष्ट्र घडवण्याकरिता योगदान देऊ या आणि आपले धर्मनिरपेक्ष संविधान अबाधित राहावे आणि लोकशाही अधिक लोकोपयोगी व्हावी यासाठी सामुहिक प्रामाणिकपणे प्रयत्न करूया...हेच बाबासाहेबांना विनम्र अभिवादन असेल आणि हिच खऱ्या अर्थाने भिमजयंती ठरेल...

# ग्रंथप्रेमी डॉ.बाबासाहेब आंबेडकर




डॉ. प्रकाश खेत्री,

संपर्क : 7843092244


आधुनिक केसरी

**तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचं पुस्तक. कारण भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल तर पुस्तक कसे जगायचं ते शिकवेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर. १४ एप्रिल,१८९१ रोजी मध्यप्रदेश मधील 'महु' येथे भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म झाला. बालपणापासून वडील रामजी बाबा हे बाबासाहेबांच्या वाचन आणि अभ्यासाबाबत विशेष लक्ष देत, रामजी बाबा स्वतः पहाटे पर्यंत जागत, छोट्या भिवाला उठवत, अभ्यासाला बसवत आणि नंतर झोपत. बाबासाहेबांना हवी ती पुस्तके विकत आणून देत, मागितलेलं पुस्तक मिळालं नाही असं कधीच झालं नाही.**

कधी पैसे नसायचे अशावेळी रामजी बाबा मुंबईतच रहाणाऱ्या आपल्या दोन विवाहीत मुली तुळसा व मंजुळा यांच्या घरी जात, एका मुलीकडे पैसे मिळाले नाही तर त्यांना दुसऱ्या मुलीकडे चालत जावे लागे. दोघीकडे पैसे नसतील तर एखादा दागिना मागत, या दोन्ही मुली कोणताही आढावेढा न घेता आपला दागिना भावाच्या पुस्तकासाठी वडिंलांकडे देत. रामजी बाबा मग हा दागिना मारवाड्याकडे गहाण ठेवत आणि त्या पैश्यातून बाबासाहेबांनी मागितेलं पुस्तक घरी घेऊन येत. पैसे आल्यावर रामजी बाबा हा दागिना सोडवून मुलींना परत करत. काहीही झाले तरी बाबासाहेबांना अभ्यासात व वाचनात रामजी बाबांनी कधीच खंड पडू देत नसत. त्यामुळे बाबासाहेबांना लहानपणापासूनच वाचनाची आवड व संस्कार निर्माण झाले. रामजी बाबांनी त्यांच्याकडून तर्खडकरांची भाषांतर पाठमालेची तीन पुस्तके पाठ करून घेतली होती. तसेच योग्य वेळी योग्य व प्रभावी शब्दांचा उपयोग कसा करावा हे शिकवले होते. रात्रीचे जेवन झाल्यानंतर रामजी बाबा भिवाला संताचे अभंग आणि कबिरांचे दोहे म्हणायला लावत. त्यामुळे त्यांना तुकोबांची व संताची अभंग आणि कवने तोंडपाठ झाली होती. त्याविषयी बाबासाहेब म्हणत, 'वडीलांनी मला जे शिकवले तसे इतर कोणत्याही मास्तरांनी शिकवले नाही'. बाबासाहेबांच्या घरातील अभ्यास, वाचन आणि ग्रंथाविषयची ही जागरूकता क्रांतिकारक होती. बाबासाहेब परदेशात शिकायला होते, तेव्हा त्यांच्याकडे पुस्तके खरेदीसाठी पैसे नसत. रात्रभर एकाच बैठकीत ते पुस्तक वाचत, पुन्हा हे पुस्तक आपल्याला कधीच मिळणार नाही, म्हणून एकाग्रपणे वाचून नोट्स काढत. तसेच ग्रंथालय जितका वेळ उघडे असेल तितका वेळ ग्रंथालयात वाचत बसत, त्यांनी दररोज 18 तास अभ्यास केला. पुस्तक वाचातांना कशाचेच भान राहत नसे. भूक लागली तर मध्येच खिशातून पाव काढून गुपचूप खात असत. लंडनमध्ये घडलेली एक छोटी घटना आहे. बाबासाहेब, लंचब्रेकमध्ये ग्रंथालयात बसून ब्रेड खाताना ग्रंथपाल यहुदी पहातात, तेव्हा ग्रंथपाल म्हणतात, "मिस्टर, हे ग्रंथालय आहे. येथे तुम्हाला खाता येणार नाही. तुम्ही नियम मोडला आहे, तेव्हा आता तुम्हाला शिक्षा करावी लागेल." त्यावर बाबासाहेब उत्तरले, " क्षमा करा..! यापुढे मी नियम पाळील. उपाशीच वाचत बसेन. मग तर झाल ?" "अपराध करणार्याला क्षमा नाही." ग्रंथपाल म्हणाला. "शिक्षा करा पण पण महोदय आपणास एकच विनंती आहे." बाबासाहेब म्हणतात. "कोणती?" ग्रंथापालाने विचारले. "माझ्यासाठी हे ग्रंथालय बंद करू नका. ग्रंथांशिवाय मी जगू शकत नाही. याव्यतिरिक्त कोणतीही शिक्षा भोगायला मी तयार आहे." - बाबासाहेब म्हणाले. ग्रंथांसाठीचे प्रेम पाहून ग्रंथपाल नरमले व म्हणाले - " मिस्टर आंबेडकर, उद्यापासून तुम्ही माझ्यासोबत जेवायचे. तुमचा डब्बा मी आणत जाईल हीच तुमची शिक्षा." हे ऐकून बाबासाहेबांचे डोळे पाणावले व त्यांनी ग्रंथपालाच्या हात हातात घेऊन कृतज्ञता मानली. लंडनमध्ये असतांना बाबासाहेबांनी पोटाला चिमटा देऊन मोठ्या कष्टाने दुर्मिळ पुस्तके जमवले, हे सर्व पुस्तके तीन पेट्यांमध्ये भरून 'व्हिक्टरी ऑफ इंडिया' या बोटीने मायदेशी पाठविली, परंतु ही बोट समुद्रात बुडाली. तेव्हा ते या दुर्मिळ पुस्तकांच्या विरहात ते दोन दिवस रडत होते. अमेरिकेत असतांना त्यांनी ग्रंथांचं प्रचंड वाचन केलं. या वाचनातून जो थोडा वेळ त्यांना मिळायचा त्या वेळात ते रस्त्यांवरुन फिरुन ग्रंथ गोळा करायचे. अशी सुमारे २००० ग्रंथ त्यांनी अमेरिकेतून विकत आणले होते. पुस्तकांवर त्यांचे पराकोटीच प्रेम होते. ते म्हणत, "लोकांनी माझी अवहेलना केली पण या पुस्तकांनी मला ज्ञान दिलं. म्हणून मी पुस्तकांच्या बाबतीत इतका जागरूक आहे. पुढे ते म्हणतात, जर माझ्या घरावर जप्ती आली आणि तर माझ्या सर्व चीज वस्तू नेल्या तर मी शांत बसेन पण माझ्या पुस्तकांना कोणी हात लावला तर मी ते कदापि सहन करणार नाही." अभ्यासात बाबासाहेबांना व्यत्यय अजिबात आवडत नसे. लंडन ते मुंबई अशा सलग ६४ तासाच्या बोट प्रवासात बाबासाहेबांनी ८ हजार पाने वाचून काढली होती. देवी दयाल लिखित 'डेली रुटीन ऑफ डॉ. आंबेडकर' या पुस्तकात तसा उल्लेख आढळतो. बाबासाहेबांना आपल्या वाचन व्यासंगापायी आपले



'चारमिनार' नावाचे घर विकावे लागले होते, इंग्लडचे प्रधानमंत्री स्टेनले बाल्डविन यांनी भारताला राजकीय अधिकार देण्याच्या संदर्भात विचारविमर्श करण्यासाठी एक आयोग नियुक्त करण्याची घोषणा केली. या सात सदस्यांच्या समितीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सदस्य म्हणून ५ ऑगस्ट, १९२८ ला मुंबई विधिमंडळातून निवड झाली. बाबासाहेबांना जाणीव झाली की, आता भारतीय राजकारणात संविधानाचा विषय फार मोठ्या प्रमाणात चर्चेत येईल. अशा वेळी मौन राहणे, अत्यंत धोक्याचे आहे. तेव्हा ६ आणि ७ ऑगस्टला आपल्या काही मित्रांकडून ४०० रुपये उधार घेतले. ८ ऑगस्टला दिल्लीच्या तारापूरवाला बुकसेलर्सच्या दुकानातून ८५० रूपयांची संविधानाशी संबंधित पुस्तके विकत घेतली. अर्थात उरलेले ४५० रु उधार ठेवून ! जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करण्यासाठी बाबासाहेबांनी ९ ऑगस्ट पासून १४ दिवस खोलीला बाहेरून कुलूप लावून स्वतः ला कोंडून घेतले, त्यावेळी त्यांना एका लहान खिडकीतून चहा व जेवनाची व्यवस्था केली होती आणि १५-२० ग्रंथांचा अभ्यास केला. या प्रसंगातून बाबासाहेबांची लेखन व वाचनाची निष्टा, एकाग्रता किती पराकोटीची होती हे लक्षात येते. तारापूरवाला बुकसेलर्सकडून नंतरही बरीच नवीन पुस्तके खरेदी केली. तेव्हा या दुकानदाराची उधारी ८००० ते ९००० वर गेली. तेव्हा उधारीचे पैसे परत करण्यासाठी घर विकल्याशिवाय पर्याय नव्हता, १९३६ मध्ये 'चारमिनार' हे घर अक्षरशः ग्रंथाच्या उधारीपोटी विकावे लागले. माणूस स्वतःला राहण्यासाठी घर बांधतो. मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आवडत्या ग्रंथांसाठी 'राजगृह' हे दुमजली घर बांधले. त्याकाळात हिंदुस्थानातील पुस्तकांसाठी बांधलेलं हे पहिलं घर असावं. खालचा मजला माणसांसाठी तर दुसरा संपूर्ण मजला पुस्तकांसाठी राखीव होता. बाबासाहेबांच्याच हयातीत ५०,००० हजारांहून अधिक ग्रंथ राजगृहात दाखल झाले होते. राजगृहाच्या या ग्रंथालयामध्ये बाबासाहेबांच्या गैरहजेरीमध्ये कोणासही जाण्यास परवनगी वा मुभा नव्हती. राजगृहाच्या दाराशी कुत्रा पीटर हा बाबासाहेबांच्या ग्रंथालयाचे राखण करीत असे. एवढ्या प्रचंड ग्रंथ भांडारामध्ये कोणतेही पुस्तक हवे असल्यास त्यांना अचूक मिळत असे, इंग्लंडच्या ठक्कर कंपनीतून त्यांनी त्यासाठी खास ग्रंथालय कार्डे बनवून घेतली होती. श.शा.रेगे यांच्याकडे ती जबाबदारी सोपवून ती यादी पूर्ण करून घेतली होती. तेव्हा आचार्य प्रल्हाद केशव अत्रे म्हणतात, "मी जेव्हा डॉ. आंबेडकरांना भेटण्यासाठी त्यांच्या राजगृहात गेलो, तेव्हा मी एका भल्या मोठ्या ग्रंथालयात आलो की काय ! असा भाव मला झाला. त्यांच्यासारख्या विद्यासंपन्न पुरूष जगात दुसरा असू शकत नाही". पुढे नियतकालिकात लिहतात, 'आंबेडकर घरात नव्हे तर ग्रंथालयात राहतात'. 'ग्रंथासाठी घर बांधणारे व घर विकणारे' ते जगाच्या पातळीवरील एकमेव 'महामानव' आहेत. बाबासाहेबांनी आपल्या मिळकतीतील बहुतेक खर्च पुस्तकांवर केला. एकदा बाबासाहेब हे ग्रंथ खरेदी करण्यासाठी पत्नीचे दगिने गहाण ठेवून पुस्तकांचे घरी गठे घेऊन आले, त्यावेळी त्यांच्या वहीणी रागा-रागात म्हणतात, "तुम्ही पुस्तकांसाठी सर्व घराची राखरांगोळी करीत आहात, पुढे आपले कसे होणार ?" त्यावर बाबासाहेब उत्तर देत की, "मी माझ्या पुस्तकावर जेवढे प्रेम करतो, तेवढेच बायको व मुलगा यांच्यावरही करतो." यावरून बाबासाहेबांचे कुटुंबा एवढेच ग्रंथावर प्रेम होते हे लक्षात येते. बाबासाहेबांची ११०० ग्रंथ मिलिंदच्या ग्रंथालयास व सिद्धार्थ महाविद्यालयास बहुमोल ग्रंथसंग्रह दिली, तेव्हा बाबासाहेब अत्यंत भावविवश झाले होते. 'समाजाने बहिष्कृत केलेल्या माझ्यासारख्याला या ग्रंथांनीच जवळ केले. मला आसरा दिला. त्यांच्या एवढा जगात मला दुसरा परमस्नेही कोणीच नाही. माझ्या जीवनातील स्नेही आज मी तुम्हाला देत आहे', असे उद्गार बाबासाहेबांनी तेव्हा काढले. पंडित मदनमोहन मालवीय यांनी ग्रंथसंग्रह दोन लाख [आताच्या हिशेबात वीस कोटी] रुपयांना विकत घ्यायची इच्छा व्यक्त केली होती. बाबासाहेबांनी ती अमान्य तर केलीच. परंतु, त्यावेळेला त्यांनी जे उत्तर दिले, ते त्यांच्यातील ज्ञान, तपस्वीपणाची साक्ष देणारे ठरले. ते म्हणाले, 'ग्रंथसंग्रह जाणे म्हणजे माझ्या शरीरातून प्राण जाण्यासारखे आहे'. बाबासाहेबांचे हे वाचन, व्यासंग आणि ग्रंथप्रेमाचा वसा आणि वारसा आपण सर्वांनी १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने जपायला हवा. तेव्हा बाबासाहेबांची जयंती नाचून साजरी करण्यापेक्षा वाचून साजरीकेली पहिजे, हीच खरी आदरांजली ठरेल...!





# जन्मदात्यापेक्षा आपण हुशार हीच भावना मुलांना बिघडण्यासाठी कारणीभूत

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

शिक्षण पदवी म्हणजे हुशारी असं होतं नाही. अनुभवाच ज्ञान जीवन घडवत असत.आपल्या मुलांचं हित व्हावं त्यांचं आयुष्य व्यवस्थित घडाव आपण जे मिळवु शकलो नाहीत ते मुलांना मिळावं. एकंदरीत मुलांचं हित व्हावं अहित होऊ नये हिच सर्व आई वडील यांची प्रमाणिक इच्छा असते.आणि त्या साठी आपल्या मुलांनी आपल ऐकावं अथवा आपण सांगितलेला मार्ग अवलंबला पाहिजे.एवढीच माफक अपेक्षा पालकांची असते.पण मुलांची मात्र मथुरा वेगळी कडे निघालेली असते.आपण स्वतः खुप हुशार ज्ञानी आहोत आई वडील यांना फार काही कळत नाही अशा आविर्भावात मुलं वावरत असतात.मग हि वैचारिक दरी निर्माण होऊन दैनंदिन वाढत जाते.त्याचा परिणाम सध्या बहुतेक पालक चिंतेच्या छायेत आहेत. मुलं मनासारखं वागत नाहीत हिच त्यांच्या मनात सल आहे. व्यक्त होता येत नाही. दिवसेंदिवस युग बदलतं असल्याने विचारात अंतर पडत आहे.पालकांच मत विचारात घ्याव ऐकावं याची आवश्यकता सध्या मुलांना वाटत नाही. विचार जुळण हाच एकसंघतेचा मजबूत आधारस्तंभ असतो.पण पालक व मुलं यांच्या विचारांतील अंतर वाढलं असल्याने सध्या सगळीकडेच पालक वर्गात चिंतेच वातावरण आहे.याच कारण हि तसंच आहे. बहुतांश मुलं हि पालकांच ऐकत नाहीत हिच वस्तुस्थिती आहे.चांगल्या गोष्टी शिकण्यासाठी अवगुण मुक्त होण्यासाठी अज्ञाधारक पणा गरजेचा असते.अज्ञाधारकपणा हिच जीवनातील सगळ्यात मोठी शिदोरी असुन हि शिदोरी नेहमी सोबत असली पाहिजे. पण सध्या हिच महत्वाची शिदोरी कोणालाही नको आहे.आपल्याकडं ज्ञान किती आहे हे महत्वाचं नसुन आपल्या मध्ये अज्ञाधारक पणा किती आहे हेच जीवनात महत्त्वाच असत. जो कोणाच्या तरी अज्ञेत असतो.तो बिघडण्याची सुताराम शक्यता नसते. पण जो अज्ञेत नसतो तो घडण्याची शक्यता फार कमी असते.म्हणून आयुष्यभर कोणाच्या तरी अज्ञेत असलच पाहिजे. जो अज्ञेत राहत नाही तो अनियंत्रित असल्याने तो कधी बिघडेल याची शाश्वती नसते.अनियंत्रित पणे धावताना आपण स्वतःच प्रचंड नुकसान करून घेतो.वेग किती जास्त आहे याला महत्त्व नसुन नियंत्रण हे महत्वाचं असतं.सध्या प्रचंड मोठ्या प्रमाणात मुलं बिघडत चालली आहेत हे सध्याच् भयान वास्तव आहे.अभ्यास न करणं , मोबाईल पाहणं,गुंडागर्दी कडे आकर्षित होण, व्यसनाच्या विळख्यात आडकण,स्टटं करणं, प्रचंड राग जोपासण या सह अनेक अवगुणांचा प्रचंड प्रभाव असणं,या बाबी सध्या मुलांच्या मनात मोठ्या प्रमाणात बळावत असल्याने हि धोक्याची घंटा आहे.वेळे सोबत विचारसरणी बदलतं आहे. बदलणं गरजेचं आहे पण संस्कार आणि संस्कृती याला बाधा येता कामा नये. अन्यथा विचारसरणी बदलतं असताना आपण आपल्या पायावरच घाव घालतोय का याचा विचार झाला पाहिजे. हाच घाव आपल्या पायावर होणार नाही याची काळजी दक्षता घेतली गेली पाहिजे.पण आपण हि काळाजी न घेता विचारसरणी बदलतोय असं होतं असताना त्याचे विघातक परिणाम देखील अपेक्षित असतात आणि तसे परिणाम हि येतात. जन्मदात्या आई वडील यांच्या पेक्षा आपण हुशार आहेत.या आविर्भावात मुलं वावरत असताना एवढी हवेत जातात कि आपले आई वडील यांना आपल्या एवढं सुद्धा कळत नाही. असा समज होऊन आई वडील यांच्या प्रत्येक सल्ल्याला कात्रजचा घाट दाखवत आहेत.आई वडील यांना फार काही कळत नाही उमजत नाही मग त्यांचं सल्ला कशाला ऐकायचा अशी मुलांची मनस्थिती मनोवृत्ती बळावत असल्याने हिच मनोवृत्ती मुलांचं भविष्य बिघडण्यासाठी कारणीभूत ठरत आहेत. दोन चार पुस्तकं वाचली दोन चार वर्ग शिक्षण झालं म्हणजे आपण खुप शहाणे होत नाही.

# सूर्योदय...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग 44

सूर्योदय आणि सूर्यास्त बघायला आपल्याला आपल्या सर्वांनाच खूप आवडतं .या दोन्ही वेळेचे फोटो आपण कॅमेऱ्यात कैद करत असतो. किती विहंगम दृश्य असते ते. वक्तशीरपणा हा सूर्याकडून शिकण्यासारखा गुण. थर्टी फर्स्ट असो की कडाक्याची थंडी असो ,की कडक उन्हाळा असो, सूर्योदय आणि सूर्यास्त वेळेतच होणार .कधीही आळस करत नाही. किंवा त्याच्याकडे गरीब श्रीमंत असा भेदभाव नाही. तो सर्वांना सारखाच प्रकाश देतो. महाल असो की झोपडी.. सूर्यदेव कधी संपावर जात नाही. कधी आजारी पडत नाही. उलट आपल्याला किंवा पिकांना ,रोपांना पुरेसा प्रकाश मिळाला नाही तर आपण आजारी पडतो किंवा पिकं, रोप कोमेजून जातात. ज्याप्रमाणे आकाशातला सूर्योदय होणे खूप गरजेचे आहे. त्याप्रमाणे या भूतलावर काही गोष्टींचा उदय होणे खूप गरजेचं असतं. उदाहरणार्थ चांगली माणसं ,लेखक, कवी, डॉक्टर, पोलीस, जवान, सेवक ,शिक्षक, शेतकरी अशा कितीतरी लोकांचा उदय होणे समाजासाठी आवश्यक असतो .ज्यांच्या आयुष्यात अंधाराचे साम्राज्य आहे त्यांच्या आयुष्यात सूर्योदय होणं फार गरजेचे आहे. सूर्याचा प्रकाश तमाचं अधिराज्य संपवत असतो. जंगलातील झाडे ज्याप्रमाणे आपल्याच गुरमीत असतात, त्याप्रमाणेच हा अंधार काहींच्या आयुष्यात धुमाकुळ घालत असतो. आपल्या सात्वीक कार्यातून या अंधाराला दूर करून त्यांच्या आयुष्यात सूर्योदय झालाच पाहिजे. इतरांशी स्पर्धा करता करता आपलं आयुष्य संपवण्यापेक्षा स्वतःशी स्पर्धा करून आपलं जीवन उज्वल करूया. बासरी लाकडाची असून सुद्धा तिच्यातून सुंदर स्वर बाहेर पडतात. मग मानव तर भगवंताची निर्मिती आहे. त्याच्याकडे कितीतरी चांगले गुण आहेत. तो निश्चितच माणुसकीच्या नात्याने दिनदुबळ्यांच्या आयुष्यातील अंधार दूर करेल. त्यांच्या जीवनाचं नंदनवन करेल. आपण आपलेच भाग्य निर्माते आहोत. फक्त अहंकार, गर्व, मानपान यांना मात्र कचरापेटीत टाकूया. जिथे या गोष्टी वास करतील तिथे आयुष्याचं नरक व्हायला वेळ लागणार नाही.. ओम सूर्याय नमः

# बाबासाहेबांचा समतावादी विचारच देशाला तारेल..!

आधुनिक केसरी

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दरवर्षी भारतातल्या खेडोपाडी, वाडी, वस्तीवर साजरी होत आहे. मोठमोठ्या शहरात जयंती महोत्सव साजरा होतांना दिसतो आहे.जयंतीचे स्वरूप विस्तारतांना दिसते आहे; परंतु जयंती सोहळ्यातून वैचारिक प्रबोधनाची चळवळ होत आहे का ? की, नुसते जयंती सोहळे पहायला मिळताहेत कारण "सोहळे आणि चळवळ" या दोन बाबी अत्यंत भिन्न आहेत,अशा काही बाबींचा जयंतीच्या निमित्ताने विचार करणे महत्वाचे वाटते म्हणून त्याअनुषंगाने थोडेसे विचार मंथन..!**



डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

तत्पूर्वी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या विचारांना व कार्याला कोटी कोटी अभिवादन..! जयंती साजरी करण्यामागील हेतु व उद्देश डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाची जयंती आपण दरवर्षी साजरी करत असतो ; परंतु जयंती का ? व कशासाठी साजरी करायची ? तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारांचे आदानप्रदान व्हावे, प्रचार-प्रसार व्हावा आणि समाजप्रबोधन व्हावे हा यामागील हेतु असावा व तसाच आंबेडकरी जनतेच्या विचारधारेचा उद्देशही असायला हवा. जो कोणी बाबासाहेबांचे विचार समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम दररोज करत असेल... तो व्यक्ती बाबासाहेबांची जयंती दररोज साजरी करत असतो. बाबासाहेबांचा तोच खरा अनुयायी असतो, त्यालाच जयंती साजरी करण्याची खरी व्याख्या समजलेली असते. जे जे कोणी बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त केवळ डी.जे.लावून, मदिरा प्राशन करून, नटून थटून नाचत असतील, असा सोहळा करणे म्हणजे जयंतीचे केवळ प्रदर्शन होय ! असे माझे वैयक्तिक मत आहे. असा प्रदर्शन सोहळा साजरा करणारांनी आत्मचिंतन करून स्वतःला विचारावे आपण खरंच बाबासाहेबांचा विचार पुढे नेत आहोत का ? आपण खरंच बाबासाहेबांच्या विचारांचे अनुयायी आहोत का ? आपण खरंच बाबासाहेबांच्या विचारांशी प्रामाणिक आहोत का ? आपण त्यांच्या विचारांशी प्रतारणा तर करत नाहीत ना ?, असे प्रश्न आपण स्वतःलाच विचारले पाहिजे. कारण त्या महापुरुषाने रात्रंदिवस केवळ आणि केवळ समाजाच्या उत्थानासाठीच आपले आयुष्य खर्ची घातले उपेक्षित समुदायाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. पशुवत जीवन जगणाऱ्या समुहाला अज्ञान,अंधकार,अस्पृश्यता, बहिष्कृतता, अशा विषमतावादी व्यवस्थेच्या चिखलातून बाहेर काढून माणूस बनविले, यासाठी बाबासाहेब अहोरात्र काम करत राहिले, अभ्यास करत राहिले. त्या महामानवाचे समाजावर फार मोठे उपकार आहेत. त्यांच्या उपकाराचे उतराई होण्याचा आम्ही जन्मोजन्मी प्रयत्न केला तरी आमच्याकडून त्या उपकाराची परतफेड होऊ शकणार नाही.

**बाबासाहेबांच्या उपकाराचे कसे होणार उतराई?** बाबासाहेबांच्या उपकाराची परतफेड आपल्याकडून कधीच होणार नाही, आमच्या कार्यकर्त्यांच्या, अनुयायांच्या मनात बाबासाहेबांच्या उपकाराचे उतराई होण्याचा विचार जर मनात आलाच तर त्यासाठी काय करावे लागेल ? ...तर त्यांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल ! त्यांनी विषमतेविरुद्ध दिलेल्या लढ्याच्या चळवळीचा रथ पुढे नेण्याचे काम करावे लागेल. त्यांनी दिलेल्या पवित्र बुद्ध धम्माचे आचरण करावे लागेल ! बुद्ध धम्माचा प्रचार-प्रसार करावा लागेल ! हे काम कोणाचे आहे, तर हे एकट्यादुकट्याचे काम नाही, ते संपूर्ण समाजबांधवांचे काम आहे, व येणाऱ्या प्रत्येक पिढीचे काम आहे; परंतु आजच्या पिढीकडून ते होतांना दिसते का ?...तर याचे उत्तर "नाही" असेच येईल.! मग याला कोण जबाबदार असेल तर..यासाठी मागील प्रत्येक पिढी जबाबदार असेल! मागच्या पिढीचे काम आहे की, येणाऱ्या प्रत्येक पिढीला बाबासाहेबांच्या विचारांशी जोडून ठेवणे. बाबासाहेबांनी लिहिलेल्या ग्रंथांचा अभ्यास करायला भाग पाडणे, त्यांच्या ठिकठिकाणी झालेल्या भाषणांतील विचारांवर मुद्द्यावर सतत चर्चा करायला लावणे, समुहात नेहमी एकीची भावना टिकवून ठेवण्यासाठी सतत कार्यरत ठेवणे, समाजात निर्माण होणाऱ्या अनेक संघटनांना आवर घालणे,

**हिंदू म्हणून जन्माला आलो असलो; परंतु....**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो, तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही." बाबासाहेबांनी केलेला निर्धार हा हिंदू धर्माच्या सांगोपांग अभ्यासातून आलेला होता. बाबासाहेबांना हिंदू धर्मातील वर्गभेद, वर्णभेद,धर्मभेद मान्य नव्हते.



जाती जातीची उतरंड मान्य नव्हती. उच्च-नीच, स्पृश्य - अस्पृश्य असे भेद मान्य नव्हते, हिंदू धर्माच्या विकृतरितीबाबत बाबासाहेब म्हणतात, "ज्या धर्मात अमंगल पशुचा स्पर्श झाला असता चालतो; पण माणसाचा स्पर्श चालत नाही, तो धर्म नसून वेडगळपणा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्मातील चालीरितीला, भेदाभेदाच्या वर्तनाला वेडगळपणा म्हटले आहे. रानटी प्राण्यांना देव म्हटले जाते, नरकाडी करणाऱ्या गाईला गो-माता म्हटले जाते, त्यांची पुजा केली जाते आणि माणसांचा विंटाळ केला जातो. त्याला अस्पृश्य ठरवले जाते. त्याची अस्पृश्यता पाळली जाते. अशी हिंदू धर्माची रुढ असलेली परंपरा बाबासाहेबांनी नाकारली होती. कारण बाबासाहेबांचा विचार हा समानतेचा विचार होता. त्यांना नेहमी वाटायचे,"ज्या धर्मात माणसांमाणसामध्ये समानता नसेल आणि माणसाला माणूस म्हणूनच वागवले जात नसेल तर त्या धर्माला आपला धर्म का म्हणायचे ? बाबासाहेब पुढे म्हणतात, "ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे, तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे. ज्या धर्मात माणसाची माणुसकी ओळखणे अधर्म मानला जातो, तो धर्म नसून रोग आहे." बाबासाहेबांनी हिंदू धर्मात असलेल्या मानवी वर्तनाच्या विकृतीला रोग म्हटले आहे, शिरजोरीची सजावट म्हटले आहे. हिंदू धर्मातील मानवी अधिकारांबाबत बाबासाहेब म्हणतात, " जो धर्म एका वर्गाने विद्या शिकू नये, धनसंचय करू नये, शस्त्र धारण करू नये, असे सांगतो तो धर्म नसून माणसाच्या जीवनाचे विडंबन आहे." सर्व मानव जातीचे कल्याण हे शिक्षित झाल्याशिवाय किंवा धनसंचय केल्याशिवाय होणारच नाही, त्याबद्दल बाबासाहेब म्हणतात,"जो धर्म अशिक्षितांना अशिक्षित रहा, निर्धनांना निर्धन रहा अशी शिकवण देतो तो धर्म नसून शिक्षा आहे, ती एक शिरजोरीची सजावट आहे, किंवा वेडगळपणा आहे. हिंदू धर्माची अशी वेगवेगळ्या दृष्टीने व्याख्या करणारे बाबासाहेब हिंदू धर्माचा त्याग करणार नाहीत तर काय करतील? डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वच धर्माचा अभ्यास केला होता. सर्व धर्माच्या मानवी हक्काबाबत अभ्यास केला होता, कोणकोणत्या धर्मात मानवीमूल्ये जपली जातात त्या धर्माचा स्वीकार करण्याचे बाबासाहेबांनी ठरवले होते आणि सर्व धर्माच्या अभ्यासातून शेवटी बाबासाहेबांनी 'बुद्ध धम्म' स्वीकारला.

**बाबासाहेबांचा समतावादी विचारच देशाला तारेल..!**

"सर्वांचे कल्याण होवो" हा सिद्धार्थ गौतम बुद्धांचा समतावादाचा वैश्विक विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अंगिकारण्याआधी जगातील सर्व धर्मांचा अभ्यास केला व शेवटी बुद्धधम्माची निवड करून हिंदू धर्माचा त्याग केला... आणि भारतातील लाखो दुःखी,पीडित,अस्पृश्य, बहिष्कृत समुहातील लोकांसोबत माणूस म्हणून जगण्यासाठी समतावादी बुद्ध धम्माची दीक्षा घेतली. हिंदू धर्मात असलेल्या विषमतावादाचे उच्चाटन करण्यासाठी संपूर्ण भारतच बौद्धमय करण्याचा त्यांचा पवित्र हेतु होता. हे त्यांनी "प्रबुद्ध भारत" नावाने सुरू केलेल्या वृतपत्राच्या शीर्षकावरून कळून येते.

प्रबुद्ध भारत म्हणजे समतावादी विचारांचा भारत. जिथे जिथे समता असेल तिथे तिथे वर्णभेद, वर्गभेद नसतील व एककल्ली व्यवस्था नसेल..! जिथे भेद निर्माण होत नाही, तिथे कलह निर्माण होऊ शकत नाही. जिथे कलह नसेल, तिथे शांतता असेल, जिथे शांतता असेल तिथे सुख असेल ! अशा सुखी भारताची संकल्पना बाबासाहेबांच्या मनात होती. ह्या संकल्पनेला इथल्या विषमतावादी व्यवस्थेने नाकारले होते, ते आजही नाकारलेलेच आहे. याचे कारण हेच की, इथल्या विषमतावादी लोकांचे श्रेष्ठत्व टिकवून ठेवायचे असेल तर जातीभेद धर्मभेद, वर्गभेद, वर्णभेद टिकून राहिले पाहिजे. यासाठी मूठभर श्रीमंताच्या हातात देशाची सत्ता असेल आणि सत्ताधारी हे मूठभर लोकांच्या धर्मसत्तेचे गुलाम असतील आणि धर्मसत्ता ही ऐतखाऊंच्या मुठीत असेल, असा हा भारतातील विषमतावादाचा सिद्धांत सांगता येतो. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातला भारत हा बौद्धमय भारत होता. जिथे समग्र मानव जातीच्या कल्याणाचा विचार होता. समतावादाचा विचार होता. तो विचार जर रुजला असता तर सुखी आणि समृद्ध भारत आपणास पहावयास मिळाला असता. देशात शांतता नांदली तरच देश सुखी आणि समृद्ध होईल. परंतु देशात शांतता नांदत नसेल तर देश सुखी आणि समृद्ध कधीच होणार नाही. सध्या तर देशात शांतता नसून अराजकता माजली आहे. शा या अराजक व्यवस्थेत सध्या देशातली जनता भयभीत आहे. जनता भयभीत करण्याला कारणीभूत इथले सत्तांध आणि धर्मांध लोक आहेत. ह्या सत्तांध ,धर्मांध आणि व्यापारी सत्ताधाऱ्यांनी देशाची संपती अतीश्रीमंतांना किरायाने देण्याचा सपाटा लावला आहे. हे मूठभर श्रीमंत लोक भारतातीलच आहेत म्हणून ठीक आहे. ह्या सत्ताधारी लोकांनी भारतीय संपती जर भारताबाहेरच्या देशातल्या श्रीमंतांना विकली तर भारतीय जनतेला पुन्हा इंग्रजांच्या गुलामगिरीची आठवण आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून जर देशाला अबाधित ठेवायचे असेल तर बाबासाहेबांचे समतावादी विचारच या देशात सुख,समृद्धी, शांतता निर्माण करू शकतात. बाबासाहेबांचा संविधानात आलेला विचार हा समतेचा विचारच देशाला तारू शकेल ! म्हणून केवळ एकाच जातसमुहाकडून बाबासाहेबांची जयंती साजरी न होता ती वैश्विक पातळीवर साजरी व्हावी. बाबासाहेबांच्या विचारांची संपूर्ण भारत देशाला गरज आहे. म्हणून बौद्ध बांधवांसह भारतातील सर्व धर्मियांना बाबासाहेबांच्या विचारांची जयंती साजरी करण्याची गरज आहे...

आधुनिक केसरी



# लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424

उन्हाळा सुरु झाला की सर्व थंडगार पदार्थ बनवण्याचा आणि खाण्याची लगबग सुरु होते. मुलांना शाळेला सुट्टी लागली की मग खरा उन्हाळा एन्जॉय करणे सुरु होते त्यांचे. खरेतर उन्हाळा हा सर्वांनाच नकोसा वाटणारा ऋतू आहे. पण विविध प्रकाराची आईस्क्रीम, लस्सी, सरबते, ज्यूसेस, मस्तांनी, मॉकटेल्स, डिझार्ट्स , कलिंगडे ,खरबूज, द्राक्षे, आंबा, संत्री यासारखी रसदार फळे हे डोळ्यांसमोर आले की मग मात्र उन्हाळा कधी सुरु होतो असे वाटते. प्रत्येक ऋतूचे वेगवेगळे वैशिष्ट आहे. जसे थंडीत थंडगार पदार्थ नकोसे होतात. गरम सूप, चहा, कॉफी, तळलेले पदार्थ, मसालेदार् पदार्थ खावेसे वाटतात, तसे उन्हाळ्यात वर्षाची पापड, लोणची, मुरांबे, कुरडया ,यासारखे वाळवणाचे पदार्थ , बनतात, खायलाही मजा येते. आमरस वर्षभरही मिळतो आता, पण त्याची खरी मजा उन्हाळ्यातच ! असाच आज एक सर्वांना आवडणारा थंडगार फालुदा आपण बनवूया. **साहित्य :** अर्धा लिटर दूध , 3..4 चमचे साखर, क्रिस्टल जेली 1 पॅकेट , 100 ग्राम शेवया, रोज सिरप, 1 वाटी भिजवलेले सब्जा बी, 1 स्कूप व्हनीला किंवा रोज ,स्ट्रॉबेरी आईस्क्रीम , सजावटी साठी गुलाब पाकळ्या किंवा डाळिंबदाणे, ड्रायफ्रुट्स चेरी. **कृती :** सर्वांत आधी सब्जा भिजत टाकावा . मग गॅसवर अर्धालिटर पाणी उकळायला ठेवावे . आता एका बाऊलमध्ये जेली पॅकेट मधील दोन्ही पावडर काढून एकत्र करून घ्याव्यात . मग उकळलेले पाणी त्यात टाकावे व व्यवस्थित ढवळुन कोमट झाले की तासभर थंड होण्यासाठी फ्रीझ मध्ये ठेवावे . तासाभरात सेट होऊन मस्त जेली बनते. दुसऱ्या गॅसवर 1 लिटर पाणी घालून ते उकळले की त्यात शेवया घालून चमक येऊन ट्रान्स्फरन्ट होईपर्यंत उकळू द्यावी . नंतर ती चाळणीत काढून त्यावर थंड पाणी ओतावे म्हणजे शेवया छान सुट्या होतील आणि एकमेकांना चिकटणार नाहीत. गॅसवर जाड बुडाच्या भांड्यात दूध उकळायला ठेवावे . दुधाला उकळी आली की त्यात 4 चमचे साखर घालून थोडेसे आटवावे म्हणजे फालुदा टेस्टी बनतो . आता ते व्यवस्थित थंड होऊ द्यावे. सर्व तयारी मस्त झालेली आहे . आता छान काचेच्या ग्लासमध्ये फालुदा बनवायला सुरु करूया . सर्वांत आधी ग्लासमध्ये काठापासून खालपर्यंत आतून रोज सिरप घालावे म्हणजे ग्लास सुरेख दिसेल . नंतर त्यात 2 चमचे सब्जाचे भिजवलेले बी घालावे व थोडिशी जेली घालावी . मग थोड्या शेवया घालून त्यावर 2..3 चमचे रोज सिरप घालावे . त्यानंतर ग्लास पाऊण होईपर्यंत दूध घालावे व वरती आईस्क्रीमचा स्कूप घालावा. शेवटी सजावटी साठी वरती लाल गुलाब पाकळी, डाळिंब दाणे , ड्रायफ्रुट्स घालून वरती चेरी ठेवावी . आता हा थंडगार, रोज फालुदा सर्व्ह करण्यासाठी तयार आहे.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सर्वसमावेशक विकासदृष्टी




भीमराव सरवदे
संपर्क : ९४०५४६६४४१


आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय अहंकारामुळे केवळ भारतातच प्रामुख्याने स्वातंत्र्यलढ्यात आपल्या बहिष्कृत समाजांच्या प्रश्नांसंबंधी आग्रही असणारे दलित नेते म्हणून पहिले जाते. भारताबाहेरील देश मात्र समग्र मानवजातीचा उद्धारकर्ता आणि विशेषत्वाने भारतीय स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा क्रांतिकारी समाजसुधारक म्हणून बाबासाहेबांकडे पाहतात. कायदामंत्री या नात्याने संविधान निर्मितीत समन्वय साधणारे आणि त्यात सामाजिक न्यायाची संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न करणारे प्रामाणिक राजकीय नेते म्हणूनही त्यांनी आपला ठसा भारतीय राजकारणावर उमटविलेल्या आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहुआयामी व्यक्तिमत्व असून त्यांचा प्रत्येक पैलू देशाच्या गौरवात भर घालणारा आहे. त्यांचा एक सर्वाधिक महत्त्वाचा पैलू आहे तो म्हणजे आर्थिक विकासाला सामाजिक न्यायाची जोड देणारी आणि त्यात जातीय समानतेची भर घालणारी व सर्वसमावेशक अशी त्यांची विकासदृष्टी.**

भारतीयांच्या वैयक्तिक मूलभूत हक्कांचे रक्षण करणारा दस्तऐवज म्हणून भारतीय राज्यघटनेचे कौतुक झाले असून त्यात हे मूल्य समाविष्ट करण्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. संविधानाद्वारे मूलभूत हक्क प्रदान केल्याबद्दल त्यांचे कौतुक करणारे मात्र बाबासाहेबांच्या इतर पैलूंकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. भारतीय समाज व्यवस्था माणसामाणसामध्ये भेदभाव करून शतकानुशतके बहिष्कृत असलेल्या दलितांसारख्या गटांपासून लक्ष विचलित करू शकते, याची बाबासाहेबांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच भारताच्या इतिहासात दडपल्या गेलेल्यांच्या बाजूने योग्य उपाययोजना न केल्यास समाजातील बलाढ्य घटकांकडून आणखी उपेक्षित होऊ शकणाऱ्या समुदायांकडे त्यांनी लक्ष दिले. २५नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेसमोर भाषण करताना बाबासाहेब म्हणाले होते कि, राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्व आपण नाकारत राहणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. (डॉ. बा. आं. लेखन व भाषणे खंड १८ भाग ३, पृष्ठ क्रमांक १७३) त्यांनी राज्यघटनेतील ही संदिग्धता व्यक्त केली की, या दस्तऐवजाने राजकीय लोकशाहीची हमी दिली आहे; परंतु प्रत्येक भारतीयाला सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचाही अधिकार आहे. हे सुनिश्चित करण्यासाठी भारताला अशा प्रकारच्या विकासाची आवश्यकता होती ज्याचा लाभ प्रत्येक भारतीयापर्यंत पोहोचू शकेल. भारतातील उदयोन्मुख उद्योजक असे होते की आर्थिक विकास भारताच्या सामाजिक समस्या सोडवू शकतो पण एकूणच भारताला अविकसित ठेवताना वसाहतवादी राज्यकर्त्यांनी प्रबळ जाती-वर्गापेक्षा दलित आणि आदिवासींचे जास्त नुकसान केले आहे, हे त्यांच्यापैकी फार कमी जणांना समजले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्या मोजक्या लोकांपैकी एक होते ज्यांना माहित होते की या समुदायांना इतरांपेक्षा जास्त त्रास सहन करावा लागला आहे, आर्थिक विकास आणि तंत्रज्ञानाकडे दुर्लक्ष न करता त्यापलीकडे जाऊन बहिष्कृत समाजाला उपयुक्त ठरू शकतील अशा क्षेत्रात गुंतवणूक केली पाहिजे, असे मानणाऱ्या मोजक्या लोकांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक आहेत. तंत्रज्ञानावर श्रीमंतांचेच नियंत्रण असल्याने त्याचे फायदे वंचित गटांपर्यंत पोहोचावेत, या सामाजिक उद्दिष्टासाठी मार्गदर्शन करावे लागेल, असे त्यांना वाटत होते. जातीय समानतेसह सामाजिक न्यायाशी आर्थिक विकासाची सांगड घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दूरदृष्टी त्या कालावधीत तरी इतर कोणात दिसून येणे दुरापास्त होते.

भारतीय स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतर मुख्य चर्चा विकासाच्या गरजेवर नव्हे तर त्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर होती. १९४७ नंतरच्या सर्व नेत्यांना हे माहित होते की भारताला आर्थिक विकासासाठी गुंतवणुकीची आवश्यकता आहे कारण वसाहतवादी राजवटीने महानगरातील औद्योगिक क्रांतीला पाठिंबा देण्यासाठी हा उपखंड अविकसित सोडला होता. युरोपच्या सुधारणावादी मिशनच्या नावाखाली वसाहतवादाला कायदेशीर मान्यता देण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात वसाहतवादी देशाच्या औद्योगिक क्रांतीला भांडवल आणि कच्चा माल पुरवून आणि त्याच्या तयार उत्पादनांसाठी बंदिस्त बाजारपेठ निर्माण करून त्याला पाठिंबा देणे हे त्याचे उद्दिष्ट होते. याचा अर्थ असा की परकीय राज्यकर्त्यांना या उद्दिष्टाच्या आड येणारे सर्व नष्ट करावे लागले, उपखंडातील नवोदित वस्त्रोद्योगाच्या विनाशापासून सुरुवात करून त्याला आपल्याच देशातील औद्योगिक उत्पादनांची बंदिस्त बाजारपेठ बनवावी लागली. वसाहतवादी देशातील औद्योगिक क्रांतीसाठी वसाहतीला कच्चा माल आणि भांडवलाचा पुरवठादार बनविण्यासाठी जमीन आणि वन कायदे बदलले गेले आणि कर प्रणालीची पुनर्रचना करण्यात आली. भारत अविकसित राहिला आहे याची जाणीव असल्याने देशाला विकासात गुंतवणुकीची गरज आहे आणि ती जलद गतीने व्हायला हवी, यावर नेत्यांमध्ये एकमत झाले. मात्र, विकासाचे वेगवेगळे मार्ग निवडणाऱ्या इतर नेत्यांप्रमाणेच गांधींनीही भारतीय जात आणि लिंगाधारित असमान समाजाकडे दुर्लक्ष केले, ज्यात सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने पावले उचलली नाहीत तर तांत्रिक गुंतवणुकीचा लाभ आधीच बलाढ्य असलेल्या लोकांपर्यंतच पोहोचतो. एकूणच भारताचे वसाहतवादी सत्तेने प्रचंड शोषण केले आहे, असे त्यांचेही मत होते आणि भारताच्या सामाजिक इतिहासात हक्कवंचित लोक म्हणून मानल्या गेलेल्या समुदायांना वसाहतवादाचा फटका अधिक तीव्रतेने बसला होता, हे मात्र त्यांना जाणवले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गांधींसह उर्वरित नेत्यांमध्ये हाच फरक होता, ज्यांनी भारताकडे एकसंध राष्ट्र म्हणून पाहिले आणि त्यातील जाती आणि इतर भेदांकडे डोळेझाक केली. दुसरीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हे माहित होते की, विकासात्मक गुंतवणुकीचा प्रभावही प्रत्येक गटाला वेगवेगळा जाणवतो. वर म्हटल्याप्रमाणे वसाहतवादाचा प्रत्येक गटावर समान परिणाम झाला नाही. युरोपीय औद्योगिक क्रांतीला पाठिंबा देण्यासाठी करण्यात आलेले कायदेशीर बदल तसेच भूसंपादन आणि खनिज व नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण याचा इतर लोकसंख्येपेक्षा आदिवासी आणि दलितांवर अधिक नकारात्मक परिणाम झाला. याचा अर्थ



१९४७ नंतरच्या गुंतवणुकीचाही त्यांच्यावर भिन्न प्रकारे परिणाम होईल असे बाबासाहेबांना वाटत होते. संविधान सभेसमोर संविधान सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की या दस्तऐवजामुळे भिन्न संस्कृतीचे भीषण वास्तव असणाऱ्या स्वतंत्र भारताला राजकीय लोकशाहीची खात्री होती. पण भारताला सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचीही गरज आहे आणि आर्थिक विकासाचा लाभ प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचल्याने ते शक्य होऊ शकते. त्यामुळे वंचित समुदायांना फायदा होऊ शकेल अशा गुंतवणुकीची गरज असल्याचे त्यांना जाणवले. ही जाणीवच उद्योगांविषयीची त्यांची भूमिका स्पष्ट करते, त्यांनी वेगवान औद्योगिकीकरणाचे समर्थन केले कारण त्यांनी तंत्रज्ञानाला प्राधान्य दिले म्हणून नव्हे तर उद्योगांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महसूल उभा राहतो जो गरिबांच्या शिक्षण आणि आरोग्य सेवेसाठी वापरला जाऊ शकतो आणि त्यांनी निर्माण केलेल्या नोकऱ्या गरीबांना, विशेषतः दलितांना, शोषणापासून दूर ठेवून पर्यायी रोजगाराकडे नेतील. तंत्रज्ञानाधारित औद्योगिकीकरणाचा लाभ आतापर्यंत बहिष्कृत वर्गापर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षण, आरोग्य सेवा आणि रोजगार निर्मितीच्या स्वरूपात विशेष गुंतवणुकीची गरज आहे, हे त्यांना ठाऊक होते. त्या अनुषंगाने त्यांनी विकासाच्या फायद्याचा त्यांचा हक्क कायम ठेवला. त्यासाठी तंत्रज्ञान, शिक्षण आणि उत्पन्न देणारा रोजगार यांची सांगड घालणे आवश्यक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असा निष्कर्ष काढला की तांत्रिक प्रगतीची सांगड शैक्षणिक, आरोग्य आणि इतर सामाजिक गुंतवणुकीशी जोडली गेली पाहिजे जेणेकरून विकास बहिष्कृत वर्गांपर्यंत पोहोचेल. तथापि, भारतीय नियोजकांनी पायाभूत विकासावर आधारित योजना निवडली ज्यासाठी भांडवल संचयाची गरज होती. या पर्यायाच्या आधारे भारताने मोठी धरणे, पोलाद, अवजड विद्युत व यंत्र अवजारे प्रकल्प आणि इतर योजनांसारखे भांडवलप्रधान प्रकल्प उभारण्यासाठी पाश्चिमात्य देशांकडून परकीय मदत म्हणून पैसे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान घेतले. अशा आधुनिक प्रक्रियांचे तंत्रज्ञान आणि इतर गुंतवणूक हाताळण्यासाठी वंचित वर्ग सुसज्ज नव्हता. त्यांचे लाभ मिळण्यासाठी औपचारिक शिक्षण आणि तांत्रिक प्रशिक्षणाच्या स्वरूपात सांस्कृतिक, मानसिक आणि सामाजिक तयारीची आवश्यकता असते. आतापर्यंत उपेक्षित असलेल्या वर्गाला आधुनिक सेवा मिळाव्यात, यासाठी अशा सूचनांशिवाय शाळा, रुग्णालयांसारख्या संस्था शिक्षण आणि आरोग्यासारख्या सुविधा आणि सेवा उपलब्ध करून देऊ शकतात, पण बहुसंख्य लोकांपर्यंत त्या पोहोचू शकत नाहीत. अनुसूचित वर्गाच्या आरक्षणासारख्या सकारात्मक कृतीमुळे त्यांना शिक्षण व इतर सेवा उपलब्ध झाल्या, पण त्या सुलभ करण्यासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक अटींची पूर्तता झाली नाही. अशी पावले न उचलल्यास आधुनिक गुंतवणूक सामर्थ्यवान समूहास अधिक समृद्ध करू शकतात तर दरिद्री आणि शक्तिहीनांना अधिक कंगाल करून विषमता तीव्र करू शकतात. स्वातंत्र्याच्या वेळी एकूणच भारतात साक्षरता कमी होती, आदिवासी आणि दलित समाजात, विशेषतः स्त्रियांमध्ये, खूपच कमी होती. ज्यांना शिक्षणाची संधी मिळाली होती, त्यातील बहुतेक प्रबळ जाती-जमातींचे होते. सामाजिक परिवर्तनाअभावी गुंतवणुकीचा लाभ मध्यम व उच्चवर्गापर्यंत पोहोचला असला तरी दारिद्र्य वाढले आहे आणि शक्तिहीनांमध्ये ते वाढतच आहे, अशी चिन्हे आहेत. जागतिकीकरणाचा नफा अधिक असल्याने सामाजिक क्षेत्राकडे अधिक दुर्लक्ष होत असून त्याची किंमत कोण मोजते आहे आणि त्याचा लाभ कोणाला मिळतो? असा प्रश्न विचारला जात नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी कल्पना केली होती, ते स्वप्न नव्हते, तर ते प्रत्यक्षात कृतीत आणता आले, हे कोरिया, सिंगापूर, चीन, तैवान, मलेशिया, इंडोनेशिया या पूर्व आशियाई देशांच्या अनुभवावरून दिसून येते. भांडवलशाही विकासाचे यशस्वी मॉडेल म्हणून या आशियाई देशाची अनेकदा उदाहरणे दिली जात असली, तरी प्रत्यक्षात त्यांनी आर्थिक विकासाला सामाजिक समतेची जोड दिली. त्यांनीही अवजड उद्योगात मोठी गुंतवणूक केली, पण शिक्षण, आरोग्य, पोषण आणि स्वच्छता या सामाजिक क्षेत्रात आपल्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ८ ते १५ टक्के गुंतवणूक केली. या दृष्टिकोनाने त्यांच्या बहुतेक लोकसंख्येला विकासाच्या फायद्यासाठी तयार केले. उदाहरणार्थ, मेनलॅन्ड चीनचा प्रयत्न बहुसंख्य लोकांना हाल-अपेष्टातून गरिबीकडे म्हणजेच मूलभूत गरजा भागविण्याचा होता. ८० टक्के लोकसंख्येस त्यात त्यांना यश आल्याचे दिसते. १९७० च्या दशकातील मलेशियन भूमिपुत्र धोरणावरून असे दिसून येते की, हा दृष्टिकोन सकारात्मक कृतीपर्यंतही वाढविणे शक्य आहे. हे धोरण मलय लोकांच्या बाजूने आहे ज्यांची लोकसंख्या ६० टक्के आहे; परंतु तोपर्यंत त्यांच्याकडे आर्थिक आणि सामाजिक शक्तीचा अभाव होता. खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रत्येक स्तरावरील सर्व नोकऱ्यांपैकी एक टक्का मलय लोकांसाठी राखीव ठेवण्याची अट घालण्यात आली होती; परंतु या कायदेशीर स्थितीच्या पलीकडे जाऊन राज्याने त्यांचे शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि पोषण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली, जेणेकरून त्यांच्यापैकी बहुतेकांना तोपर्यंत सत्तेवर असलेल्या गटांशी बरोबरीने स्पर्धा करणे शक्य झाले. अशाप्रकारे बहुसंख्य मलय लोकांना या संस्था सहजतेने उपलब्ध झाल्या. उलट भारताने अनुसूचित जाती-जमातीच्या सदस्यांना सार्वजनिक क्षेत्रातील मोफत शिक्षण आणि नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या, पण त्या सर्वांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी कोणतीही सकारात्मक पावले उचलली नाहीत. अशा पावलांशिवाय लाभ फक्त शाळेत प्रवेश घेणाऱ्यांपर्यंतच पोहोचू शकला. ज्यांना शाळेत पोहोचता येत नाही, त्यांना यातून वगळण्यात आले आहे. बहुसंख्य अनुसूचित वर्गांना आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक पायाभूत सुविधांचा अभाव आहे. आरक्षणाच्या कायदेशीर तरतुदीच्या पलीकडे न जाता भारताने अनुसूचित वर्गासाठी सेवा उपलब्ध करून दिल्या. इतर सक्षम उपायांअभावी केवळ काही मोजक्याच लोकांना त्यांच्यापर्यंत पोहचता आले. शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकासातील भारताची एकूण गुंतवणूक ६ टक्क्यांच्या पुढे गेलेली नाही. उदारीकरणानंतर सामाजिक सेवांचेही खासगीकरण झाले आहे, त्यामुळे ही गुंतवणूक पाच टक्क्यांच्याही खाली आली आहे. ही टक्केवारी जोपर्यंत वाढत नाही आणि तिचा पुरेपूर व योग्य वापर होत नाही तोपर्यंत विकसित भारताची स्वप्नपूर्ती दुर्लभ असेल, यात शंका नाही!

**(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**


# उन्हाळ्यात मुलांना घरगुती पेय द्या !

आधुनिक केसरी

सध्या सर्वत्र उन्हाचा जोर वाढतो आहे. राज्यात अनेक ठिकाणी मुलांच्या परीक्षा संपून शाळांना सुट्टी पडली आहे. अभ्यासाचा ताण नसल्याने मुले दिवसभरातील अधिकाधिक वेळ खेळण्यात व्यतीत करत आहेत. बाहेर खेळायला जाणाऱ्या मुलांना उन्हातान्हाची पर्वा नसते. अधिक वेळ उन्हात राहिल्याने घामावाटे शरीरातील पाणी आणि क्षार निघून जातात ज्यामुळे थकवा येतो. अशावेळी मुले घरी येऊन पालकांकडे कोल्ड्रिंक्स पिण्यासाठी पैसे मागतात. सध्या बाजारात मिळणारे अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे कोल्ड्रिंक्स लहान मुलांसाठी अपायकारक आहेत. अशा कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांवर ठळक अक्षरांत तशी सूचना लिहिणेही बंधनकारक करण्यात आले आहे.

ही कोल्ड्रिंक्स जिभेला रुचकर वाटून मनाला गारवा देणारी असली तरी ती बनवण्यासाठी रसायनांचा आणि प्रीझर्वेटिव्हचा वापर करण्यात येत असल्याने लहान मुलांच्या नाजूक शरीरासाठी ती अत्यंत हानिकारक असतात. १०० टक्के फळांचा रस असण्याचा दावा करणारे काही कंपन्यांचे फ्रुट ज्यूसचे टेट्रा पॅकही बाजारांत उपलब्ध आहेत; मात्र त्यामध्ये प्रत्यक्षात फळांचा रस किती आणि इतर रसायने किती आहेत हे पॅकेटवरील घटकांचे प्रमाण वाचल्यावरच लक्षात येते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत असे तयार कोल्ड्रिंक्स मुलांना देऊन त्यांच्या आरोग्याशी खेळण्याऐवजी घरी तयार केलेले कोकम सरबत, लिंबू सरबत, ताक किंवा बाजारातून ताजी फळे आणून मुलांना फळांचा रस द्यावा. घरगुती पेय प्यायल्याने उन्हामुळे मुलांच्या शरीरात निर्माण होणारी पाण्याची कमतरता तर भरून निघेलच शिवाय मुलांना व्हिटॅमीन्स आणि मिनरल्ससुद्धा या पेयांतून मिळेल. केवळ मुलांसाठीच नव्हे तर मोठ्यांनीही उन्हाळ्यात रासायनिक शीतपेय पिण्याऐवजी घरगुती पेय पिऊन आपली रोगप्रतिकारक शक्ती आणि आरोग्य जपावे !


सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई

# डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित सामाजिक लोकशाही!




भिमराव परघरमोल

संपर्क : ९६०४०५६१०४


आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा त्याग, समर्पण, कष्ट, अभ्यास, चळवळ, साहित्य, चिंतन आणि प्रत्येक विषयाची सखोलता. यामधून विकसित झालेले त्यांचे विविधांगी व्यक्तिमत्व. याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेऊन त्यांच्यावर झालेल्या संशोधनामुळे ते केवळ अस्पृश्यांचे, दिनदलितांचे, शोषित, पिढीत, कामकरी, कष्टकरी यांचेच कैवारी किंवा उद्धारकर्ते नसून, घटनाकार, अर्थतज्ञ, पत्रकार, संसदपटू, ओजस्वी तथा प्रखर वक्ते, कामगार व कायदामंत्री, लेखक, विचारवंत, तत्वज्ञ, उत्कृष्ट राजकारणी, समाजशास्त्रज्ञ, इतिहासकार यासह मानवी तथा प्रकृतीच्या सर्वांगीण व भविष्यकालीन विकासाचा दूरहष्टीकोन जोपासणारे महान लोकशाहीवादी, द्रष्टे, विकास तथा युगपुरुष होते ही बाब निसंकोच स्पष्ट होते.**

२५ नोव्हेंबर १९४९ ला संविधान सभेवरील ५५ मिनिटांच्या शेवटच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक भविष्यकालीन व्यथा आणि वेदना मांडलेल्या दिसून येतात. त्यापैकी सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीच्या संदर्भात ते म्हणतात की, आज आम्ही एका विपर्यस्त परिस्थितीमध्ये प्रवेश करणार आहोत. राजकीय लोकशाहीच्या रूपाने आम्ही एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य याला मान्यता देऊन सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीला नाकारणार आहोत. जोपर्यंत आम्ही हे साधर्म्य साधणार नाही, तोपर्यंत सर्वसामान्यांना लोकशाहीमध्ये आस्था वाटणार नाही. पर्यायाने आम्ही मोठ्या मतप्रयासाने उभा केलेला लोकशाहीचा डोलारा ते नेस्तनाबूत करून, लोकशाहीला म्हणजे संविधानाला दोष देतील.

सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तर समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय या महान मानवी मूल्याधारित समाज व्यवस्था निर्माण करुन, प्रत्येकाला अन्न, वस्त्र, निवारा, उत्तम आरोग्य, शिक्षण व रोजगाराच्या समान संधी उपलब्ध करून देणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ सामाजिक लोकशाहीचे विश्लेषण करून थांबले नाहीत, तर ती प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात पराकोटीचे प्रयत्न केलेले दिसून येतात. राजकीय लोकशाहीच्या दिशेने त्यांचे प्रथम पाऊल २७ जानेवारी १९१९ रोजी पडताना दिसून येते. वयाच्या २८ व्या वर्षी साऊथबोरो कमिशनसमोर लेखी साक्ष नोंदवताना ते म्हणतात की, लोकांसाठी शासन असून चालत नाही, तर लोकांचे शासन असले पाहिजे. त्यासाठी प्रशासनामध्ये त्यांचे प्रतिनिधी असावे लागतात. ते निवडण्यासाठी प्रौढ मताधिकार असायला हवा. म्हणून ते (ADULT FRANCHISE) प्रौढ मताधिकाराची मागणी करतात. अशी मागणी करणारे ते आशिया खंडातील प्रथम भारतीय ठरतात. साऊथबोरो कमिशनचा आढावा घेण्यासाठी दहा वर्षांनी, म्हणजे १९२८ ला सायमन कमिशनचे भारतात आगमन झाले. विरोधांती तेही परत गेल्यानंतर १९३० ते १९३२ दरम्यान लंडन येथे आयोजित तीन गोलमेज परिषदांमधून त्यांच्या चार मागण्यांमध्ये प्रौढ मताधिकार ही प्रमुख मागणी होती. १७ ऑगस्ट १९३२ ला (COMMUNAL AWARD) जातीय निवाडा जाहीर होऊन, राजकीय लोकशाहीला कायद्याची चौकट प्राप्त होते. पुन्हा त्याच मताधिकाराच्या चौकटीला भारतीय संविधानामध्ये अनुच्छेद ३२५, ३२६ च्या रूपाने अढळ स्थान मिळवून देण्यात ते यशस्वी झाले.

सामाजिक तथा आर्थिक लोकशाहीच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कल्पक दृष्टी जगावेगळी असल्याचे दिसून येते. त्यांनी त्यासंदर्भात मांडलेल्या तत्त्वज्ञानाचा पाया सामाजिक न्याय हाच होता. १९१६ ला त्यांनी सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली. त्यावेळी भारतीय समाज व्यवस्था ही मोठ्या प्रमाणात विषमतेने ओतप्रोत होती. वर्णव्यवस्था, जातीयता, अस्पृश्यता, महिलांची गुलामगिरी, आदिवासींचे अलगीकरण, गरिबी, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, अशिक्षितपणा या समस्या मानगुटी स्वार होत्या. जवळपास ९०% भारतीयांचं उदरनिर्वाच शेती हेच एकमेव साधन होतं. तात्कालीन शेतीच्या समस्याही स्थळपरत्वे आणि कालपरत्वे वेगवेगळ्या होत्या. शेतीशी निगडित जमीनदार, शेतकरी, कूळ, शेतमजूर इत्यादी समूह होते. त्या सर्वांच्या कल्याणाच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी (SMALL HOLDINGS IN INDIA AND THEIR REMEDIES) 'लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय' या लेखातून त्यांच्या समस्यांवर मूलभूत प्रकाश टाकताना ते म्हणतात की, शेती हा मानवाला अन्नपुरवठा करणारा सर्वात मोठा उद्योग आहे. म्हणून शासनाने त्याला उद्योगाचा दर्जा देऊन २४ तास मूलभूत सुविधा पुरवण्याची व्यवस्था करावी. शेतकऱ्यांनी शेतीवरील ओझं



कमी करावं. त्यासाठी शेतकऱ्यांनी कमी मुलांना जन्माला घालावे. जन्माला घातलेल्या मुलांपैकी एकच मुलगा शेतीत ठेवून, इतरांना व्यापार, उद्योग, व्यवसाय, नोकरी, ज्ञान-तंत्रज्ञान, संशोधन इत्यादी क्षेत्रांमध्ये पाठवावे. शेतकऱ्यांनी परदेशी दौरे करून तेथील शेती विकसनाचे तंत्रज्ञान आत्मसात करून ते अंगीकारावे. शेती सोबत जोडधंदाही करावा.

पुढे त्यांनी शेतीसाठी २४ तास पाणी आणि वीज मिळवून देण्यासाठी नदीजोड प्रकल्पाचा यशस्वी आराखडा मांडून हरितक्रांतीचे बीजारोपण केले होते. महापुराने तथा बारमाही ओसंडून वाहणाऱ्या नद्यांचे पाणी कोरड्या नद्यांमध्ये वळते करून ते धरणामध्ये साठवावे. त्याचा उपयोग सिंचन, विद्युत निर्मिती, जलवाहतूक, पिण्याचे पाणी व उद्योग निर्मितीसाठी करावा. यासाठी त्यांनी दामोदर नदी, सोन नदी, कोसी नदी, महानदी इत्यादींसह संपूर्ण भारतात १९४२ ते १९४६ दरम्यान देशाच्या मजूरमंत्री पदावरून १५ धरणांचे संकल्पचित्र सरकारला सादर केले होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ पासून शेती, शेतकरी व शेतमजुरांच्या समस्या समजून त्यांना वाचा फोडणे व न्याय मिळवून देण्याच्या क्रांतिकार्याला प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून सुरुवात केली होती. त्यावेळच्या कोकण भागातील ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नासिक या भागातील अनोखी भूधारणा पद्धती नष्ट करण्यासाठी अनेक परिषदा घेऊन शेतकऱ्यांचे मार्गदर्शन, समुपदेशन तथा सांत्वन केले. सावंतवाडी सारख्या आडवळणाच्या ठिकाणी जाऊन शेतकऱ्यांच्या बाजूने न्यायालयीन लढा सुद्धा लढला. त्याच वर्षी सी. के. बोले यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या शेतकरी संघाच्या अनेक बैठका, परिषदा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शनात पार पडल्या. ना.ना. पाटील, भाई अनंत चित्रे यांचेही चांगले सहकार्य लाभले. खोतांनी शेतीच्या उत्पन्नातील आपला वाटा थोडासा कमी करावा यासाठी शेतकरी संघाने प्रयत्न केले. परंतु खोतांनी जुमानले नाही. शेवटी चरी गावच्या परिसरातील शेतकऱ्यांनी संघर्षासाठी कंबर कसून संप घोषित केला. आजूबाजूच्या १४ गावांनी संपात सहभाग घेतला.

संपाचं लोन दूरपर्यंत पसरलं. जवळपास सात वर्ष शेतकऱ्यांनी संप चालू ठेवला. तो भारतातील पहिला आणि एकमेव दीर्घकालीन संप होता. त्यावेळी शेती हेच एकमेव उदरनिर्वाचनाचे साधन होतं. प्रचंड हाल-अपेष्टा सोसून जनावरांसाठी ठेवलेला भाताचा कोंडा, जंगली फळे, आणि पाला-पाचोळा खाऊन शेतकऱ्यांनी दिवस काढले. अजिबात माघार घेतली नाही. शेवटी १९३७ मध्ये मोरारजी देसाई यांच्या मध्यस्थीने संप मागे घेण्यात आला. परंतु खोती पद्धत नष्ट करणार नाही असे त्यांनी सांगितले. म्हणून १७ सप्टेंबर १९३७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई प्रांत विधिमंडळात अमानवी, जुलमी, अन्यायी, अत्याचारी खोती पद्धती संपुष्टात आणण्यासाठी विधेयक सादर केले. परंतु ते संमत होऊ शकले नाही. कारण त्यामध्ये अनेकांचे हितसंबंध गुंतलेले होते. १० जानेवारी १९३८ रोजी शेतकऱ्यांच्या हितासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई प्रांत विधिमंडळावर दहा हजार शेतकऱ्यांचा भारतातील पहिला मोर्चा काढून कायदेशीर रित्या त्यांच्या मागण्यांचे निवेदन शासनाला सादर केले. त्यांचे खोती पद्धती नष्ट करण्याचे विधेयक आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात शेतकरी, शेतमजूर तसेच भारतीय जनतेच्या हितासाठी वेळोवेळी पास केलेल्या 'कमाल जमीन धारणा' कायद्यांचे ते ब्ल्यू प्रिंटच होते.

भारतीय संविधान निर्मितीचे वारे वाहत असताना त्यामध्ये अस्पृश्यांच्या संरक्षणाची योजना, भारताच्या आर्थिक पुनर्रचनेचा आराखडा व शेती विषयक महत्त्वपूर्ण विवेचन करून शेती हा शासकीय उद्योग असावा. असे विचार अंतर्भूत असणारा (STATES AND MINORITIES) 'राज्य आणि अल्पसंख्यांक' मसुदा तयार करून १९४६ ला घटना समितीला सादर केला. ज्यामध्ये स्वतंत्र भारतातील उद्योग, विमा व शेतीचे राष्ट्रीयीकरण करून ते सर्व राज्याच्या मालकीचे असावे असे अपेक्षित होते. जेणेकरून विषमतेची दरी कायमची बुजवली जाऊन मानवी मूल्यांची प्रस्थापना होईल. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशात सामाजिक व आर्थिक लोकशाही निर्माण होण्यासाठी राज्य समाजवादाची संकल्पना मांडली. त्या संकल्पनेतून शेती विकास औद्योगिक विकास यासाठी शासनाने पुढाकार घेऊन देशातील बेरोजगारी, दारिद्र्य, आर्थिक विषमता यावर मात करावी. त्यांचा हा राज्य समाजवादाचा विचार म्हणजे सामाजिक न्यायाच्या दिशेने वाटचाल करणारा राष्ट्रीय एकात्मतेचा विचार होता, हेच स्पष्ट होते.

# सफर नयनरम्य युरोपची




महेश निलंगेकर

संपर्क : 9372070101.


आधुनिक केसरी

**आमच्या लग्नाचा पंचविसावा वाढदिवस, आयुष्यभर कसा स्मरणात राहील, हा विचार अनेक दिवस मनात घोळत होता आणि अखेर त्यावर उपाय सापडला, अर्थातच नितांत सुंदर युरोपची भेट घेणं. वाढदिवस जरी आम्हा दोघांच्या तमाचा असला, तरी आमच्या संसार वेलीवरच्या दोन फुलांशिवाय आम्ही हा वाढदिवस साजरा करणं शक्य नव्हते. त्यामुळे युरोप पर्यटनाची सर्व योजना आखून मी पत्नी आणि आमच्या दोन मुली असे आम्ही चौघांनी लंडनसाठी प्रस्थान केलं. पर्यटन कंपनीमार्फत युरोपमधील एकूण दहा देशांना भेट देण्याचा योग आला. मुंबईहून आम्ही कुवेत एअरलाइन्सन रात्री अकराला निघून कुवेतमार्गे अंदाजे साडेचार हजार मैलांचा प्रवास लंडनच्या विमानतळावर उतरलो तेव्हा आम्ही यापैकी थंडीने कुडकुडत होतो.**

लंडनच्या लहरी वातावरणाला अनुसरून पावसानं आमचं स्वागत केलं. जगातील इतर देशांतील पर्यटकाप्रमाणे भारतीयांच्या मनातही इंग्लंड एक अनामिक ओढ असावी असं वाटतं तिष्यं विशेषतः उन्हाळ्यात साभरातील पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. अर्थात हा अनुभव जागोजागी युरोपच्या दौऱ्यात येत होता. लंडनची लोकसंख्या अंदाजे १७ लाख आहे व शहर १०० चौरस किलोमीटरवर पसरले आहे. तसंही जागतिक पातळीवर लंडनची एक ऐतिहासिक, भौगोलिक व राजकीय ओळख आहे, अशा लंडनचे वेगळेपण पावलोपावली लंडन आय नावाच्या एका प्रचंड मोठ्या आकाश पाळण्यातून दूरवर पसरलेले शहराचं, थेम्स नदीचं, पार्लमेंट हाउस, बिगवेन ड्याळाचं, वेस्ट मिनिस्टर पुलाचं व सर्वत्र पसरलेल्या लहानमोठ्या इमारतीचं एक विलोभनीय दृश्य आपल्या डोळ्यांना सुखावत असतं. नागमोडी वळणं घेत शहरातून वाहणारी थेम्स नदी, तिचं स्वच्छ, नितळ पाणी, त्यावर बिहार करणाऱ्या लहानमोठ्या बोटी, नदीवर जागोजागी दिसणारे, निरनिराळ्या रंगरूपाचे, आकाराचे पूल, आपल्याच मस्तीत भटकणारी तरुणाई हे सगळे निरखून पाहताना आपण केव्हाच स्वतःला हरवून जातो. आपल्या आपलं भारतीय मन कळत जीवन पद्धतीशी तुलना करीत राहत. कुठेही प्लास्टिकच्या पिशव्या, पान उपन्या पानाच्या याच्या पिचकाया, रस्त्याच्या कडेला लावलेल्या चहाच्या वडापावच्या गाड्या वगैरे काहीही दिसले नाहीत. त्यामुळे वेगळ्या अर्थानि कासारखे वाटत होते. सगळ्यात अवचित करणारी गोष्ट म्हणजे आमच्या संपूर्ण प्रवासात कुठेही मटकी कुत्री, मांजरे, डुकरे, गाढव, बैल, म्हैस काहीही दिसले नाही. दिसल्या फक्त हिरव्यागार कुरणात



मनसोक्त चरणाऱ्या गाई व शाळकरी वयात क्रमिक पुस्तकात वाचलेल्या व नंतरच्या नापुष्यात वारंवार वाचण्यात आलेल्या सर्वाधिक भावलेल्या म्हणजेच बकिंगहम पैलेस, पार्लमेंट हाउस, बिगवेन टॉवर ब्रिज, मादाम तुसाँनी उभारलेल्या मेणाच्या म्युझियम आणि अत्यंत देखण्या शेकडो नव्या-जुन्या भारती बहुतेक सर्व शहरात हॉटेलच्या बाहेर फुटपाथ लागत बल-खुर्च्या मांडलेल्या असतात. लोक निवांतपणे गप्पागोष्टी नत, सिगारेटचे झुरके घेत, बिअर-दारूचा आस्वाद घेत, रि-पिझ्झा खाण्यात गुंग असतात. आपल्याकड पुणे-मुंबई, सांगली-मिरज, हैदराबाद- कदराबाद अशा शहरांच्या नावाचा अतूट जोड्यांमध्ये लेख करण्याचा जसा प्रघात आहे. तशा पद्धतीने जागतिक नळीवर लंडन परिस असा उल्लेख केला जातो. या दोन बच्या शहरामध्ये अंदाजे चारशे किलोमीटर अंतर असावं. परिस दरम्यान युरो-स्टार नावाची रेल्वे धावते. एरवी नीवरून धावणाऱ्या या वेगवान गाडीचा मार्ग इंग्लिश खाडी काढलेला आहे. लंडनहून निघालेली ही गाडी ताशी तीनशे लोमीटर वेगानं दोन ते अडीच तासांत घेट पॅरिसलाच थांबते. पॅरिस हे फ्रान्समधील एक अदभुत शहर आहे. ज्याची उता, कला, सांस्कृतिक, रोमांचक इतिहास जगप्रसिद्ध 3. पॅरिसमध्ये केलेल्या कोणत्याही भ्रमणाच्या मार्गातून ण आयफेल टॉवरच्या विशालतेचे दर्शन घेत असतो. स एलिजे हा दोन किलोमीटरचा रस्ता आहे जो की मधील विविध लक्झरी शॉपिंग, कॅफे, थिएटरसाठी आहे. आयफेल टॉवरवरून पॅरिसच्या दूरवर सफर नयनरम्य युरोपची पसरलेल्या नयनरम्य शहराचे दर्शन घडते. परिसपासून रोमपर्यंत अंदाजे तीन हजार किलोमीटरचा प्रवास आम्ही एका आराम बसने केला. आपल्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट म्हणजे पुरोपमध्ये मोटारी आहेत तेवढ्याच किंवा त्यापेक्षा जास्त सायकल्स आहेत. युरोपमधील सर्वच रस्ते किमान चार पदरी असतात. आमचा प्रवास सुरू होण्यापूर्वीच आमच्या टुर गाइड मे आम्हाला सांगितले होते, की संपूर्ण प्रवासात तुम्ही कोठेही, कोणत्याही नळाचे पाणी निःसंकोचपणे पिऊ शकता. कुनाफ येथील ट्यूलिप गार्डन तर जगप्रसिद्धच आहे, हे गार्डन निरनिराळ्या रंगाच्या व आकाराच्या ट्यूलिप्सन बहरलेलं आहे. अनेक रंगीबेरंगी या पार्श्वभूमीवर मनाला प्रसन्न करणारी ताजी मऊशार



हिरवळ यांचा एक विलोभनीय संगम येथे साकारला आहे. मुसेल्स ही बेल्जियमची राजधानी, येथील अँड पॅलेस स्क्वेअरमध्ये एका पेक्षा एक देखणे, गौथिक पद्धतीने बांधकाम केलेल्या अनेक मजली इमारती अत्यंत सुबक, मोहक कलाकुसरीने सजविलेल्या आहेत. युरोपमधील अजून एक वैशिष्ट असं, की येथील देश एकमेकाच्या इतके जवळ आहेत, की एके दिवशी आम्ही नाश्ता फ्रान्समध्ये केला तर दुपारचं जेवण बेल्जियममध्ये केलं आणि रात्रीचं जेवण हॉलंडमध्ये केलं. जर्मनीतील परिस्टमधून प्रवास करत पृथ्वीवरच्या स्वर्गाला भेट देण्यासाठी आम्ही विझला मार्गस्थ झालो. प्राकृतिक सौंदर्य व अत्यंत उत्तम वातावरण ही या देशाची खासियत आहे. तसे आम्हाला स्विस ऍल्प्सचे दर्शन विमानातूनच झाले होते, पण प्रत्यक्षात ते खूपच मनमोहक आहेत. ह्याईन फॉल्स, माउंट इटलीस, लुसेन लेक करत आम्ही या युरोपमधील सर्वात उंच व बर्फाच्छादित स्नो फॉलचा सुद्धा आनंद लुटला. स्विडमधील आमचे हटिल सर्वात सुंदर होते, कारण ते अगदी लूमन लेकच्या किनारी व स्वीस ऍल्पाच्या रांगांनी घेरलेले होते. युरोप दर्शनमधील आमचा शेवटचा देश होतो तो म्हणजे इटली. व्हेनिसला कालव्याचे शहर म्हणतात पण हे कालवे समुद्राच्या पाण्याचे आहेत. समुद्रातील छोट्या-मोठ्या बेटांच एका रांगेत योजनाबद्ध रीतीने बांधलेली घरं म्हणून तेथील रहिवाशांना बाजारहाट करण्यासाठी इतर कामांसाठी छोट्या नावांमधून जा-ये करावी लागते, आपल्या केरळमधील बॅकवॉटरच्या स्वरूपाचीच ही रचना. आपल्या नागरी जीवनात काहीशी अनोखी व स्तिमित करणारी व्हेनिसमध्ये सेंट मार्क बेसिलिका चर्चच्या परिसरात प्रचंड मोठा चौक आहे. हे चर्च अत्यंत देखणे आहे. तेथे जवळजवळ एक हजा वर्षांपूर्वी उभारलेला ३२५ फुट उंचीचा क्लॉक टॉवर आहे. शेजारीच असलेल्या मोरेन प्लस फैक्टरीमध्ये प्रवाशांच्या देखत रंगीबेरंगी कार्याच्या अत्यंत सुबक वस्तू पाहता पाहता तयार करून दाखविल्या जातात. पिसा येथील पांढराशुभ संगमरवरी सात मजली झुकलेला मनोरा पाहताना शाळकरी वयाच्या आठवणी चाळवल्या गेल्या. रोमचं महत्त्व सारं जग जागतं. साधारणतः दोन ते तीन हजार वर्षांपासून बहरत गेलेल्या रोमन संस्कृतीच्या पाऊलखुणा कुणालाही भुरळ घातल्याशिवाय राहत नाहीत.

इटली, बेल्जियम, इंग्लड, हॉलंड, स्विड अशा एकाहून एक सरस आणि निसर्गरम्य देशांतील विविध प्रेक्षण स्थळांनी आमच्या लग्नाचा पंचविसावा वाढदिवस संस्मरण केला, यात शंकाच नाही.


# आदिवासी विकास आणि राजकारण




प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४


आधुनिक केसरी

**भारतीय स्वातंत्र्याला पंचाहत्तर वर्षे उलटून गेल्यानंतरही या देशातील एक फार मोठा समूह आजही मुख्य प्रवाहात आला नसेल आणि त्याच्या मागण्यांकडे आम्ही गांभीर्यपूर्वक पाहत नसू तर आमच्यात आणखी भातृभाव निर्माण झाला नाही, असेच म्हणावे लागेल. ज्यांना आपण आदिवासी म्हणतो त्यांचे इतर समुहापेक्षा काही वेगळे प्रश्न आहेत, समस्या आहेत हे आपण लक्षात घेत नाही. कारण नागरीकरण झालेल्या समुहाचे प्रश्न आणि आदिवासी प्रश्न भिन्न असताना एकाच मोजपट्टीने आपणास हे मोजता येणार नाही.**



## क्षितिजापल्याड

एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासींचे प्रमाण नऊ ते दहा टक्के असल्याचे विविध अभ्यासांती सिद्ध झाले आहे. जवळपास चारशे एकसष्ठ विविध आदिवासी समूह भारतात राहतात. ही सबंध लोकसंख्या विविध राज्यांत आणि त्या त्या राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये इतस्ततः विखुरलेली आहे. निवडणुकीच्या राजकारणावर प्रभाव पाडण्यासाठी ज्या एकगठ्ठा मतदानाची अपेक्षा राजकारणी मंडळींना असते, तसा काही प्रकार आदिवासी मतदारांच्या बाबतीत दिसून येत नाही. त्यामुळे ज्यांच्या मतांचा प्रभाव दिसणार नाही त्यांच्याकडे कोण कशाला लक्ष देईल? शासनव्यवस्था आज एवढी निगरगट्ट आणि असंवेदनशील झालेली आहे की, हजारो आणि लाखोंचे मोर्चे निघूनही ती तसूभरही हलायला तयार नाही. मग असंघटित आणि पारंपरिक जीवन जगणारा अशिक्षित आदिवासी समाज एवढ्या मोठ्या शक्तीच्या पुढे हतबल झाल्यास नवल ते काय? अगदी २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण फक्त सव्वीस टक्के इतके आहे. अगोदरच कमालीचे दारिद्र्य, पारंपरिक लोकजीवन, जंगल हेच ज्यांचे सर्वस्व किंबहुना ज्यांची उपजीविकाच ऐंशी टक्के जंगलावर अवलंबून आहे, त्या आदिवासी समुहाला विविध कायद्यांच्या नावाखाली जंगलातून हुसकावून लावण्यात येत असेल आणि कोणताच विचार न करता मुख्य प्रवाहाचा भाग बना असा आपण पवित्रा घेत असू तर त्याची अवस्था पाण्याबाहेर काढलेल्या मासोळीसारखी होईल. हा समूह कोणात न मिसळणारा, थोडासा लाजणारा, संकोची आणि आपल्यातच खुश राहणारा असल्यामुळे त्यांना त्यांच्या मुळासकट उखडून इतरत्र कोठेही हलवण्यापूर्वी त्यांचा केवळ समाजशास्त्रीय अभ्यास करून भागणार नाही तर त्यांचे मानसशास्त्र देखील मजून घ्यावे लागणार आहे. कोणताही माणूस असो वा समूह तो केवळ शिक्षणामुळे सुधारू शकतो, हे सार्वत्रिक सत्य आहे. आदिवासींच्या विकासासाठी स्वातंत्र्योत्तर काळात जे काही प्रयत्न झाले त्यापैकी शैक्षणिक प्रयत्न हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. शासकीय पातळीवरून अत्यंत प्रामाणिक प्रयत्न करण्यात आले असे जरी गृहीत धरले तरी त्याचे पर्यवसान आदिवासींचा शैक्षणिक स्तर ज्या प्रमाणात उंचावव्यास हवा होता तो मात्र झाला नाही, हे खेदाने म्हणावे लागेल. आदिवासी आश्रमशाळा ही एक चांगली संकल्पना होती, मात्र आपल्या इथे प्रत्येक गोष्टीचे मातेरे करायचे आपण अलिखित ठरवलेच आहे त्याला अनुसरूनच या शाळांच्या बाबतीतही हीच अवस्था अनुभवास आली. काही सन्माननीय अपवाद वगळता ह्या आश्रमशाळा म्हणजे बिनदिक्कतपणे पैसा मिळवण्याचे, कमावण्याचे साधन म्हणून त्याकडे पाहिले गेले. ह्या सर्व आश्रमशाळांचे सामाजिक अंकेक्षण झाल्यास यात प्रामाणिकपणे किती मंडळींनी काम केले आणि आदिवासी मुलांच्या शैक्षणिक कार्यास किती हातभार लावला आणि निव्वळ अनुदान लाटण्यासाठी किती हाभागांनी या शाळा काढल्या हे पुढे येईल. ज्या शाळा अस्तित्वात आहेत त्यांची जीर्ण झालेली अवस्था, पाण्याची सोय नसणे, स्वच्छता गृहांची असलेली वानवा, खाण्यापिण्याची होणारी आबाळ आणि पुरेसा नसलेला शिक्षकवर्ग. या सर्वांचा परिपाक असा की, आदिवासी मुलांसाठी सुरू करण्यात आलेल्या या शाळा आज बंद होण्याच्या मार्गावर आहेत. आदिवासी मुलांच्या बाबतीत सर्वात मोठी अडचण भाषेची आहे. ते ज्या बोलीत बोलतात ती शिक्षकांना अवगत नसते आणि ज्या प्रांताची जी मुख्य भाषा - ज्यात शैक्षणिक कार्य चालते - ती मुलांना समजत नाही. मातृभाषेत दिले जाणारे शिक्षण आपल्या आकलनात भर घालणारे असते. म्हणून भारत सोडून जेवढे विकसित राष्ट्र आहेत, तेथे मातृभाषेतूनच शिक्षण देण्यावर भर दिला जातो. आम्ही नवीन शैक्षणिक धोरणामध्ये मातृभाषेला प्राधान्य देण्याचे ठरवले असेल तर आदिवासींच्या शिक्षणाबाबत काय करणार आहोत?



हा प्रश्न अद्यापपर्यंत तरी अनुत्तरीतच आहे. अलीकडच्या काळात आदिवासींना वनवासी संबोधण्याची रीत येऊ पाहत आहे. खरेतर वनवासी हा इतिहासात शिक्षेशी संबधित शब्द असल्याचे दिसून येते. त्यातून निसर्गनिष्ठेऐवजी अपमान ध्वनीत होतो. आदिवासींना सन्मानाने जगता यावे, ते मुख्य प्रवाहात यावेत आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचाही सहभाग असावा यासाठी आदिवासींचा बुद्धिभेद करण्याऐवजी काहीएक प्रामाणिक प्रयत्न झाले पाहिजेत. जागतिक स्तरावर १९९३ हे वर्ष आदिवासी वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. तर भारतात जी काही नऊ दहा अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलने आजपर्यंत झाली यातून आदिवासींना सन्मानाने जीवन जगता येण्यासाठी काय उपाययोजना आखल्या पाहिजेत, याविषयी चर्चा करण्यात आली. आदिवासी समुहाच्या विविध चळवळी, चिपको आंदोलन, बिरसा मुंढाचा लढा या सर्व गोष्टी आत्मसन्मानासाठी होत्या असेच म्हणावे लागेल. सन्मानास ठेच पोहचून केलेला विकास माणसास पंगू बनवतो. आदिवासी समुदाय हा स्वतंत्र बाण्याचा आणि त्यामुळे इतरांपासून फटकून वागणारा असेल तर त्यांचा सन्मान अबाधित ठेवून मुख्य धारेत कसे आणता येईल, याचे नियोजन राज्यकर्त्यांना करावे लागेल. आदिवासी चळवळ आणि साहित्यामध्ये अनेक लोकांचे कार्य आहे. ज्यात प्रामुख्याने भूजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, गोविंद गारे, विनायक तुमराम, उषाकिरण आत्राम, कविता आत्राम अशी कितीतरी नावे आपणास या संदर्भात घेता येतील. आदिवासींचा इतिहास शौर्याचा इतिहास आहे. आपण कोणाचे गुलाम होऊ ही कल्पनाच ते करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या सांस्कृतिक मुल्यांसह मुख्य प्रवाहात कसे सामावून घेता येईल याबद्दल निश्चितच चर्चा झाली पाहिजे.**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# जयंती सोहळा प्रेरणादायी व्हावा!




बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२


आधुनिक केसरी

**एप्रिल महिना उजाडला की आपल्या सर्वांना बाबासाहेबांच्या जयंतीचे वेध लागतात. गावोगावी आणि शहरांमध्ये बैठका घेऊन जयंती समितीची स्थापना केली जाते.आणि मग झाडून सगळे बाबासाहेबांचा जयंती सोहळा दणक्यात साजरा करण्यासाठी तयारीला लागतात.वर्गणी जमा केली जाते,मिरवणुकीचा डीजे किंवा डॉल्बी ठरवला जातो.गायन मंडळ निश्चित करुन अडव्हान्स रक्कम दिली जाते.जयंती सोहळ्याला लागणारे सगळे साहित्य खरेदी केले जाते.या सगळ्या धावपळीत १४ एप्रिल तारीख अगदी उद्यावर आली की आमचा उत्साह,जोश आणि आनंद द्विगुणित होतो.**

रात्री बरोबर बारा वाजता फटाक्यांची आतिषबाजी करतो. सारा परिसर दणाणून सोडतो.

१४ एप्रिल १८९१ रोजी थोर समाजसुधारक, महामानव, बोधिसत्व, विचारवंत, लेखक, कायदेपंडित, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. भारतात समतेचे, बंधुतेचे, न्यायाचे आणि सामाजिक परिवर्तनाचे वारे वाहू लागले. रामजी सुभेदार हे जाणकार व व्यवस्थेला तोंड देऊन अन्यायाविरुद्ध लढणारे वडील होते. त्यांनी लहान भिवाला अर्थात उद्याच्या बाबासाहेबांना, एका क्रांतिकारी युगपुरुषाला घडविण्यासाठी जीवाचे रान केले. हाल अपेष्टा सोसून चांगली पुस्तके खरेदी करून ती पुस्तके भिवाला वाचायला देताना त्यांना अभिमान वाटत असे.आपला भिवा जीवनात नक्की मोठा माणूस होणार हे रामजी सुभेदारांना मनोमन वाटत होते. बालवयापासून ते अगदी उच्च विद्याविभूषित झाल्यावर आणि अनेक सामाजिक लढे लढताना बाबासाहेबांना समाज कंटकांकडून अपमानास्पद वागणूक मिळाली होती. तरीही न डगमगता अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आणि जातीभेदाचे व सामाजिक विषमतेचे विखारी चटके सोसून बाबासाहेबांनी भारतातील सामाजिक व्यवस्था बदलून टाकली. त्यांनी गावकुसाबाहेर राहणाऱ्या व जनावरांपेक्षाही जास्त हीन दर्जाच्या जीवनात खितपत पडलेल्या माणसांना माणसांत आणले.माणसांना माणसांचा दर्जा मिळवून दिला. जातियतेला तडे घातले, धर्मव्यवस्था बदलून टाकली. राज्यघटनेच्या माध्यमातून सर्वांना समतेचा, न्यायाचा, बंधुतेचा जीवनमार्ग बहाल केला. शिक्षणाची आणि आरक्षणाची कवचकुंडले दिली. स्वतःचा उध्दार स्वतः करण्यासाठी जीवनमार्ग दिला.

आता आपण हे सगळं विसरून गेलोय. बाबासाहेबांची जयंती साजरी कशासाठी करायची याचा उद्देश आणि मतितार्थ आपण विसरलो आहोत. महामानवांची जयंती म्हणजे एक दिवस दणदणीत साजरा होणारा उत्सव अशी आपल्या सर्वांची धारणा झाली आहे.काही गावांमध्ये तर जयंती म्हणजे फक्त मिरवणूक काढणे, डीजे किंवा डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजात मनसोक्त नाचणे एवढेच मर्यादित झाले आहे.



बाबासाहेबांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे आम्हाला वेळोवेळी बजावले होते. यातलं आम्ही सध्या काहीही करत नाही. शिक्षण अर्ध्यावर सोडायचे, मिळेल तो रोजगार करायचा, रोज सायंकाळी व्यसनात बुडायचे. अशाने आपण प्रकाशाकडून परत अंधाराकडे मार्गक्रमण सुरू केले आहे असे दिसते. रमाईंनी कितीतरी खस्ता खाऊन,उ पाशी पोटी राहून उच्च शिक्षणासाठी बाबासाहेबांना पैसा पाठवला. याचा विसर आम्हाला पडला. आम्ही आमच्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी काहीच तरतूद करत नाही. गरीबीमुळे आज आपले मुलेमुली अर्ध्यावर शिक्षण सोडून देत आहेत आणि आपण बाबासाहेबांचे सूज्ञ व जाणकार अनुयायी बाबासाहेबांच्या जयंती सोहळ्यात बिनकामाच्या बाबींवर लाखो करोडो रुपयांचा चुराडा करतोय. जयंती साजरी करण्याचा उद्देश विसरून जाऊन दरवर्षी फक्त एक उत्सव म्हणून जयंती साजरी करण्यात कुठलेही शहाणपण नाही. जयंतीमध्ये बिनकामाच्या बाबींवरचा खर्च बंद करून आपल्या समाजातील मुलामुलींना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत केली तर बाबासाहेबांचा जयंती सोहळा प्रेरणादायी होईल. पण हे किती अनुयायांना पचणी पडेल हे ही तितकेच महत्त्वाचे आहे. नाहीतर म्हणतील- आम्ही आमच्या पध्दतीने जयंती साजरी करणार, आम्हाला कोणी जास्तीचा शहाणपणा शिकवू नये. पण सगळे अशा विचारांचे नसतात. काहीजण बाबासाहेबांचा जयंती सोहळा प्रेरणादायी होण्यासाठी प्रयत्न करत असतात. हे ही नसे थोडके. तेव्हा समस्त भीम अनुयायांना हात जोडून कळकळीची नम्र विनंती की बाबासाहेबांचा जयंती सोहळा प्रेरणादायी होण्यासाठी प्रयत्न करत राहा. जी माणसे आपला पराक्रमी इतिहास विसरतात ती माणसे इतिहास घडवू शकत नाहीत हे बाबासाहेबांनी सांगितलेले आहे आणि आपण नेमके हेच विसरलोय! हे आपले मोठे दुर्दैव आहे.


हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नाचल्याशिवाय महामानवांची जयंती साजरीच होत नाही




सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068


आधुनिक केसरी

**प्रत्येक जातीने वाटून घेतलेल्या प्रत्येक महामानवांच्या जयंत्या देशात व राज्यात अगदी मोठ्या दिमाखात व उत्साहात साजऱ्या केल्या जात असतात.ज्या त्या महामानवांच्या कार्याचे गोडवे गात असलेली गाणी अगदी डी.जे.च्या तालावर वाजता वाजता अंगप्रदर्शन करणारी शरीरे सुद्धा त्याच जोशात हलत असतात.महामानवांनी जणू आपण त्यांच्या जयंती दिनी नाचावे म्हणूनच तर महामानावांनी जन्म घेतला होता की काय असेच वाटू लागले आहे.जयंत्यांचे स्वरूप हे दिवसेंदिवस बदलतच चालले आहे. पूर्वी विचार पेरणारा उत्सव होत होता.आता होत नाही असे ही नाही परंतु विचार ऐकणारा प्रवाह व कानांना ऐकुन घेण्याची क्षमता विकसित करणारा श्रोता वर्ग गायबच झाला आहे.तो डी.जे.समोर नाचण्या साठीच उरलेला आहे.**

डी.जे.च्या पुढे नाचणाऱ्यांची संख्या आणि एखादा विचार सांगणाऱ्या विचाराच्या प्रवाहापुढे असणारी संख्या यामध्ये खूप मोठी तफावत पाहायला मिळते. ही तफावत भरून काढण्याची जबाबदारी सुद्धा इथल्या जयंती आयोजकांची असतेच असते.
जेवढा खर्च हा डी.जे.च्या तालावर नाचण्या साठी होत असतो.तेवढाच खर्च हा महामानवांचे विचार पेरण्यासाठी सुद्धा होणे अपेक्षित आहे.तसे पाहायला गेलेच तर जयंतीला डी.जे. आणणे हा तर वायफळ खर्चच आहे.शिवाय सामाजिक रित्या एकत्रितपणे गोळा केलेल्या पैशांचा तो सत्यानाशच म्हणावा लागेल.असो आपल्याच पैशांची आपणच आपली लावलेली ही वाट असते.त्यामुळे इथे वाट लागलेली असली तरी वाट लागलीच नाही असे म्हणावे लागेल.
सामाजिक धुडगूस घालणारे व त्यास खत पाणी घालणारे सुद्धा आपल्या अवती भवती दिसतातच.
स्वतःहून डी.जे.चा संपूर्ण खर्च देणारे सुद्धा अशा काळात मोठे मन दाखवत असतात.परंतु जिथे पैसे गोळा करून जेमतेम काही रक्कम गोळा होत असते. अशा रक्कमेतून सुद्धा मोठा खर्च हा डी.जे.चा च असतो.इतके महत्व त्या डी.जे. ला प्राप्त झालेले असते.जयंती हा एक सामुहिक कार्यक्रमच असतो. एकत्र येऊन हा उत्सव साजरा करण्याचा दिवस असतो.परंतु हा दिवस सामाजिक कार्यक्रमांतून सामाजिक ध्येय,धोरणे,बांधलकि व सामाजिक प्रबोधनाची दिशा दाखविणारा असला पाहिजे.

कारण ज्यांची जयंती साजरी होत असते. त्यांच्या जयंती ला घेऊन त्यांचे गुणगाण हे नाचून होण्यापेक्षा विचार पेरून व्हायला हवे.डी.जे, नाचणे हे सर्व वैयक्तिक आयुष्यात आनंद घेण्याच्या गोष्टी आहेत. तो आनंद वैयक्तिक कार्यक्रमातून घेण्याचा प्रयत्न व्हायला हवा.वैयक्तिक आयुष्यात मात्र इथे पैशांचा विचार केला जात असतो.जो धुडगूस सामाजिक कार्यक्रमातून दिसतो.तो स्वतःच्या वैयक्तिक आयुष्यात कुणीच घालत नाही.परंतु सामाजिक दृष्ट्या गोळा करण्यात आलेल्या पैशांची विल्हेवाट लावण्याचा प्रकारच हा भला मोठा व दणक्यात आवाज येणाऱ्या डी जे ला आणलेल्या ह्या जयंतीतून होत असतो.आज जयंतीचे पहिले आकर्षण डी जे हाच बनला आहे.त्याशिवाय जयंती होतच नाही.
डी जे असलाच पाहिजे हा हट्ट धरला जात असतो.
डी जे नसेल तर जयंती होणारच नाही.डी जे नसेल तर मग जयंती तरी कशाला साजरी करायची इथपर्यंत सुद्धा निर्णय घेतले जात असतात.अर्ध्या लाखापासून ते एक लाखा पर्यंतचे डी जे जयंत्यांच्या मिरवणुकीत वाजत असतात.डी जे शिवाय जयंती उत्साहात होत नाही.अशी मानसिकता लोकांनी करून घेतली आहे.त्यामुळे जयंत्यांच्या नियोजनात डी जे ला सर्वप्रथम स्थान यायला लागले आहे.जे महामानवांना अपेक्षित नाही.तेच तर अनुकरणीय झालेले आहे. नाचण्याबद्दल आणि डी जे आणण्या बद्दल काहीच नाही.नाचणे हा कलेचा भाग आहे.



आणि तो नाच कोणत्याही आवाजाच्या क्षमतेवर ज्याच्या त्याच्या आवडीनुसार होऊ शकतो.ही कला जपत असताना त्या कलेतून माणसांनी घेतलेला आनंद (जरी त्यासाठी लाखो रुपये मोजले असले तरी ) कोणत्याच तराजूत मोजता येणार नाही.डी जे कोणता आणला,किती महागातला होता,किती दणक्यात आवाज होता, हे सर्व काही चर्चेत येत असते.काय तो डी जे आणि त्या डी जे च्या तालावर नाचणारे काय ते अनुयायी सगळं कसं एकदम ओक्केच ओक्के असतं.डी जे च्या तालावरच जयंती एकच नंबर झाल्याचा गवगवा होत असतो.डी जे शिवाय जयंतीला मज्जाच नाही.हा जो सांगण्याचा प्रयत्न होत असतो ना तो हाच प्रयत्न खऱ्या अर्थाने महामानवांच्या विचारांना मागे खेचणारा ठरत असतो.सामजिक बदल घडवून आणण्यासाठी संघर्ष करणाऱ्या अनेक महामानवांनी आपले आयुष्य फुलविले.त्यांच्या कार्यानेच इथे सामजिक परिवर्तन घडले. हाच वारसा फक्त नाचण्याने पुढे जाणारा नाही.वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी महामानवांच्या विचाराची,कार्याची व प्रबोधनाची ओळख नव्या पिढी ला होणे गरजेचे आहे.ज्या डी.जे.साठी आटापिटा केला जात असतो.तेवढाच आटापिटा हा ज्या महामानवांची जयंती असते.त्यांच्या विचारांसाठी व्हायला हवा.आज एखाद्या महामानावाची जयंती एका विशिष्ट समाज समूहाने केली की दुसऱ्या महामानवाची जयंती मोठ्या धूमधडाक्यात साजरी करण्यासाठी दुसरा समाज समूह तयार असतो.
महामानवांच्या जयंत्या साजऱ्या करण्यासाठी सुद्धा एकप्रकारे स्पर्धाच सुरू होत असल्याच्या पाहायला मिळत आहे.मोठा डी जे आणून जयंती कशी मोठी साजरी करायची ही चढा ओढ सुरू असते.एक जात दुसऱ्या जातीशी कसा द्वेष करत बसेल अशी ही गाणी त्याच डी जे वर वाजत असतात. महामानवांच्या गाण्यातून सुद्धा महामानवांचे कार्य आणि त्यातून सामाजिक प्रबोधन घडवून आणणारी गाणी सुद्धा ऐकायला मिळत असतात.परंतु हीच गाणी प्रबोधनाची गाणी म्हणून त्या कडे न पाहता मनोरंजन करण्याच्या हेतुने व त्यावर नाच व धांगडधिंगाणा करण्यासाठीच वाजू लागली आहेत.नाचल्याशिवाय महामानवांची जयंती साजरीच होत नाही.म्हणून "प्रबोधनाची गाणी बनली,मनोरंजनाची गाणी" असे म्हणावे लागेल.
त्यामुळे डी.जे.च्या तालावर वाजलेली गाणी आणि त्यावर नाचणारे अनुयायी यांना ही जयंती तर एकच नंबर वाटू लागली आहे.

# संविधान निर्माते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर




श्री.सोमनाथ खोमणे
संपर्क क्र.: ९९२२४३६०६२


आधुनिक केसरी

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हटले जाते.त्यांनी अथक परिश्रम घेऊन हे संविधान निर्माण केले.जगातील सर्वश्रेष्ठ संविधान म्हणून आपल्या संविधानाकडे पाहिले जाते.हे संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाने आपल्या देशाला लाभले.खरच आपल्यावर आणि आपल्या देशावर बाबासाहेबांचे अनंत उपकार आहेत.त्या उपकाराची परतफेड आपल्याला कधीच करता येणार नाही.एवढं अनमोल असे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आपल्या देशाप्रतीचे योगदान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान कार्यानेच संविधान हा आपला श्वास बनलेला आहे.आपल्या रोजच्या जीवनपद्धतीवरच हे आपले संविधान लागू आहे.**

आपले जीवन हे संविधानाच्या अस्तित्वाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.त्यामुळे संविधान आणि संविधानातील मूल्ये ही भारतीय नागरिकाच्या दृष्टीने खूप महत्वाची आहेत.संविधानाची मूल्ये आपण आपल्या रोजच्या जीवनात अंगीकारल्यास किंवा त्याचे जतन केल्यास नक्कीच बाबासाहेबांनी लिहिलेले हे संविधान अधिकच मजबूत होईल.संविधान निर्मात्याने हा देश लोकशाही प्रधान घडविण्यासाठी अतिशय कष्टाने २ वर्ष ११ महिने १७ दिवसांची मेहनत घेत भारतीय संविधानाची निर्मिती केली.
भारतीय संविधानाचे पवित्र्य जपणे म्हणजे संविधानिक मूल्यांचे आचरण करणे होय. संविधानात नागरिकांच्या मुलभूत हक्क व अधिकारांचा अंतर्भाव आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीय एकता व एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवादी, लोकशाही, गणराज्य प्रस्थापित करण्याचे ध्येय संविधानाचे आहे.
आपले हक्क व अधिकार मिळविण्यासाठी हेच संविधान आपल्याला संघर्ष करण्यास शिकविते.त्यामुळे आपल्या जीवनात संविधानाचा व संविधानात्मक मूल्यांचा विचार करणे व त्याचा अंगिकार करणे खूप गरजेचे आहे. संविधान निर्माण करणे सोपे नव्हते.ज्या काळात जातीयता होती.
अनेक आव्हाने समोर होती.हे सर्व असताना सुद्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशहित डोळ्यासमोर ठेवून संविधान लिहिण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे खरे देशप्रेमी होते.मी प्रथम भारतीय आणि शेवटीही भारतीय ही भूमिका त्यांची असायची.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे भारतीयत्व हे त्यांच्या कार्यातून सिद्ध केले.डॉ.बाबासाहेब आंबेडरांनी केलेल्या त्यांच्या या कार्याचा आपल्याला विसर पडता कामा नये.त्यांनी दिलेले योगदान आणि त्यांच्या त्यागाचे कायमस्वरूपी स्मरण केले पाहिजे.संविधानाने माणसाला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार दिलेले आहेत.माणसाचे हक्क आणि अधिकार देण्याची किमया या संविधानाने केलेली आहे.ज्या काळात माणूस असूनही माणसाला जगता येत नव्हते.अशा माणसांना संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी माणुस असल्याचं जीवन जगण्याचा अधिकार मिळवून दिला. संविधानाची निर्मिती झाल्यानेच खऱ्या अर्थाने इथला प्रत्येक समाज समूहातील घटक हा सन्मानाने जीवन जगत आहे.
भारतीय संविधानानेच स्वातंत्र्याची पहाट समाज मनात उगविली.
आज संविधान आहे.म्हणून आपल्या जीवनाला आकार आहे.



संविधानाची जाणीव सदैव आपण आपल्या मनात ठेवली पाहिजे.
संविधानाचे कार्य करणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.
संविधान समजावून सांगण्यासाठी आपण पुढे आले पाहिजे.शालेय जीवनात विद्यार्थ्यांना संविधानाची जास्तीत जास्त माहिती सांगणे गरजेचे आहे.जशा शालेय जीवनात विविध स्पर्धा होत असतात. तशाच प्रकारच्या स्पर्धा ह्या संविधानाच्या बाबतीत झाल्या पाहिजेत.विद्यार्थी हे संविधान साक्षर करणे आवश्यक आहे.संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कशा पध्दतीने संविधानाची निर्मिती केली याचे महत्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचले पाहिजे.कारण आपल्या देशाचे खरे भविष्य हे विद्यार्थ्यांमध्ये दडलेले आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखा अभ्यासु आणि ज्ञानवंतच खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या कष्टाने हे संविधान आपल्यासाठी दिलेले आहे.सर्व जाती धर्माच्या न्याय हक्कांचा विचार करूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धीच्या जोरावर सर्वांनाच न्याय देणारे हे संविधान आपल्यासमोर ठेवलेले आहे.हे संविधान चांगल्या पद्धतीने राबविण्याची जबाबदारी ही सरकार राज्यकर्ते आणि प्रशासनाची सर्वात मोठी जबाबदारी आहे.तितकीच हे संविधान समजून घेण्याची जबाबदारी ही प्रत्येक भारतीय नागरिकाची आहे.१४ एप्रिल हा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जयंती दिवस आपल्यासाठीच नव्हे तर समस्त मानवजातीसाठी आनंदाचा दिवस आहे.हा दिवस त्यांना समजावून घेत त्यांच्या कार्याचे स्मरण करताना त्यांचे कार्य जनमाणसात घेऊन जाण्यासाठी आपणच प्रयत्न केले पाहिजे.बाबासाहेबांची जयंती ही त्यांच्या कार्याला स्मरण करून झाली पाहिजे.शोषित,
पीडित,वंचित घटकांच्या न्याय हक्का साठी संविधान मार्गाने न्याय मिळवुन दिला पाहिजे. संविधानाचा उपयोग हा लोकांचे हित डोळ्यासमोर ठेवून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी भारतीय नागरीकांनी प्रयत्नशिल राहिले पाहिजे.संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान कार्याचे मोल हे लोकांना मिळणाऱ्या हक्क आणि अधिकारात आहे.त्यामुळे लोकांच्या हक्क आणि अधिकारासाठी संविधानिक मार्गाने लढत राहणे हेच खऱ्या अर्थाने आपल्या लोकशाहीला मजबुत करणारे आहे.त्यामुळे संविधानाचे निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या देशाला एकसंध ठेवणारे ज्ञानी व्यक्तिमत्व अत्यंत महत्वाचे असून संविधान निर्मात्यास त्यांच्या जयंती दिनी त्यांना अभिवादन करताना संविधान कार्याचे स्मरण होणे गरजेचे आहे.

# काँग्रेस सत्तेत आल्यास शेतकऱ्यांना कर्जमाफी, जीएसटीमुक्त शेती : राहुल गांधी

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** काँग्रेस पक्षाने जाहिरनाम्यात सर्वात महत्वाचे ५ मुद्दे दिले आहेत. हा जाहीरनामा खूप विचार करुन बनवला असून बंद खोलीत नाही तर देशभरातील लाखो लोकांना भेटून तो बनवला आहे. काँग्रेसचा जाहिरनामा खऱ्या अर्थाने 'जन की बात' आहे. काँग्रेस सत्तेत आल्यास शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाईल, जीएसटीमुक्त शेती, स्वामिनाथन समितीच्या अहवालानुसार एमएसपीचा कायदा, ३० लाख रिक्त सरकारी पदे भरणे, अग्निवीर योजना बंद करणार तसेच हिंदुस्थानातील गरिब महिलांना वर्षाला १ लाख रुपये देणार असल्याचे आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिले आहे.
विदर्भातील काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी राहुल गांधी यांची भंडारा जिल्ह्यातील साकोलीत भव्य जाहीर सभा झाली. यावेळी व्यासपीठावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील, खासदार चंद्रकांत हंडारे, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव आशिष दुआ, माजी मंत्री सतीष चतुर्वेदी, भंडारा गोंदिया लोकसभेचे उमेदवार डॉ. प्रशांत पाडोळे गडचिरोली चिमूरचे काँग्रेस उमेदवार ड़ॉ. नामदेव किरसन, नागपूरचे उमेदवार आ. विकास ठाकरे, चंद्रपूरच्या उमेदवार प्रतिभा धानोकर, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष आ. वजाहत मिर्झा, आ. अभिजीत वंजारी, आ. सहसराम करोटे, माजी खा. मधुकर कुकडे, माजी खा. खुशाल बोपचे, भंडारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मोहन पंचभाई, यांच्यासह विदर्भातील इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी उपस्थित होते.
यावेळी बोलताना राहुल गांधी म्हणाले की, एससी एसटी, आदिवासी, ओबीसी समाजाची सरकारमध्ये भागिदारी अत्यल्प आहे. जेवढी लोकसंख्या तेवढाच अधिकार त्या समाजाला मिळाला पाहिजे यासाठी काँग्रेस सरकार सत्तेत येताच जातनिहाय जनगणना व आर्थिक, सामाजिक सर्वेक्षण करण्याचे क्रांतीकारी काम करणार आहे. मोदी सरकारवर हल्लाबोल करत राहुल गांधी म्हणाले की, सरकार मोदींचे नाही तर अदानीचे आहे, एका अरबतीचे सरकार आहे व नरेंद्र मोदींनी १० वर्षात त्यांच्यासाठीच काम केले. आज देशातील विमानतळे, बंदरे, रस्ते, खाण, कोळसा, सौरऊर्जा सर्वकाही अदानी यांचेच झाले आहे. नरेंद्र मोदी २४ तास धर्म, हिंदू-मुस्लीम यावरच बोलतात, एका समाजाला दुसऱ्याविरोधात लढवतात व तुमची संपत्ती अदानीच्या घशात घालतात. जीएसटीच्या माध्यमातून मोदी सरकारने जनतेला लुटले आहे.
नरेंद्र मोदी यांनी ओबीसी, शेतकरी, छोटे व्यापारी, कामगार, गरीब, आदिवासी यांच्यासाठी काय केले? देशात सर्वात मोठा प्रश्न महागाई व बेरोजगारीचा आहे पण मोदी त्यावर कधीच बोलत नाहीत. कोरोना काळात गंगा नदीत हजारो मृतदेह दिसत होते पण नरेंद्र मोदी मात्र जनतेला टाळ्या वाजवा, थाळ्या वाजवा, मोबाईल टॉर्च लावा असे सांगत होते. कधी ते समुद्राच्या तळात जातात व पुजा करतात, मोदींनी देशाची थट्टा चालवली आहे, असेही राहुल गांधी म्हणाले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले की, काँग्रेसच्या जाहिरनाम्यात जातनिहाय जनगणना करण्याचे आश्वासन दिले आहे तसेच मागास, आदिवासी, ओबीसी समाजाच्या हितासाठी आर्थिक, सामाजिक सर्वेक्षणही केले जाणार आहे.
याचा लाभ भंडारा जिल्ह्याला होणार असून या जिल्ह्यात एससी, एसटी, भटके विमुक्त, आदिवासी व ओबीसी समाजाची लोकसंख्या जास्त आहे.
काँग्रेसच्या जाहिरनाम्यात शेतकरी, कामगार, तरुण, महिला व गरिबांसाठी आश्वासने दिली आहेत त्याबद्दल राहुल गांधी यांना मनापासून धन्यवाद देतो.
काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यावेळी म्हणाले की, जेंव्हा जेंव्हा समतेचा विचार अडचणीत आला, राज्यघटना, लोकशाही अडचणीत आली, काँग्रेस पक्ष अडचणीत आला तेंव्हा तेंव्हा विदर्भाची जनता काँग्रेस सोबत राहिली आहे.

# गोंडपिपरीला दिलेला शब्द पाळला; काँग्रेसने काय दिले ?

## सुधीर मुनगंटीवार यांचा खडा सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** गोंडपिपरीच्या सभेत विकासनिधी आणण्याचा शब्द मी दिला होता. २३ कोटी ५० लक्ष रुपयांचा निधी आणून मी शब्द पूर्ण केला, पण काँग्रेसच्या लोकप्रतिनिधीने काय केले ?, असा खडा सवाल चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्राचे भाजपा आणि महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी केला. मला लोकसभेत निवडून दिले तर गोंडपिपरीचा कायापालट होईल, असा विश्वास व्यक्त करून आपल्या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी १९ एप्रिलला कमळाचं बटण दाबा आणि पुन्हा एकदा मोदी सरकार आणा, असे आवाहनही त्यांनी केले.

गोंडपिपरी येथे गुरुवार, 11 एप्रिल रोजी आयोजित सभेला ना. मुनगंटीवार संबोधित करत होते. यावेळी माजी आमदार ॲड. संजय धोटे, माजी आमदार सुदर्शन निमकर, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, बबन निकोडे, अमर बोडलावार, चेतनसिंग गौर, मनिषा मडावी, मनिषा दुर्योधन, शारदा गरपल्लीवार, अश्विनी तोडासे, कोमल फरकाडे, सुरेखा श्रीकोंडावार व ॲड. अरुणा जांभुळकर आदींची उपस्थिती होती. प्रारंभी भाजपाचे युवा कार्यकर्ते स्व. प्रशांत येल्लेवार यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

गोंडपिपरी परिसराचा विकास करण्याची माझी तीव्र इच्छा असून हे कार्य तुमच्या आशीर्वादाशिवाय अशक्य आहे. 19 एप्रिलला मतदानाच्या दिवशी कमळ चिन्हाचे बटन दाबून जर तुम्ही मला निवडून दिले तर गोंडपिपरीतील अपूर्ण कामे पूर्ण करेन. तुम्ही मला जेवढे मतदान कराल त्याच्या कित्येक पट भरभरून विकास आपल्या वाट्याला येईल. जो देशाच्या बाजूने उभा राहिला त्याच्या बाजूने हा देश उभा राहील, अशी सादही ना. मुनगंटीवार यांनी घातली.

एसएनडीटी विद्यापीठाचे केंद्र, सैनिक शाळा, बॉटनिकल गार्डन, मेडिकल कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटल, स्टेडियम, सामाजिक सभागृह, नाट्यगृह, चिचडोह प्रकल्प अशा अनेक विकास कामांचा उल्लेख करताना ना. मुनगंटीवार म्हणाले, विश्वगौरव पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी सरकार येणे निश्चित असून मोदीजींचा विकासरथ



गोंडपिपरीपर्यंत आणण्याचे मी वचन देतो. मोदीजींना साजेसा खासदार तुम्ही निवडून दिला तर महिला, बेरोजगार, बचत गटांचा लोकसभेत आवाज बुलंद करेन. संसदेला चंद्रपूरचे दरवाजे लावलेले असल्यामुळे 'खुल जा सिमसिम' असे म्हणताच आपल्यासाठी अर्ध्या रात्रीही हे दरवाजे खुले होतील तसेच राज्य आणि केंद्राच्या तिजोरीतील निधी देखील गोंडपिपरीच्या विकासासाठी आणता येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

# मतदार जनजागृती उपक्रमांनी दुमदुमली वैजापूर नगरी

## 'माझा देश माझी लोकशाही, चल गं करु मतदान लावू बोटाला शाई!'

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** 'माझा देश माझी लोकशाही, चल गं. करु मतदान लावू बोटाला शाई', या उखाण्यातून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी समोर असलेल्या श्रोतृवर्गाला मतदानाची महती सांगितली. स्वीप उपक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत वैजापूर येथे आज विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मतदान जनजागृतीच्या घोषणांनी आज वैजापूर नगरी दुमदुमली.

वैजापूर येथे आज मतदार जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात आले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी या कार्यक्रमांना हजर होते. उपविभागीय पोलीस अधिकारी महक स्वामी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, तहसिलदार सुनिल सावंत तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. सकाळी आठ वाजेपासून शहरात रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यात सर्व शासकीय अधिकारी- कर्मचारी,अंगणवाडी सेविका, शालेय विद्यार्थी यांनी सहभाग घेतला.रॅलीत लेझीम पथकाचाही समावेश होता. मतदार जनजागृतीच्या घोषणा देऊन शहर दणाणून गेले. डीएड कॉलेजच्या प्रांगणामध्ये रॅलीचा समारोप झाला तेथे विविध कार्यक्रमांनी



मतदार जनजागृतीचा संदेश देण्यात आला. दीपक त्रिभुवन अव्वल कारकून यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. श्री स्वामी समर्थ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. शाहीर अशोक बागुल व त्यांच्या संचाने अतिशय सुंदर पोवाडा सादर करत मतदानाची महती सांगितली.

मतदार जागृती संदेश देणाऱ्या उखाण्यांच्या कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात स्वतः जिल्हाधिकारी स्वामी यांनी स्वतः उखाणा सादर केला. त्यांनी घेतलेल्या 'माझा देश माझी लोकशाही चल गं करु मतदान लावू बोटाला शाई' या उखाण्याला उपस्थितांनी दाद दिली. याप्रसंगी श्रीमती राजश्री बंड, सुवर्णा बोर्डे, दीपक त्रिभुवन, सुचिता हरेगावकर, उर्मिला जेजुरकर,सुरेखा पोटे, कमल खरे, नाजुका गायकवाड, केशव सूर्यवंशी आदींनी उखाणे सादर केले. तलाठी श्रीमीहिंगे यांनी एकपात्री प्रयोग सादर करून लोकशाहीची भावना व्यक्त केली. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, मतदानाप्रति कर्तव्य भावना जागरुक व्हायला हवी. आपल्या देशाची लोकशाही बळकट करायची तर मतदानाचे प्रमाण वाढले पाहिजे. त्यासाठी लोकांना मतदान केंद्रांवर विविध सुविधांची उपलब्धता करुन दिली जाणार आहे. त्यात पाणी, सावली, लहान बालकांसाठी पाळणाघर, दिवंग्यासाठी व्हील चेअर, मेडिकल किटइ. विविध सुविधांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. कुणीही मतदानापासून वंचित राहू नये हे आयोगाचे ध्येय्य आहे. तथापि, सगळ्यांना मतदान करता यावे यासाठी मतदार सहायता केंद्रही स्थपन करण्यात येतील असेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांनी वैजापूर विधानसभा मतदारसंघ निहाय निवडणूक तयारीचा आढावाही घेतला. यावेळी सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# भीम योद्धा

भिम योध्याचं...
बळ आटतच गेलं
चळवळीचं खळं कसं
लुटतच गेलं....

तुटतच गेली कशी
मोत्याची माळ..
विखुरले कसे सारे
बदलत गेला काळ....

उरली न आता
लेखणीची धार..
गप्प झाले सारे
कोण करेल प्रहार.....

धगधगती आजही
भिमाची मशाल...
संघर्षाच्या निखा-याची
विझून गेली आग.....

बाबाच्या भाकरीवर
कुठवर जगायचं....
पटवून मशाली
रणशिंग फुंकायचं.....

डॉ. बलराज पांडवे
औरंगाबाद

# विदर्भात अवकाळी पावसाचा धुमाकूळ

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** लोकसभा निवडणूक तोंडावर आली असताना आणि प्रचार शिगेला पोहचला असताना राज्यात अवकाळी पावसाचा जोर वाढला आहे. राज्यात आणि प्रामुख्याने विदर्भात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. दरम्यान, येत्या २४ तासात पुन्हा एकदा मुसळधार पाऊस हजेरी लावणार असल्याचे भारतीय हवामान खात्याने सांगितले आहे.

संपूर्ण आठवडा वादळीवारा आणि गारपिटीसह राज्यातील अनेक जिल्ह्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. तर आठवड्याची अखेरसुद्धा मुसळधार पावसानेच होणार आहे. विदर्भात आज नागपूरसह अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांना पावसाचा 'अलर्ट' दिला आहे. तर सोलापूर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद या जिल्ह्यांना सुद्धा 'अलर्ट' दिला आहे. गेल्या आठवड्याभरापासूनच कोसळणाऱ्या अवकाळी पावसामुळे हजारो हेक्टरवरील पीकांचे नुकसान झाले आहे. तर विदर्भातला शेतकरी संकटात सापडला आहे.



# देवळगाव गुजरी येथे अंगाचा थरकाप उडवणारी घटना; मुलींसह पत्नीची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील देऊळगाव गुजरी येथे अंगाचा थरकाप उडवणारी दुहेरी हत्याकांडाची घटना घडली आहे. पती-पत्नीच्या आपसातील वादातून पतीने आपल्या पत्नीसह ११ महिन्यांच्या मुलीची हत्या केली व त्यानंतर दुधलगाव (ता. मलकापूर) येथे जाऊन विहिरीत उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपविली शुक्रवारी दि. १२/४/२०२४ या घटनेमुळे जामनेर तालुका हादरला असून, देऊळगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.देऊळगाव गुजरी येथील पोलीस पाटील राजू इंगळे यांची कन्या प्रतिभा हिचा विवाह दुधलगाव येथील विशाल मधुकर झनके याच्याशी विवाह झाला होता.

पतीला मद्याचे व्यसन असल्याने सुरुवातीला छोटी-मोठी कुरबुर व्हायची. परंतु, गेल्या काही काळात विशालने प्रतिभाचा मानसिक व शारीरिक छळ करणे सुरू केले. दोन लहान मुली व त्यातच पतीचे दारूचे व्यसन याचा त्रास असह्य झाल्याने गत चार महिन्यांपासून प्रतिभा पतीला सोडून ११ महिन्यांच्या मुलीसह माहेरी निघून आली होती. मध्यंतरी विशालने प्रतिभाची समजूत घालण्याचा प्रयत्नही केला. परंतु, प्रतिभाने त्यास नकार दिला. शुक्रवारी देऊळगाव गुजरी येथे प्रतिभाचे आई-वडील शेतात गेले असताना विशाल पुन्हा प्रतिभाला नेण्यासाठी तसेच तिची समजूत घालण्यासाठी आला होता. प्रतिभाने त्याच्या सोबत जाण्यास नकार दिल्याने दोघांमध्ये वाद निर्माण होऊन विशालचा राग अनावर झाला व त्याने धारदार शस्त्राने प्रतिभा आणि चिमुकल्या दिव्याची गळा कापून हत्या केली व तेथून फरार झाला.प्रतिभाच्या वडिलांना ही माहिती समजताच त्यांनी घरी धाव घेतली, त्यावेळी त्यांना आपली मुलगी प्रतिभा व नात दिव्या रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून आले. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच जळगाव येथील अतिरिक्त पोलीस आयुक्त, पाचोरा येथील उपविभागीय पोलीस अधिकारी, तसेच फत्तेपूर पोलीस ठाण्यातील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी देऊळगावकडे धाव घेतली. पत्नी व चिमुकल्या मुलीचा खून करून फरार झालेल्या विशालने दुधलगाव गाठले व कमरेला दगड बांधून गावातील एका विहिरीत उडी घेऊन त्याने स्वतःचेही जीवन संपविले. रात्री उशिरापर्यंत या प्रकरणी गुन्हा नोंदवण्याचे काम सुरू होते. याप्रकरणी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली फत्तेपूर पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक गणेश फड व त्यांचे सहकारी तपास करीत आहेत.

# अंधश्रद्धा निर्मूलन : सत्यशोधक चळवळ विषयावर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लांडेवाडी भोसरी पुणे येथे महात्मा जोतीराव फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग सहायक आयुक्त समाज कल्याण पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "अंधश्रद्धा निर्मूलन : सत्यशोधक चळवळ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. विशाल लोंढे (सहाय्यक आयुक्त समाजकल्याण विभाग),विठ्ठल महामुनी (अध्यक्ष समता जेष्ठ नागरिक संघ मंचर), नितिन हांडे (कार्यकर्ता अंधश्रद्धा निर्मूलन समिती) यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला प्रारंभ झाला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विलास लांडे,संस्थेचे खजिनदार अजित गव्हाणे, सचिव सुधीर मुंगसे यांच्या प्रेरणेतून सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्राचार्य डॉ के जी कानडे आपल्या प्रास्ताविक पर



मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की,महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी समाज एका उंचीवर नेऊन ठेवला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा अवलंब केला पाहिजे महापुरुषांची,चरित्र वाचावे समाज घडविण्यासाठी प्रयत्न करावे.डॉ.नेहा बोरसे यांनी मौलिक शब्दात प्रमुख व्याख्यात्यांचा परिचय नेमकेपणाने करून दिला.विठ्ठल महामुनी यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की,महात्मा फुलेंचे समकालीन भीमराव महामुनी यांनी जलशा च्या मार्फत संपूर्ण महाराष्ट्रात प्रबोधनाचे कार्य केले.असे सांगितले.मनितीन हांडे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते मार्गदर्शन करताना म्हणाले की विज्ञान सांगते स्वतः अनुभवा.भोंदू लोक हातचलाखी करून फसविण्याचे काम करतात, बुवाबाजीचा धंदा एंजटवर चालतो.हांडे नी विज्ञानावर आधारित काही प्रयोग करून अंधश्रद्धेवर प्रकाश टाकत उद्‌बोधन केले.प्रा.विशाल लोंढे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार आत्मसात केले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या समोर आयडॉल म्हणून महापुरुष असावे.विद्यार्थी आपल्या देशाचे भविष्य आहे. समाजात समता नोंदवण्यासाठी आपण या महापुरुषांच्या विचारांचा जागर करत आहोत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा किरण चव्हाण यांनी केले वआभार प्रा.चेतन भामरे यांनी आभार मानले.

# बारामतीत सदनिकेत दाम्पत्य मृतावस्थेत

आधुनिक केसरी न्यूज

**बारामती :** शहरातील एका इमारतीतील सदनिकेत दाम्पत्य मृतावस्थेत सापडल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. दाम्पत्याच्या शरीरावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आले असून, या घटनेने बारामती शहरात खळबळ उडाली आहे. सचिन वाघोलीकर आणि त्यांची पत्नी सारिका अशी मृतावस्थेत सापडलेल्या दाम्पत्याचे नाव आहे. जामदार रस्त्यावरील खत्री-पवार अपार्टमेंटमध्ये वाघोलीकर दाम्पत्य राहायला होते. सचिन यांचा मित्र शनिवारी सकाळी घरी आला. तेव्हा सदनिकेतील स्वयंपाकघरात सचिन आणि त्यांची पत्नी रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड, बारामती शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. श्वानपथक, तसेच अंगुली मुद्रा तज्ज्ञांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. वाघोलीकर दाम्पत्याच्या शरीरावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याचे आढळून आले.

# कोपरगाव तहसीलमधील भ्रष्टाचार प्रकरणी राहुल शिरसाठचा जामीन अर्ज फेटाळला

आधुनिक केसरी न्यूज

**किसन पवार**

**कोपरगाव :** येथील तहसील कार्यालयातील निवडणूक विभागात कार्यरत असलेला महसूल सहाय्यक राहुल साहेबराव शिरसाठ याने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे वितरित करण्यात येणारे मानधन परस्पर आपले कुटुंबातील व जवळचे नातेवाईक यांचे नावे दाखवून हडप केले असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असून या प्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात राहुल साहेबराव शिरसाठ याचेवर फसवणुकीच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे दरम्यान शिरसाठ याने अटकपूर्व जामिनासाठी केलेला अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गत वर्षी जून ते नोव्हेंबर दरम्यान ग्रामपंचायत निवडणुका पार पडल्या होत्या. त्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांनी केंद्रस्तरीय अधिकारी नेमले होते.व त्या २५ केंद्र स्तरीय अधिकाऱ्यांचे सुमारे ०६ लाख रुपयांचे मानधन देण्यासाठी निवडणूक शाखेत काम करणारा पर्यवेक्षक राहुल साहेबराव शिरसाठ यांची नेमणूक करण्यात आली होती.त्याने बँक खात्यावर सदर रक्कम जमा करण्यासाठी बनावट नावाने पर्यवेक्षक तयार करुन त्यांच्या नावावर प्रत्येकी

२४ हजार रूपयांची बनावट बिले वर्ग केली होती. त्यात भास्कर बबन नजन यांचे नावावर तीन वेळा,श्रीमती अर्चना मिननाथ पठारे यांचे नावावर दोन वेळा,या प्रमाणे २५ व्यक्तींच्या नावावर हि रक्कम अदा केली असल्याचे आढळून आले आहे. हे पर्यवेक्षक लोकसेवकामधून नियुक्त केले जात असताना या महाशयांनी ते खाजगी, जवळचे नातेवाईक, मित्र यांचेतुन निवडले होते हे विशेष ! विशेष म्हणजे त्यांची नियुक्ती केली असल्याचे आढळून आले नाही.हि बाब अधिकाऱ्यांच्या लक्षात आल्यावर त्याने कार्यालयीन खर्च,निवडणुका खर्च,उपप्रधान खर्च आदींच्या नावावर हि रक्कम कोषागारात जमा केली असल्याचे आढळून आले आहे.

सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे याबाबत तक्रार करून या गोष्टीची सखोल चौकशीची मागणी केली होती त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी शिर्डी उपविभागीय अधिकारी यांना आदेश देऊन चौकशी अहवाल मागवला होता वरील अहवालात राहुल साहेबराव शिरसाठ या महसूल कर्मचाऱ्यावर निलंबनाची शिफारस केलेली आहे. तर तहसीलदार संदीपकुमार भोसले आणि नायब तहसीलदार मनीषा कुलकर्णी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे नियम ३ मधील तरतुदीचा भंग केल्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्याची शिफारस शिर्डी उपविभागीय अधिकारी यांनी आपल्या अहवालात केली आहे.

मात्र दोन महिने होऊन देखील कुणावरच कारवाई होत नव्हती तेव्हा पुन्हा संजय काळे यांनी कोपरगाव शहर पोलीस स्टेशनला पत्र देऊन कारवाई करण्याची मागणी केली होती अखेर या प्रकरणी शिर्डी येथील उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयातील नायब तहसीलदार विलास बबन राव भांबरे यांनी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

त्यात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी राहुल शिरसाठ याने जिल्हा सत्र न्यायालयाकडे अर्ज केला होता. मात्र न्यायालयाने हा अर्ज फेटाळला आहे.

दरम्यान याप्रकरणी संजय काळे यांनी कोपरगाव शहर पोलीस स्टेशनला नुकतेच पत्र देऊन शिर्डी उपविभागीय अधिकारी यांच्या अहवालात शिफारस केले प्रमाणे यातील उर्वरित दोन दोषी निवडणूक नायब तहसीलदार मनीषा कुलकर्णी व तहसीलदार संदीप भोसले यांचे वर देखील लवकरात लवकर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आता या प्रकरणी प्रशासन काय भूमिका घेते याकडे नागरिकांच्या नजरा लागल्या आहे.




# वर्षभरापूर्वी गहाळ झालेला मोबाईल दिला परत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जालना पोलिस ठाणे जालना येथील अतुल तोष्णीवाल राहणार चमन जालना यांचा झाला त्यांनी तक्रार दाखल केली होती.मोबाईल गहाळ नोंद क्रमांक १००/२४ अशी तक्रार मोबाईल धारक यांनी दिली होती. गेल्या वर्षभरापुर्वी परिसरातून मोबाईल गहाळ झाला होता. हा मोबाईलचा जालना पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्याने शोध घेवून तो मूळ मालकाला आपण परत देऊ अशा हेतूने खूप प्रयत्न परंतु सदरील व्यक्त याने मोबाईल बंद करून ठेवल्याने विलंब झाला होता.

जालना शहरातील परिसरात यांचा महागाडा मोबाईल एक वर्ष पूर्वी गहाळ झाला होता. या परिसरातून जाणाऱ्या एकाला गहाळ झालेला तो मोबाईल सापडला. परंतु अनेक महिने त्या व्यक्तीने तो मोबाईल सुरु केला नव्हता. परंतु गेल्या काही दिवसांपुर्वी सापडलेल्या मोबाईलमध्ये सीमकार्ड टाकल्यानंतर तो ॲक्टीव्ह झाल्यानंतर पोलीस ठाणे कदिम जालना, जालना येथील गहाळ नोंद क्रमांक 100/24 मधील गहाळ झालेला मोबाईल हा सिल्लोड येथील बस स्थानकावर सिल्लोड महिला समुपदेशन केंद्राचे श्री विशाल पाईकराव हे आपल्या कामानिमित्त मोटारसायकल वरून जात असताना त्यांना सापडला होता. सदर मोबाईल आज फिर्यादी याना सिल्लोड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री उदार साहेब,महिला समुदेशन केंद्र सिल्लोड चे श्री विशाल पाईकराव व पोलीस बॉईज संघटनेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष श्री एडवोकेट प्रितेश गौर हस्ते मोबाईल धारक अतुल तोष्णीवाल राहणार चमन जालना यांना वापस देण्यात आला.यावेळी मोबाईल धारक अतुल तोष्णीवाल यांनी महिला समुपदेशन केंद्राचे विशाल पाईकराव व सपोनि उदार साहेब आभार मानले.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).

आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# मी तीनशे विकासकामे केली, त्यांनी एकवीस तरी सांगावीत!

## सुधीर मुनगंटीवार विरोधकांवर कडाडले : राजुरा विधानसभा क्षेत्रातील अनेक गावांत जाहीर सभा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** धृतराष्ट्र सांगू शकतील एवढी विकासकामे, मी चंद्रपूर जिल्ह्यात माझ्या मतदार संघात केली आहेत. मी फक्त विकासाचं राजकारण करतो, जातीपातीच घाणेरडे राजकारण उभ्या आयुष्यात केले नाही. मी तीनशेच्या वर विकासकामे केली आहेत, त्याची यादी तुमच्यासमोर वाचून दाखविती. पण विरोधकांनी त्यांच्या काळात २१ कामे केली आहेत का? हे जनतेला त्यांनी सांगावं, असं म्हणत चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले गट) व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार जाहीर सभेत विरोधकांवर चांगलेच कडाडले.

राजुरा विधानसभा मतदार संघात गुरुवारी त्यांनी झंझावाती प्रचारदौरा केला. यावेळी त्यांनी अनेक गावांमध्ये जाहीर सभा, प्रचार यात्रा घेऊन खेड्यापाड्यातील गावांना भेटी दिल्या. त्यावेळी ते बोलत होते. ते बोलतांना म्हणाले की, जनतेसमोर मी केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा सादर करीत आहो. पण माझे प्रतिस्पर्धी विकासाच्या मुद्द्यावर बोलत नाहीत. मागील पाच वर्षात राजुरा विधानसभा मतदार संघाचा विकास रखडला आहे. नागरिकांना जाण्या-येण्यासाठी साधे रस्ते करता



आले नाहीत, त्यांच्याकडे बोलण्यासाठी काहीच नाही असे म्हणत त्यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला.

या भागात पाणी पुरवठ्याचा प्रश्न असेल, वीज पुरवठ्याचा प्रश्न असेल मी लोकसभेत निवडून आल्यानंतर तातडीने मार्गी लावणार पण त्यासाठी आपण मला आशीर्वाद रूपी मत दिले पाहिजे, असे आवाहन ना. मुनगंटीवार यांनी केले. यावेळी प्रत्येक गावातील ग्रामस्थांनी हात वर करून आम्ही आपल्या पाठीशी आहोत, असे सांगत जोरदार घोषणा दिल्यात. ना. मुनगंटीवार यांनी सास्ती,तोहगाव, लाठी, धाबा आदी ठिकाणी जाहीर सभा घेतल्या. तर गोवरी, चुनाळा, विरूर, चकदरूर, भंगाराम तळोधी, विठ्ठलवाडा, वढोली, खरारपेठ आदी ठिकाणी प्रचार यात्रा घेतल्या. तसेच गोवरी, माथरा, रामपूर, विहीरगाव, मूर्ती, नलफ़डी, सिंधी, धानोरा, धानापूर, करंजी, आक्सापुर, सरांडी, सोनापूर देशपांडे, सकमुर, दरुर, चकपारगाव, खराळपेठ आदी गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि प्रश्न समजून घेतले. यावेळी भाजपा माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी आमदार संजय धोटे, माजी आमदार सुदर्शन निमकर, बंडू हजारे, सुरेश धोटे, सुरेश रागीट, मधुकर नरड, सुनील उरकुडे, सुभाष बोनगिरवार, सचिन शेंडे, अरुण लोखंडे, सरपंच सुचिता मावलीकर, प्रतीक चन्ने, जिल्हा परिषद सदस्य स्वाती वडपल्लीवार, गणेश पिसे, महेंद्र बोबडे, प्रवीण मुनगंटीवार, विपुल भडी, गजानन झाडे, भारत कुळसंगे, बंडू धोटे, सुरेश वांढरे, सुनीता उरकुडे, प्रकाश फुटाणे, स्नेहा दरेकर, मीरा वांढरे, सरपंच बाळू वडस्कर, सिद्धार्थ पथोडे, अरुण मस्की, विलास बोनगीरवार, संजय पावडे, प्रशांत घरोटे, विनायक देशमुख, बबन निकोडे, अमर बोडलावार, दीपक सातपुते, निलेश पुलगमकार, स्वप्नील अनमुलवार, राजेंद्र गोहणे, हिरा कंदिगुरवार, निळकंठ लखमापुरे, रुपेश लिंगे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

**सुधीर भाऊ राजुरा मतदार संघातील प्रश्न सोडवतील माजी आ. संजय धोटे**

राजुरा विधानसभा मतदार संघ विकासापासून कोसो दूर आहे. या मतदार संघात विकास कामे झाली नाहीत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडण्याची ताकद असेल तर ती फक्त सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्यातच आहे. आपण सर्वांनी झोकून देऊन सुधीरभाऊंना लोकसभा निवडणुकीत लाखो मतांनी विजयी करून त्यांना संसदेत पाठविले तरच केंद्रातील निधी आपल्या जिल्ह्याला आणि विधानसभा मतदार संघाला मिळेल आणि आपल्या क्षेत्राचा विकास होईल अशी भावना माजी आमदार संजय धोटे यांनी बोलून दाखविली.

**विकासासाठी एकच पर्याय सुधीरभाऊ – माजी आ. सुदर्शन निमकर**

आजवर आम्ही अनेक नेते बघितले आहेत. शब्द देतात आणि वेळ आली की विसरून जातात. पण आपले सुधीरभाऊ मुनगंटीवार इथे अपवाद ठरतात. आम्ही जेव्हा–जेव्हा त्यांच्याकडे विषय ठेवला तेव्हा–तेव्हा त्यांनी दिला शब्द केला पूर्ण या उक्तीप्रमाणे सर्व प्रश्न आणि अडचणी मार्गी लावल्या आहेत. त्यांच्याकडे समस्या गेली कि त्यावर शंभर टक्के इलाज असतो. असा एक हि प्रश्न नसेल की जो सुधीर भाऊंनी सोडविला नसेल. त्यामुळे लोकसभेत आपल्या हक्काचा उमेदवार निवडून पाठविणे गरचेचे आहे, असे प्रतिपादन माजी आमदार सुदर्शन निमकर यांनी केले.

# सावळदबारातील नव्यानेच बांधलेले आरोग्य वर्धिनी केंद्र धूळ खात

## परिसरातील रुग्णांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील आयुष्मान भारत आरोग्य वर्धिनी केंद्र पाच ते सहा वर्षांपासुन पुर्ण झालेले असल्यावर सोयगाव तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ गितेश चावडा मात्र ताब्यात घेण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून आले आहे.विषेश म्हणजे सावळदबाराचा पदभार त्याच्याकडे असून हे महाशय एखाद्या दोन महिन्यांत इकडे फिरकून बघत असतात मात्र इतर दिवस वाऱ्यावर सोडले असतात. नव्यानेच बांधलेल्या आयुष्यमान भारत आरोग्य वर्धिनि धुळखात पडुन असुन या आरोग्य केंद्रामधे घाणीचे साम्राज्य निर्माण होऊन त्यात गावातील मोकाट कुत्रे रहिवास करुन राहत असुन शासन प्रशासन यांच या प्रकरणाकडे पुर्णपणे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ गितेश चावडा(टी .एच.ओ) प्राथमिक केंद सावळदबारा तथा तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती सोयगाव यांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसुन येत आहे. सावळदबारा येथे आयुष्मान भारत आरोग्य वर्धिनी केंद्राच्या इमारतच्या बांधकामावरती शासनाने कोठ्यवधी रुपय खर्च करुन ही हे आरोग्य केंद्र आज ही धुळखात पडुन आहे या आरोग्य केंद्राच्या इमारत चे बांधकाम नित्कृष्ट दर्जाचे बोगस काम झालेले असुन या इमारत ला सुरुवात करण्या अगोदरच भिंतीला मोठ मोठे तढे गेलेले आहे त्यात काहि ठिकाणी तर पाईप फुटलेले आढळुन आले तर काही ठिकाणी खिडक्या दवाज्यांच्या काचा फुटलेल्या असुन ही इमारत चालू नसल्याने भंगार अवस्थेमधे अंधारामधे धुळखात पडुन आहे सावळदबारा अठरा गावांचे केंद्र असुन हे आरोग्य केंद्र एक पडक्या जिल्हा परिषदेच्या शाळेच्या खोलीमधे चालविले जात आहे त्या खोलीमधे औषधी साठा आणि इतर साहित्य ठेवायला जागा शिल्लक उरलेली नसुन रुग्नाचा उपचार करायचा कुठ हा मोठा प्रश्न येथील डाक्टर आणि कर्मचा-यांना पडलेला आहे आरोग्य केंद्र चालविण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे आशासेविका यांची मिटींग पडक्या छताखाली घेतली जात आहे यामुळे मोठी दुर्घटना होऊ शकती हे मात्र नाकारता येत नाही या ठीकाणी 8 कर्मचारी रुजु असुन 18 कर्मचारी रिक्त पदे असुन तीन वैद्यकीय अधिकारी यांची पोस्ट असुन हजर फक्त एकच वैद्यकीय अधिकारी असल्याची ही माहिती समोर आलेली आहे. कोठ्यवधी रुपयांच्या इमारतचे काम नित्कृष्ट दर्जाचे व अपुर्ण काम करुन ठेकेदाराने वरती हात करुन पळ काढलेला आहे.डोंगराळ व आदिवासी बहुल भागाकडे जाणीवपूर्वक हेतुपुरस्सर दुर्लक्ष आहे दुसरे सर्जन उपलब्ध करून न देता हेतुपुरस्सर स्वतःच सावळदबारा येथील पदभार सोडून इतरत्र फिरतात तर त्यांनी सावळदबार केंदाचा पदभार स्वीकारलाच कशाला? अशा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे.या बेजबाबदार पणाला नेमके कोन दोषी आहे असा प्रश्न जनतेला भासावत आहे.अशी माहिती पत्रकार जब्बार डी तडवी यांनी बोलताना दिली.

**लाईटची सुविधा नसल्याने ताब्यात घेण्यास उशीर झाला**

ठेकेदाराशी कालच बोलणे झाले आहे त्यांने जर दोन दिवसांत लाईटचे नाही केले तर ब्लॉक लिस्टमध्ये टाकून नवीन ठेकेदाराला काम देऊ तसेच आम्ही कनिष्ठ अभियंता यांना लाईट चे काम तातडीने पूर्ण करुन द्यावे असे पण बोलणे झाले आहे आणि बरेच दवाखान्याचे सामान नवीन दवाखान्यात सिप्ट केले चार ते पाच दिवसांत नवीन दवाखाना सुरू होईल खरोखरच रुग्णांचे व कर्मचारी यांचे जागे अभावी हाल होत आहेत लवकरच आता नवीन दवाखाना सुरू होईल.

**डॉ. गितेश चावडा वैद्यकीय अधिकारी (टि.एच.ओ). सोयगाव**



# भीमजयंतीनिमित्त अठरा रोजी मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ जयंती सोहळ्यातच्या पुर्व तयारी साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली.या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे सोयगाव तालुकाध्यक्ष मनोहर ओंकार जगताप यांच्या अध्यक्षतेखाली उत्सव समितीची बैठक संपन्न झाली तसेच बैठकीमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती नाचून आणि वाचून अठरा एप्रिलला साजरी करण्याचे ठरले आहे.यावेळी सर्व संमतीने आंबेडकरवादी जयंती उत्सव समितीची कार्यकारणी पुढीप्रमाणे निवड करण्यात आली. अध्यक्षपदी शालिक जाधव,तर उपाध्यक्षपदी भगवान जाधव, कोषाध्यक्षपदी दिलीप सुरडकर यांची निवड करण्यात आली. या जयंती उत्सव समितीच्या बैठकीचे सूत्रसंचालन कोषाध्यक्ष दिलीप सुरडकर यांनी करुन मिरवणूक हि दि.१८/४/२४ लाभ काढण्याची ठरावविण्यात आली असल्याचे वंचितांचे तालुका अध्यक्ष मनोहर जगताप यांनी अशी माहिति बोलताना दिली.व उत्सव समितीच्या कार्यकारणीची घोषणा केली.

यावेळी उत्सव समितीचे पदाधिकारी भास्कर प्रल्हाद सुरडकर, आकाश विक्रम सुरडकर,प्रभाकर सुरडकर, रमेश भिवसने, नंदकिशोर सुरडकर,माजी सरपंच समाधान सुरडकर,गौतम बनकर, आत्माराम सुरडकर,राहुल प्रकाश जाधव, नामदेव हरी सुरडकर, मिलींद सपकाळ, अजय गायकवाड, आकाश जाधव, , सुरेश सुरडकर. अरुण सुरडकर, सतिश जगताप, सागर सुरडकर, आमोल सुरडकर, संदीप बनकर. जनार्धन जाधव, सुधाकर साळवे, सिध्दार्थ साळवे. सुमित सुरडकर, विजय आगळे, सुनील बाळू सुरडकर,अलकेश सुरडकर, अनिल सुरडकर,भागवत जाधव,प्रकाश बनकर, समाधान जाधव, रामदास सुरडकर, नंदु मोरे,सदरील बैठकीत तेरा दिवसांनी येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती २०२४ बाबत चर्चा झाली.

# सावंगी -शेखपूर रस्त्याचे अखेर डांबरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील सावंगी ते शेखपूर रस्ता कित्तेक वर्षा पासून मातीकरण खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम रखडले होते. या ना त्या कारणाने कामात चालढकल अडथळे येत होते विभागाने रस्ता मातीकरण खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम पुर्ण करण्यात विभागाला यश आले. तालुक्यातील सावंगी ते शेखपूर या रस्त्या लगत घरे छपरे गोठे त्यात क्षेत्र कमी त्यात क्षेत्राला लाखोत भाव अशात रस्त्याला जागा देने मुश्किल मात्र रस्ता तर पाहिजेतच अशी एक अनेक डोकेदुखी सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी कर्मचारी यांना झाली होती.इकडे घेवू नका तिकडे घ्या तिकडचा म्हणतो तिकडेच घ्या असी वादविवादातून मार्ग काढत विभागाने आखेर रस्ता मातीकरण खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम पुर्ण केले त्यामुळे सावंगी ते शेखपूर च्या नागरिकांसाठी प्रवास सुखाचा ठरत आहे तर रस्ता तथा शेता लगतच्या नागरिक शेतकऱ्यांसाठी हा रस्ता अतिशय फायदेशीर ठरत आहे.त्यामुळे नागरिक,सार्वजनिक बांधकाम विभाग विभागीय कार्यालय खुलताबाद उपाभियंता शाखाभियंता यांचे आभार तथा अभिनंदन करत आहे हे विशेष.



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर